# घटक -१

## साहित्याची प्रकृती

**घटक रचना :**

१.० उद्देश
१.१ प्रास्ताविक
१.२ विषयविवेचन
१.३ ललित साहित्य आणि ललितेतर साहित्य
१.४ साहित्याची व्याख्या
१.५ पाश्चात्त्यांचा साहित्यविषयक विचार
१.६ साहित्यकृतींची विविध अंगे
१.७ साहित्यकृतींमधील अनुभवांची वैशिष्ट्ये
१.८ समारोप
१.९ सरावासाठी प्रश्न
१.१० संदर्भ

### १.० उद्देश

१) विद्यार्थ्यांना ललित साहित्य म्हणजे काय हे समजेल.
२) विद्यार्थ्यांना साहित्याची विविध अंगे समजून घेता येतील.
३) विद्यार्थ्यांना साहित्यकृतींच्या घटकांचे विश्लेषण करता येईल.
४) विद्यार्थ्यांना साहित्यकृतींमधील अनुभवांची वैशिष्ट्ये समजून घेता येतील.
५) विद्यार्थ्यांना साहित्याच्या घाटाचे स्वरूप समजून घेता येईल.

### १.१ प्रास्ताविक :

साहित्य हा माणसाच्या आयुष्यातील अविभाज्य घटक आहे. प्राचीन काळापासून माणसाचे साहित्याशी अगदी घनिष्ठ नाते आहे. मौखिक साहित्य आणि लिखित साहित्य असे साहित्याचे प्रामुख्याने दोन मुख्य भाग पडतात. जे वाणीने, तोंडाने उच्चारले जाते त्या साहित्याला मौखिक साहित्य असे म्हटले जाते आणि जे कागदावर लेखणीने अथवा पेनाने लिहिले जाते त्याला स्थूलमानाने लिखित साहित्य असे संबोधले जाते. साहित्य हा शब्द आपण खूप व्यापकपणे वापरतो. पण साहित्य म्हणजे नेमके काय? त्याचे स्वरूप नेमके कसे असते? ते इतर साहित्यापेक्षा वेगळे कसे असते? अशा साहित्याची नेमकी लक्षणे कोणती असतात? साहित्यकृतींचे वेगवेगळे घटक कोणते असतात? साहित्यकृतींमधील अनुभव म्हणजे काय,

त्याचे स्वरूप कसे असते? साहित्याचे आशयाशी आणि आकृतीबंधाशी म्हणजेच घाटाशी कोणते आणि कसे नाते असते? कलाकृतीचा घाट म्हणजे काय? हे सारे काही विस्ताराने समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. कारण दैनंदिन जीवनात आस्वादाच्या, अभ्यासाच्या आणि व्यावहारिक गरजांच्या आवश्यकतेनुसार आपला साहित्याशी सतत संपर्क येत असतो. त्यामुळे आपण या प्रकरणात वरील मुद्यांच्या अनुषंगाने साहित्याची प्रकृती म्हणजेच साहित्याचे स्वरूप कसे असते; हे समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

## १.२ विषयविवेचन

साहित्याचा विचार हे जीवन व्यवहाराचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. स्थूलमानाने कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, ललित निबंध, वैचारिक साहित्य, अनुवादित साहित्य या सर्वांचा 'साहित्य' अथवा 'वाङ्मय' या प्रकारात समावेश केला जातो. या साहित्याची म्हणून काही वैशिष्ट्ये अथवा लक्षणे आहेत. प्राचीन काळातील संत, पंत, आणि तंत साहित्य कवितेच्या (काव्याच्या) स्वरूपात लिहिले जात होते. त्यामुळे सर्वच प्रकारच्या साहित्याला काव्य, आणि त्याच्या समीक्षेला काव्यविचार (काव्यशास्त्र) असे म्हटले जात होते. काव्य विचारालाच आधुनिक काळात साहित्यविचार असेही म्हटले जाते.

वास्तविक साहित्य या शब्दाचा व्यापक अर्थ 'सामग्री' असा आहे. परीक्षेचे साहित्य, स्वयंपाकाचे साहित्य, शेतीचे साहित्य इत्यादी असे शब्दप्रयोग आपण नेहमी वापरत असतो. तथापि या प्रकरणात आपण ज्या साहित्याचा विचार करणार आहोत; ते साहित्य वरील प्रकारच्या साहित्यापेक्षा भिन्न आहे. आपण ज्या साहित्याची चर्चा करतो आहोत, त्या साहित्याचा विचार करता 'साहित्य' हा शब्द एकच एक असा विशिष्ट अर्थ सांगतो आणि तो म्हणजे 'लेखन' हा होय. या लेखनाच्या संदर्भातही साहित्य ही संज्ञा समावेशक आहे. यालाच वाङ्मय असेही म्हटले जाते. जे वाणीमय ते वाङ्मय आणि जे लिखित ते साहित्य असे स्थूलमानाने आपण म्हणू शकतो. अशी अर्थाची व्यापकता दोन्ही संज्ञांबाबत दिसते. तथापि सर्वच प्रकारच्या लेखनाला साहित्य असे म्हटले जात नाही. उदाहरणार्थ जन्मकुंडली, पंचांग, औषध उपचारांच्या टिपण्या यांना कुणी साहित्य असे म्हणत नाही. त्यामुळे आपल्या दृष्टीने साहित्य म्हणजे नेमके काय हे समजून घेतले पाहिजे, ते आपण पुढीलप्रमाणे समजावून घेऊ.

## १.३ ललित साहित्य आणि ललितेतर साहित्य

संस्कृतमधील 'संहित' या शब्दापासून 'साहित्य' या शब्दाची उत्पत्ती झाली आहे असे म्हटले जाते. असे साहित्य अनेक प्रकारांमध्ये लिहिले जाते. जसे की कथा, कविता, कादंबरी, नाटक, समीक्षा इत्यादी. साहित्यात 'ललित साहित्य' आणि 'ललितेतर साहित्य' असेही दोन महत्त्वपूर्ण भाग पाडतात; हे ही आपण ध्यानात घेतले पाहिजे. आपण ज्या साहित्याचा विचार करतो आहोत ते सारे ललित साहित्याचा भाग आहे आणि ललितेतर साहित्य म्हणजे सामाजिक शास्त्रे, विज्ञानशास्त्र, वाणिज्यशास्त्र इत्यादी शास्त्रे किंवा त्यातील लेखन होत. ललित साहित्यात भावनेला, विचाराला, कल्पनेला, प्रतिभेला, अलंकाराला महत्त्व असते; तर ललितेतर साहित्यात भावनेपेक्षा विचाराला, तर्काला, तटस्थेला, अनलंकृततेला अधिक महत्त्व असते. आपणास या प्रकरणात ललित साहित्याच्या अनुषंगाने विचार करावयाचा आहे. हा विचार

munotes.in

करताना आपणास खालील मुद्यांचा तपशिलाने विचार करणे आवश्यक आहे. याकरिता आपणास साहित्याची प्रकृती म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर समजून घेताना, साहित्याच्या म्हणून काही व्याख्या आहेत का? आणि असतील तर त्या कोणत्या? हे प्रथम समजून घेतले पाहिजे.

## १.४ साहित्याच्या व्याख्या

प्राचीन भारतीय काव्य मीमांसकांनी काव्याच्या म्हणजेच पर्यायाने साहित्याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितला आहेत.

**१) भामह :** साहित्याची व्याख्या सांगताना भामह या काव्यशास्त्र पंडिताने 'शब्दार्थौ सहितौ काव्यम्' असे म्हटले आहे. याचा अर्थ शब्द आणि अर्थ यांच्या साहाय्याने काव्याची पर्यायाने साहित्याची निर्मिती होते. भामहाच्या या व्याख्येतून शब्द आणि अर्थ यांचे साहित्य म्हणजेच एकत्रितपणा सूचित होतो. दैनंदिन जीवन जगत असताना व्यवहाराच्या सोयीकरिता आपण अनेक प्रकारचे शब्द वापरतो. या शब्दांचीच भाषा बनत असते. भाषेमुळेच आपल्या मनातील भावना विचार, कल्पना आपण इतरांपर्यंत पोहचवीत असतो. पण आपण हेही समजून घेतले पाहिजे; की भाषा म्हणजे केवळ निरर्थक शब्दांची साखळी नव्हे, तर अर्थपूर्ण भाषेचा तो एक सुंदर गजराच असतो. त्यामुळे साहित्याच्या निर्मितीतही शब्दाला आणि त्या शब्दाच्या विशिष्ट अशा अर्थाला अनन्यसाधारण असे महत्त्व असते. अर्थपूर्ण शब्दाची मालिका हे साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. म्हणूनच भामहाने साहित्याची व्याख्या करताना शब्द आणि शब्दाच्या अर्थाला महत्त्व दिले असल्याचे आपणास दिसते.

**२) दण्डी :** दण्डी या विद्वान पंडिताने 'शरीरं तावदिष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली' असे म्हटले आहे. या व्याख्येचे आपणास पुढीलप्रमाणे विवेचन करता येईल. इष्ट (योग्य) अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्यशैली. साहित्याची प्रकृती समजून घेताना या व्याख्येचे महत्त्वही ध्यानी घेणे आवश्यक आहे. साहित्यात पदांना म्हणजेच शब्दांच्या ओळींना महत्त्वाचे स्थान असते. पदांना चरण असेही म्हटले जाते. अर्थपूर्ण पदावली हे कवितेचे शरीर आहे. कविता वाचत असताना किंवा साहित्य वाचत असताना या पदांच्या ओळी रसिकांना जाणवल्या पाहिजेत. अर्थपूर्ण पदावली या कवितेचे शरीर असतात. शरीराच्या माध्यमातून जसे आपण माणसाच्या मनापर्यंत पोहचत असतो, तसेच कवितेतील पदांच्यामार्फत आपण कवितेच्या आशयापर्यंत अथवा गाभ्यापर्यंत पोहचत असतो.

**३) वामन पंडित :** साहित्याची व्याख्या करताना वामन पंडित म्हणतात, 'काव्यम् ग्राहम् अलंकारात। सौंदर्यम् अलंकारः। रीतिः आत्मा काव्यस्य। विशिष्टा पदरचना रीती।' साहित्यात शब्दालंकार आणि अर्थालंकार असतात. उदा. उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, छंद, अभंग, ओवी इत्यादी. अशा वेगवेगळ्या अलंकारांचा उपयोग लेखक, कवी आपल्या कलाकृतीच्या माध्यमातून करत असतात. साहित्यातील आशय लोकांना कळावा, आवडावा, समजावा यासाठी अलंकारांची योजना साहित्यात केलेली असते. अलंकारांमुळे साहित्यात सौंदर्य निर्माण होते. असे सांगून वामन पंडित पुढे म्हणतात, 'रिती हा काव्याचा आत्मा आहे.' विशिष्ट स्वरुपाच्या पदरचनेला साहित्यात महत्त्वाचे स्थान असते. यासंदर्भात आपणास बालकवींच्या 'औदुंबर' या कवितेचे उदाहरण देता येईल.

munotes.in

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळासावळा झरा वाहतो बेटाबेटातून

या रचनेत सुंदर पदे आहेत. अलंकार आहेत, आणि बालकवींची स्वतःची अशी सांगण्याची एक रीत आहे. त्यामुळे ही रचना वाचावयास आणि ऐकावयासही सुंदर वाटते. या अर्थाने पाहिले तर वामनांच्या या व्याख्येचे महत्त्व ध्यानी येते.

४) **रुद्रट :** रुद्रट या संस्कृत मीमांसकाने काव्याची व्याख्या करताना पुढीलप्रमाणे आपले मत प्रतिपादित केले आहे. ते म्हणतात, 'ननु शब्दाथौ काव्यम्'. रुद्रटाने काव्यातील म्हणजेच साहित्यातील शब्द आणि अर्थ या दोन गोष्टींना महत्त्वाचे स्थान दिले आहे. ही व्याख्या भामहाच्या व्याख्येशी बरीचशी मिळती जुळती आहे. भामहाने जसे साहित्यातील शब्दाला आणि शब्दांच्या अर्थाला महत्त्व दिले आहे तसेच महत्त्व रुद्रट यानेही दिले आहे. खरोखरीच शब्द आणि शब्दांचा अर्थ साहित्यात महत्त्वाचा असतो. असा दुजोरा या पंडिताने दिला असल्याचे त्याच्या व्याख्येवरुन आपणास दिसून येते.

५) **आनंदवर्धन :** आनंदवर्धन यांनी काव्याची प्रकृती स्पष्ट करताना 'काव्यस्य आत्मा ध्वनी' असे म्हटले आहे. ध्वनी म्हणजे सूचकता. साहित्यकृतीमधून जे अनेक अर्थ संभवू शकतात, ते सुचकता या गुणांमुळे. या ध्वनीमुळे किंवा सूचकतेमुळे साहित्यात अनेक अर्थ वाचकांना जाणवत असतात. 'गणपतवाणी', 'औदुंबर', 'प्रेम आणि मरण' या अनुक्रमे बा.सी. मर्ढेकर, बालकवी, गोविंदाग्रज यांच्या कविता वाचकांच्या चांगल्याच स्मरणात राहिल्या आहेत, त्या त्यातील सूचकता या गुणामुळे. कविता अनेकार्थक्षम असते. एक कविता अनेकांकडून अनेक अर्थानी वाचली जाते. अथवा एकच कविता एकाच व्यक्तीला पुनःपुन्हा वाचताना अनेक अर्थाची जाणीव होत राहते. कलावंत जितका संवेदनशील, सौंदर्यवृत्तीचा तितकी सूचकता त्या साहित्यिकाच्या साहित्यात प्रतिबिंबित होत असते.

६) **कुंतक :** आल्हाददायक पदबंधाला कुंतकाने साहित्याच्या निर्मितीत महत्त्वाचे स्थान दिले आहे. आल्हाददायक पदबंध म्हणजे पदांच्या किंवा चरणांची सुयोग्य बांधणी होय. 'शब्दार्थौ सहितौ वक्रकविव्यापारशालिनी बंधे व्यवस्तितौ काव्यम् तव्दिदाल्हादकारिणी' अशी व्याख्या कुंतक यांनी केलेली आहे. या व्याख्येचा विचार करता आपणास पुढीलप्रमाणे विवेचन करता येते. रसिकांना अथवा वाचकांना साहित्यकृतीचे वाचन करताना आनंद वाटेल, समाधान वाटेल त्यांच्या चित्तवृत्ती प्रसन्न होतील; अशा प्रकारच्या साहित्याची निर्मिती करणे कुंतक यांना अभिप्रेत आहे. अशा प्रकारच्या साहित्याची निर्मिती साहित्यातील पदांच्या अथवा चरणांच्या सुयोग्य बांधणीतून होत असते. त्यामुळे कुंतकाने आल्हाददायक पदांना साहित्य निर्मितीत दिलेले स्थान महत्त्वाचे वाटते.

७) **क्षेमेंद्र :** रस म्हणजेच भावना, साहित्यात भावनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. 'औचितस्य रसाजीवितभूतस्य' असे क्षेमेंद्र यांनी म्हटले आहे. कलेच्या अथवा ललित साहित्याच्या संसाराचा आधारस्तंभ म्हणजे भावना होय. भावनेशिवाय साहित्य ही कल्पनाच अशक्य कोटीतली आहे. भावनेचा विलास कोणत्याही साहित्यकृतीत आपणास पहावयास मिळतो. भावनेलाच संस्कृत पंडितांनी रस ही संज्ञा दिलेली आहे. भरताने 'नाट्यशास्त्र' या त्याच्या ग्रंथात रसाचे विस्तृत विवेचन केले आहे. हास्य, शोक, करुण, बिभत्स, शृंगार, वीर,

शांत, भक्ती असे रस साहित्यात असतात. विविध प्रकारचे नऊ रस साहित्यात आविष्कृत झालेले असतात असेही मानले जाते. साहित्याच्या माध्यमातून विविध रसांना प्रत्ययकारी करणे हे साहित्याचे महत्त्वाचे काम असते. असे प्रतिपादन क्षेमेंद्र यांनी केले आहे. रस ही भावनेचीच एक विशिष्ट अवस्था आहे. पाश्चात्त्य समीक्षेतही काव्यात EMOTIVE ELEMENT असे सांगितले गेले आहे. EMOTIVE ELEMENT म्हणजे भावनेला बांधणारे घटक. भावना अथवा भावनेचा आविष्कार आस्वाद्य असते म्हणजे साहित्यातील भावनेचे स्वरूप रसिक, वाचक चर्वणेच्या स्वरूपात घेत असतो. चर्वणा म्हणजे साहित्यातील भावना मानसिक पातळीवर सतत अनुभवत त्याचा आस्वाद घेणे होय.

**८) मम्मट :** मम्मट यांनी 'तत् अदोषौ शब्दार्थौ सगुणौ अनलंकृती पुनःक्वापि' अशी काव्याची व्याख्या सांगितली आहे. त्यांच्यामते दोषरहित, गुणयुक्त, क्वचित स्फूट, अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य होय असे सांगितले आहे. साहित्यातील निर्दोष रचनेला मम्मटाने महत्त्व दिले आहे. शिवाय साहित्य गुणयुक्त असले पाहिजे. म्हणजे ते सत्य, शिव, आणि सुंदर असले पाहिजे. हा विचार मम्मटाला अभिप्रेत असावा. साहित्य साधे सोपे प्रासादिक असावे. शब्दालंकार आणि अर्थालंकार यांचा अधिक भरणा साहित्यात नसावा. मोजक्याच आणि साहित्याच्या आशयाला पूरक ठरतील इतपतच अलंकार साहित्यात असावेत. याचा अर्थच असा की सुंदर, अर्थपूर्ण शब्दांना मम्मटांनी अधिक महत्त्व दिले आहे.

**९) विश्वनाथ पंडित :** विश्वनाथ पंडित या संस्कृत मीमासंकाने काव्याच्या स्वरूपाच्या संदर्भात 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' असे म्हटले आहे. क्षेमेंद्र यांनी जसे साहित्यातील रसाला म्हणजेच भावनेला महत्त्व दिले आहे, तसेच विश्वनाथ यांनीही रसपूर्ण वाक्य म्हणजे काव्य असे म्हटले आहे. साहित्यात भावनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे अनेक संस्कृत मीमांसकांनी साहित्यातील रसाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. साहित्यात जर भावनेचा अंश नसेल तर ते रूक्ष, कोरडे होईल. वाचकांच्या दृष्टीने साहित्याचे साहित्यपणच राहणार नाही. त्यामुळे विश्वनाथ पंडित यांनी रसाला स्थान दिले आहे, ते महत्त्वाचे वाटते.

munotes.in

**१०) जगन्नाथ पंडित :** जगन्नाथ पंडित या साहित्य मीमांसकाने साहित्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ते म्हणतात, 'रमणियार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम्' जगन्नाथ यांनी साहित्यातील रमणीय अर्थाला महत्त्व दिले आहे. या संदर्भात बालकवी यांच्या एका चरणाचा उल्लेख करता येईल. 'सौंदर्य दिसे जिथे। वृत्ती रमे माझी तिथे।।' रमणीय म्हणजे सुंदर, चांगले, श्रेष्ठ दर्जाचे असा अर्थ जगन्नाथ पंडित यांना अभिप्रेत असावा असे दिसते. जर सुंदर शब्दांच्या माध्यमातून आशयाचे प्रकटीकरण होत असेल; तर ते सुंदर साहित्य असा अर्थ या व्याख्येतून प्रतीत होतो.

साहित्याच्या प्रकृतीच्या संदर्भात विचार करता वरील व्याख्यांच्या आधारे आपणास साहित्य म्हणजे काय हे अधोरेखित करता येते. साहित्याची प्रकृती नेमकी कशी असते? साहित्याचा विचार करताना कोणकोणत्या गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात? या संदर्भात आपण वरील विवेचन केलेले आहे. साहित्याचे किंवा काव्याचे कोणतेही एकच एक लक्षण नसते. अनेक मुद्यांचा विचार साहित्याच्या निर्मितीच्या संदर्भात महत्त्वाचा असतो. साहित्याची निर्मिती आणि तिची आस्वादप्रक्रिया ही गुंतागुंतीची बाब असते. त्यामुळे पौर्वात्त्य समीक्षकांनी कुणी शब्द आणि अर्थ यांच्या एकरूपतेला महत्त्व दिले आहे, तर कुणी रितीला, सूचकतेला, रस म्हणजे भावनेला,

रमणीय अर्थाला. अशा अनेक गोष्टीच्या सुयोग्य वापरातून उत्कृष्ठ साहित्याची निर्मिती होत असते; हे आपण ध्यानी घेतले पाहिजे. यानंतर पाश्चात्त्य विचारवंतांनी साहित्याच्या प्रकृती संदर्भात जो विचार केला आहे तोही अभ्यासणे क्रमप्राप्त आहे.

## १.५ पाश्चात्त्यांचा काव्यविषयक विचार

साहित्याच्या स्वरूपाविषयी पाश्चात्त्यांच्या विचारांचाही आपणास मागोवा घेणे आवश्यक आहे. पाश्चात्य साहित्य शास्त्रज्ञांनीही साहित्याच्या प्रकृतीचा विचार करताना केवळ भावनेला महत्त्व दिले नाही तर त्या भावनेच्या आविष्काराला महत्त्व दिले असल्याचे दिसून येते. कवीची प्रतिभा आणि वैशिष्ट्यपूर्ण शब्दार्थ योजनेला इथे महत्त्व असलेले दिसून येते. या संदर्भात आपणास खालील व्याख्या पाहून त्या संदर्भात पुढील विवेचन करता येईल.

1. The language of the imagination and the passions - हॅजलिट
2. The best words in the best order - कोलरिज
3. The art of producing pleasure by the just expression of imaginative thought and felling in material language - कोर्ट हॉप
4. The rhythmic creation of beauty - एडगर ॲलन पो
5. The most delightful and perfect form of utterance that human words can reach - अर्नोल्ड
6. The spontaneous overflow of powerful fellings Emotion recollected in tranquility - वर्डस्वर्थ

साहित्याच्या स्वरूपाविषयी पाश्चात्त्यांच्या या व्याख्या पाहिल्या; तर असे दिसते, की बहुतेक सर्व व्याख्यांमधून भावना आणि कल्पना या दोन घटकांना महत्त्व दिले गेले आहे. साहित्यात लय आणि ताल असतो असेही काही व्याख्यांमधून सांगण्यात आले आहे. काही व्याख्यांमध्ये भावनेसोबत विचारालाही साहित्यात महत्त्वाचे स्थान असते; असे स्पष्ट करण्यात आले आहे. वर्डस्वर्थच्या व्याख्येत उत्कट भावनांच्या सहजोद्रेकाला महत्त्व दिले आहे. शिवाय साहित्यात मनन, चिंतन आणि नवनिर्मिती आवश्यक असल्याचे प्रतिपादनही करण्यात आले आहे. साहित्यात आविष्काराची पद्धत महत्त्वाची असते. काय सांगितले आहे, यापेक्षा साहित्यात कसे सांगितले आहे याला महत्त्व असते. या विचाराचे दर्शन वरील व्याख्यांमध्ये दिसते असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही.

## १.६ साहित्यकृतींची विविध अंगे :

साहित्याची व्याख्या समजून घेतल्यानंतर आपल्याला साहित्यकृतीच्या विविध अंगांची चर्चा करणे गरजेचे आहे. साहित्यकृतीची एकूण सात अंगे आहेत, ती पुढील प्रमाणे.

**१) भाषिक अंग :** भाषा हे कोणत्याही साहित्यकृतीचे एक महत्त्वाचे अंग असते. शब्द हे साहित्याचे मूलद्रव्य असते. लेखक, कवी आपल्या मनातील विचार, कल्पना, भावना यांना शब्दांद्वारे पर्यायाने भाषेद्वारे आविष्कृत करीत असतात. साहित्यकृतीच्या लेखनाचे माध्यम भाषा

असते आणि वाचकही भाषेच्या माध्यमातूनच कलाकृती समजावून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. भाषा ही संदेशवहनाचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. माणूस आणि मानवेतर प्राणीही वेगवेगळ्या खाणाखुणा करुन इतरांना नेहमी संदेश पाठवित असतात. यांनाच 'चिन्ह' असेही संबोधले जाते. भाषाही अशाच चिन्हांची बनलेली आहे. या चिन्हामुळेच भाषिक व्यवहार सुखकर झाला आहे. भालचंद्र नेमाडे यांनी भाषेचे तीन प्रकार मानलेले आहेत आणि ते महत्त्वाचे आहेत. भाषा ही व्यवहाराची, साहित्याची आणि शास्त्राची असते. अशी भाषेची त्रिसूत्री रचना केलेली आहे. बोलीभाषा आणि प्रमाणभाषा हे दोन प्रकारही समाजात सर्रास वापरात असल्याचे आपणास दिसते. व्यवहाराची भाषा आणि साहित्याची भाषा असे दोन शब्दप्रयोग आपण भाषेच्या संदर्भात वापरत असलो तरी या दोहोंमध्ये काटेकोर सीमारेषा आपणास दाखवता येत नाही. कारण भाषेचा वापर विविध स्तरांवर एकाच प्रसंगी होणे शक्य असते. प्रा. वा.ल. कुलकर्णी यांनी 'ललित वाङ्मयाची भाषा' या लेखात म्हटले आहे, "ललित वाङ्मयाच्या भाषेचे उद्दिष्ट अनुभव साक्षात करणे हे आहे. अनुभवावर मल्लिनाथी करणे, त्यावरुन निष्कर्ष काढणे, त्यांतून हाती लागलेल्या तत्त्वांची चर्चा करणे हे काम शास्त्राच्या भाषेचे असते."

साहित्याची भाषा प्रतिभा, कल्पना यांच्या आधारे साधलेली पुनर्निर्मिती असते. शब्दांच्या आधारेच साहित्यिक आपल्या अनुभवांना व्यक्त करीत असतात. त्यामुळे शब्दाला पर्यायाने भाषेला साहित्याच्या विश्वात अनन्यसाधारण महत्त्व येत असते. केवळ शब्द म्हणजे साहित्य नाही, हे आपण समजून घेतले पाहिजे. लेखकाच्या मनातील अनुभवाच्या आविष्कारासाठी त्याचे विशिष्ट भाषेत रुपांतर व्हावे लागते. म्हणून शब्दाचे ध्वनिरुप आणि अर्थरूप लक्षात घेणे फार महत्त्वाचे असते. त्यामुळेच 'शब्दार्थ' ही संज्ञा आपल्याकडे जाणीवपूर्वक वापरल्याचे दिसते. साहित्याच्या भाषेत यमकादी शब्दालंकार, अनुप्रास, शब्दबंध, वाक्यबंध, नादप्रतिमा, रूपक, प्रतिमा, प्रतीक इत्यादी घटकही येतात. अशा घटकांमुळे साहित्याची आशयात्मकता आणि वाचनीयताही वाढत असते.

साहित्याच्या भाषिक अंगाचा विचार करताना आपणास भाषेचे अनेकार्थत्व हा घटकही महत्त्वाचा मानला पाहिजे. या घटकामुळेच एकाच कलाकृतीचे अनेक अर्थ संभवतात. बालकवींच्या 'औदुंबर' या कवितेचे यासंदर्भात नेमके उदाहरण देता येते. या आठ ओळींच्या कवितेचे विविध समीक्षकांनी अनेक प्रकारचे अर्थ लावलेले आहेत; आणि ते सर्व त्यांच्या परीने खरेच आहेत. म्हणूनच साहित्याची भाषा ही व्याकरणा पलीकडचे अर्थाधिक्य व्यक्त करते. तसेच तिच्या ठिकाणी अर्थव्यक्तीची समृद्धीही आढळते. निव्वळ संदेशवहनाचे कार्य ती करीत नाही. अनेकार्थत्व हा तिचा खास विशेष असतो. असे विधान प्रा. अरविंद वामन कुलकर्णी यांनी केले आहे आणि ते सार्थ वाटते. साहित्याच्या विविध अंगांचा विचार करताना अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या तीन शब्द शक्तींचाही विचार करणे आवश्यक असते. चांगला साहित्यिक आपल्या लिखाणात या शब्द शक्तींचा चांगला वापर करत असतो. म्हणूनच 'लेखक तशी शैली' असे विधान साहित्याच्या संदर्भात केले जाते. कारण शब्दांची निवड, प्रमाणभाषेचा आणि बोलीभाषेचा चपखल वापर आणि या सर्वांची सुयोग्य मांडणी, कल्पनेचा विशिष्ट असा आविष्कार लेखकागणिक वेगवेगळा असतो.

**२) आशयात्मक अंग :** साहित्याच्या एकूणच स्वरूपाचा विचार करु जाता साहित्यकृतीचे भाषिक अंग जसे अत्यंत महत्त्वाचे असते तसेच आशयात्मक अंगही महत्त्वाचे असते. साहित्यकृतीची प्रकृती आशयप्रधान असते. आशयातूनच कलाकृतीतील अर्थ उलगडला जात

munotes.in

असतो. केवळ शब्द म्हणजे साहित्य नव्हे तर त्या शब्दांच्या माध्यमातून लेखक कोणता आशय प्रकट करतो हे महत्त्वाचे असते. साहित्यातील आशयाच्या समृद्धीसाठी लेखकाचे अनुभवविश्व संपन्न असणे गरजेचे असते. लेखकाचे अनुभवविश्व जितके समृद्ध असते. तितके त्याने निर्माण केलेले साहित्य परिणामकारक असते. तथापि केवळ अनुभव विश्वाची समृद्धता असेल तर ती साहित्यकृती समृद्ध ठरेल असेही म्हणता येत नाही. म्हणून लेखकाला आलेला किंवा त्याने घेतलेला अनुभव तो कशाप्रकारे आशयात रुपांतरित करतो; हे महत्त्वाचे असते. माणसाचे मन, मानवी जीवन, त्या जीवनातील गुंतागुत, जीवनातील संघर्ष आदि गोष्टींविषयी वाचकाला विलक्षण कुतूहल असते. हे कुतूहल शमविण्याचे काम साहित्य करीत असते. साहित्यात प्रतिबिंबित होणारे हे विश्व आशयाच्या अंगाने विचार करु जाता किती संपन्न आहे; यावर कलाकृतीचे श्रेष्ठत्व ठरत असते.

रा.भा. पाटणकर यांनी त्यांच्या 'सौंदर्यमीमांसा' या ग्रंथात अलौकिकतावाद आणि लौकिकतावाद ही संकल्पना मांडली आहे. यातील लौकिकतावाद हे धृव साहित्यकृतीच्या मानवी जीवनाशी संबंधित आहे. कलाकृतीतील आशयाच्या महत्त्वामुळे साहित्यकला लौकिकतावादाकडे झुकलेली आहे असे ते सूचित करतात. तेन या फ्रेंच समीक्षकाने मांडलेले 'युगप्रवृत्ती' हे सूत्रही समाजाच्या वाटचालीत निर्माण होणाऱ्या प्रत्येक युगाचे एक सूत्र असते. ते साहित्यात आशयाच्या रूपाने प्रतिबिंबित होत असते. अशा आशयाचे प्रतिपादन तेन यांनीही केले आहे. या संदर्भात संत, पंत, तंत साहित्याची निर्मिती शिवाय इंग्रजी आक्रमणानंतरची आणि स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर साहित्याचे स्वरूप पाहिले; तर कलाकृतीतील आशय कालखंडानुरुप कसा आविष्कृत झाला आहे याची प्रचीती येते. साहित्य आणि समाज यांचे नाते जटिल आणि गुंतागुंतीचे असले तरी साहित्याला समाज जीवनाचा आधार असतो, हे मान्य करावे लागते. हा समाजजीवनाचा आधारच साहित्यात आशयात्मक रूप घेऊन अवतरत असतो. प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध यांचे या संदर्भातील विचार महत्त्वाचे ठरतात. साहित्यविचार आणि समाजचिंतन या ग्रंथात ते म्हणतात, "समाज म्हणजे व्यक्तींचा समूह वा व्यक्तींची गोळाबेरीज नव्हे. समाजाला स्वतंत्र अशी अंतर्गत रचनाही आहे. ती विवक्षित आर्थिक संबंधातून निश्चित होते. समाज विकासाच्या प्रक्रियेत धार्मिक, नैतिक, सामाजिक, कलाविषयक इ. रूढी व कल्पना निर्माण झालेल्या असतात. त्या सर्वांचा प्रवाह समाज देहातून वाहात असतो. याची जाणीव ठेवून साहित्यनिर्मिती अधिकाधिक परिणामकारक करणे हे साहित्याचा आशयात्मक अंगाच्या आविष्कार महत्त्वाचे असते." म्हणूनच आशयाची परिणामकारकता साहित्यनिर्मितीत अत्यंत महत्त्वाची समजली जाते.

**३) रुपबंधात्मक / संरचनात्मक अंग :** साहित्याच्या स्वरुपाचा विचार करताना साहित्याचे सर्जन आणि समीक्षा ही दोन अंगे लक्षात घ्यावी लागतात. कांटच्या सौंदर्यशास्त्रामध्ये रुप ही संकल्पना सौंदर्यानुभवाच्या केंद्रस्थानी मानलेली होती. कलाकृतीच्या रुपाचा विचार म्हणजेच घाटाचा विचार होय. घाट, आकार, आकृतिबंध हे शब्दही रुप या शब्दाला पर्याय म्हणून वापरले जातात. संरचनावादाचा संबंध प्रामुख्याने भाषेशी निगडित आहे. संरचनावादाचा उगम फेर्दिना द. सोस्युर यांच्या 'सामान्य भाषाशास्त्राचा अभ्यास' (१९१५) या ग्रंथात आहे. संरचनावादाचा विचार मानवंशशास्त्रातील एक चळवळ म्हणून प्रथमतः युरोपभर पसरला. भाषा ही केवळ लिहिण्याशी अथवा बोलण्याशी संबंधित नसून ती समाजातील चिन्ह आणि चिन्हीकरण यांच्याशी संबंधित आहे. संरचनावादात प्रत्येक गोष्ट ही कोणत्या तरी सामाजिक संकेतांनी बनलेली असते. त्याला चिन्हीकरण असे म्हणतात. ही चिन्हे समाजमान्य असतात. भाषा ही चिन्ह पद्धती

अथवा संरचना असून त्यातला प्रत्येक घटक इतर घटकांच्या संदर्भात अर्थपूर्ण ठरत असतो. संरचनेच्या संदर्भात 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश' या ग्रंथात पुढील विवेचन केले आहे, 'सर्व प्रकारच्या वाङ्मयनिर्मितीची रुपे आणि अर्थ नियंत्रित करणारे 'व्याकरण' तयार करणे आणि भाषाविज्ञान ज्याप्रमाणे भाषेचा विचार करणारे शास्त्र आहे; तसे वाङ्मयाचा विचार करणारे काव्यशास्त्र रचणे हे संरचनावादी समीक्षेचे मुख्य उद्दिष्ट आहे.' संरचनेच्या बरोबरच आपणास रुपवादाचाही विचार करणे आवश्यक आहे.

मराठी साहित्यात बा.सी. मर्ढेकर यांनी प्रथमतः रूपवादी विचार मांडला. रूप हा शब्द फॉर्म या शब्दाला पर्याय म्हणून वापरला जातो. साहित्याचा विचार हा अभिव्यक्ती आणि आशय या अनुषंगाने करावा लागतो. साहित्यनिर्मिती प्रक्रियेत अलंकार, प्रतिमा-प्रतीके, वृत्त, लय, रचना, हे अभिव्यक्तीचे (फॉर्म) घटक असून भाव, अर्थ, विचार, कल्पना तत्त्व, दृष्टिकोण हे आशयाचे (कन्टेन्ट) घटक मानले जातात. या संदर्भात संज्ञा-संकल्पना कोशात पुढील उल्लेख आलेला आहे, 'फॉर्म म्हणजे साहित्यकृतीची संघटना करणारा मध्यवर्ती घटक, मराठीतला रूप हा आशय आणि अभिव्यक्ती यातल्या द्वंद्वाचा निरास करणारा असा शब्द आहे. आशय आणि अभिव्यक्ती या दोन वेगवेगळ्या गोष्टी नाहीत; त्यापैकी कोणतीही एक गोष्ट दुसरीशिवाय अस्तित्वात असत नाही, त्या दोन्ही एकात्म असतात. असा विचार रूप या संकल्पनेमागे आहे. साहित्यकृती हा एक रूपबंध आहे असे मानून तिची समीक्षा करणारी पद्धती म्हणजे 'रूपनिष्ठ समीक्षापद्धती' असे स्थूल मानाने म्हणता येते.' हे ध्यानी घेतले तर आपणास असे म्हणता येते की, रूप या संकल्पनेच्या आधारे साहित्यकृतीची कलात्मकता, साहित्यातले साहित्यत्त्व आणि साहित्याचे सौंदर्य आणि हे सौंदर्य निर्माण करणारे घटक यांचा शोध या समीक्षा पद्धतीद्वारे घेतला जातो. कोणतीही साहित्यकृती ही पूर्णतः स्वतंत्र (स्वायत्त) वस्तू असते; शिवाय साहित्यकृतीला सेंद्रिय किंवा एकजिनसी रूपबंध असतो. ही दोन तत्त्वे रूपनिष्ठ समीक्षापद्धतीत गृहीत धरली जातात. या समीक्षापद्धतीत साहित्यकृतीतील सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक प्रभावांकडे तसेच धर्म, नीती याकडे दुर्लक्ष केले जाते आणि साहित्यकृतीवरच अधिक लक्ष केंद्रित केले जाते. म्हणून कलाकृतीचे अर्थनिर्णयन करताना साहित्यबाह्य संदर्भाचा आश्रय घेतला जाऊ नये, तसेच तिच्या सौंदर्याचे मूल्यमापन करताना साहित्यबाह्य निकषांचा, मूल्यांचा आधारही घेतला जाऊ नये अशी भूमिका रूपबंधाच्या संदर्भात घेता येते. मर्ढेकरांनी या तत्त्वांनाच 'लयतत्त्वे' असे म्हटले आहे. शिवाय लेखकाच्या आणि वाचकांच्या मनाच्या विचारांपेक्षा या समीक्षापद्धतीत संरचनेचा वेध घेण्याचा प्रयत्न केला जातो. शिवाय साहित्यकृतीतील शब्दांवर लक्ष केंद्रित केले जाते. साहित्यातील विशेषतः कवितेतील शब्द, अर्थ, नादमयता, लयबद्धता, अलंकार, अनेकार्थता यांना या समीक्षापद्धतीमुळे अधिक महत्त्व येत गेले. साहित्यकृती ही एखाद्या सेंद्रिय जीवाप्रमाणे कार्य करत असते, त्यामुळे लेखक आणि त्याचे मन यांचा विचार कलाकृतीची समीक्षा करताना न पाहता जी साहित्यकृती लेखकाने लिहिलेली आहे त्या संहितेचे सूक्ष्म वाचन करुन संहितेतल्या लहान सहान घटकांचाही विचार करणे आवश्यक आहे. कारण कवितेतील विधानात, तिच्यातील तार्किक बंधात संरचना असते आणि त्या विशिष्ट अशा संरचनेमुळे कवितेला घाट अथवा आकार प्राप्त होत असतो. कारण कवितेला तिची स्वतःची विशिष्ट अशी संरचना असते. काव्य लेखनानंतर कवीचे काम संपते आणि ती कविता सर्वांची होती. कवितेतला अनुभव वाचकांचा होतो. या विशिष्ट असा अनुभव ज्यामुळे आलेला असतो त्याचे मूळ आपणास या संरचनेत सापडते. कवितेला बांधणारे अनेक घटक हे कोणत्यातरी अंतरिक घटकांनी बांधलेले असतात. त्यामुळे गंगाधर पाटील या संदर्भात म्हणतात, 'साहित्यकृतीचा सेंद्रिय रूपबंध हा तिच्या आशयातून, काव्यार्थातून, तिच्या अंगभूत गुणांतून सहजपणे, उद्भवतो, आणि त्या अर्थांना

संघटित करीत असतो.' अशा स्वरूपाची समीक्षा मराठीत अत्यल्प आहे. बा.सी. मर्ढेकर, माधव आचवल, प्रभाकर पाध्ये, गंगाधर पाटील, म.सु. पाटील यांनी अशाप्रकारची समीक्षा केली आहे.

**४) कल्पकतेचे अंग :** कोणत्याही साहित्यप्रकाराला वास्तवाचा भरभक्कम आधार असला तरीही साहित्याची सुंदरता जपण्यासाठी तिच्यावर कल्पनेचे कलम हे करावेच लागते. त्यामुळे साहित्याची परिपूर्णता कल्पकतेच्या अंगाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. साहित्यातील भावनेला त्या जोडीनेच कल्पकतेला अथवा कलात्मकतेला अनेक साहित्यशास्त्रवेत्यांनी महत्त्वाचे स्थान दिले. आहे. साहित्याचे जग हे एकप्रकारचे कल्पित जग असते. ही संकल्पना तशी वादग्रस्त आहे. यातूनच मग कलेसाठी कला (ना.सी.फडके) आणि जीवनासाठी कला (वि.स.खांडेकर) असा वाद निर्माण झाला, आणि साहित्य वर्तुळात तो गाजलाही. या वादाने टोकाचा आग्रह धरला होता. याचा अर्थ असा नाही की, साहित्यात केवळ कल्पनेच्या भराऱ्या असतात. वास्तव आणि कल्पना यांचा गोफ साहित्यात गुंफलेला असतो. समाजाचे जसेच्या तसे प्रतिबिंब कोणत्याही साहित्यप्रकारात पडत नसते; हे आपण ध्यानी घेतले पाहिजे. कारण लेखक अथवा कवी जो अनुभव घेतो त्याची कलाकृतीच्या आधारे तो एक प्रकारची पुनर्स्थापना करीत असतो. अनुभव वस्तूच्या आधारे त्यांने निर्मिलेली सृष्टी संपूर्णतः नवी असते. ती त्याची स्वतःची तर असतेच; पण ती सर्वांचीही होऊ शकते. उदा. निसर्ग, गवत, गवतावरील फूल सर्वांनीच पाहिलेले असते. पण बालकवी या विषयावर 'फुलराणी' ही कविता लिहितात. आपण आजही कित्येक वर्षांनी त्या कवितेचा आस्वाद घेतो. त्यामुळे कलाकृती एकाच वेळी विशिष्ट आणि विश्वात्मक असते. ते या कल्पकतेच्या गुणांमुळे असेही आपण म्हणू शकतो. साहित्याच्या प्रांतातील अशी अनेक उदाहरणे आपण सांगू शकतो. त्यामुळे आपणास या विवेचनावरुन असे म्हणता येते की, लेखकाच्या ठायी असलेली प्रतिभाशक्ती किंवा कल्पनाशक्ती यामुळे लेखकाने घेतलेल्या प्रत्यक्ष जीवनानुभवाचे वास्तव अनुभवात रूपांतर होते आणि तो अनुभव शब्दबद्ध होत असताना या अनुभवावर कल्पनेचे कलम होते. लेखकाने घेतलेल्या वास्तवपूर्ण अनुभवाचे कलानुभवात रूपांतर होते. यासंदर्भात प्रा. वा.ल. कुलकर्णी यांनी फार छान दाखला दिला आहे; ते म्हणतात, "जीवन आणि साहित्याची सृष्टी यांच्यातील संबंध माता आणि तिच्या उदरात वाढणारा गर्भ यांच्यात असणाऱ्या संबंधाप्रमाणे आहे. गर्भ मातेच्या उदरात वाढतो, त्या उदरातून लाभणाऱ्या जीवनरसावर त्याचे पोषण होते हे खरे; पण त्या गर्भाचे अस्तित्व स्वतंत्र असते, स्वायत्त असते. मानवी जीवन हे मातेप्रमाणे असून साहित्याचे विश्व तिच्या उदरात वाढणाऱ्या गर्भासारखे आहे. या साहित्याचे अस्तित्व स्वतंत्र आहे, स्वायत्त आहे; पण त्याचे पोषण मात्र जीवनातून प्राप्त होणाऱ्या अनुभवरूपी रसातूनच होते!" वरील विवेचनावरुन आपणास असे म्हणता येते की साहित्यात जसे वास्तवाला महत्त्व असते तसेच कल्पकतेच्या अंगालाही महत्त्व असते. साहित्याचा प्रांत कल्पनेशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

**५) प्रकारात्मक अंग :** लेखकाच्या मनातला आशय अनेक प्रकारांनी व्यक्त होत असतो. तो कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, ललित अशा अनेक अंगांनी व्यक्त होत असतो. कवी, कलावंत यांनी घेतलेल्या अनुभवातूनच तो अनुभव साहित्याच्या एखाद्या प्रकारामधून आविष्कृत होत असतो. साहित्याचे अनेक प्रकार असले तरी काव्य, कादंबरी व नाटक हे साहित्याचे ठळक प्रकार मानले जातात. आविष्काराच्या संदर्भात विश्वात्मक म्हणून ज्या तीन पद्धती सांगितल्या जातात त्या पद्धतींशी हे साहित्याचे प्रकार जोडले गेलेले आहेत. त्या तीन पद्धती पुढीलप्रमाणे सांगता येतील. १) काव्यात्म, २) नाट्यात्म आणि ३) कथनात्मक या त्या तीन पद्धती विचारात घेऊनच साहित्यकृतींची निर्मिती केली जाते. याकरिता

लेखकाचे वाचन, चिंतन आणि संस्कार यांचा परिणाम गृहीत धरला जातो. हे सारे विचारात घेऊन आपणास प्रकारात्मक अंगाचे स्पष्टीकरण करता येईल.

मराठीतच नव्हे तर जगभर अनेक भाषांमध्ये अधिकांशाने काव्यलेखन केले जाते. या प्रकारातच अनेक उपप्रकारही पडतात. जसे की अभंग, ओवी, भारुड, आर्या, लावणी, पोवाडे, श्लोक, गझल, मुक्तछंद अशा अनेक प्रकारांत काव्यनिर्मिती केली जाते. काव्याच्या संदर्भात विचार करु जाता आपणास भावना हा घटक प्राधान्याने लक्षात घ्यावा लागतो. काव्य हा भावनाप्रधान साहित्य प्रकार आहे. संस्कृतातील 'रसकल्पना' आणि इंग्रजीत 'Emotive quality' या संज्ञा भावनेशीच संबंधित आहेत. कवितेत भावनांची अभिव्यक्ती असते. भावनेसोबतच कवीचा अनुभव, त्याचे व्यक्तिमत्त्व, कल्पना इत्यादींचे प्रतिबिंब कवितेत उमटत असते. तथापि इतर वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत वाच्यार्थापेक्षा कवितेत व्यंगार्थाला म्हणजेच सूचितार्थाला अधिक महत्त्व असते. कवितेत रूपाला आणि भाषेलाही महत्त्व असते. शिवाय इतर साहित्य प्रकारांप्रमाणेच आशयालाही महत्त्व असते. कारण साहित्य ही आशयवादी कला आहे. कवीच्या व्यक्तिमत्त्वाला काव्यात महत्त्वाचे स्थान असते. इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा कवीच्या मनातला अनुभव कवितेतच अधिक समृद्धपणे व्यक्त होत असतो. आशय आणि अभिव्यक्तीचे एकरूपत्व कवितेत प्राधान्याने दिसते. यासंदर्भात प्रा. अरविंद वामन कुलकर्णी यांनी कवितेच्या संदर्भात नेमके भाष्य केले आहे. ते म्हणतात, "आशयाभिव्यक्तीच्या अभिन्नत्वामुळे काव्याचे शंभर टक्के भाषांतर जवळ जवळ शक्य नाही असे म्हणण्यात येते. काव्याबाबत असे दिसते, की कवितांचे अनेक प्रकार असल्याने सर्वांना सामावेल असे सूत्र शोधणे खरेच कठीण आहे. पण असे म्हणता येते की, काव्यातून सर्वसाधारणपणे व्यक्त होतो तो काव्यानुभव. या रचनेला कथात्मकतेची जोड मिळाली की ते कथाकाव्य होते. रचनेची विशिष्ट शिस्त लाभली की सुनीत किंवा एखादा विशिष्ट रोख दिला की उद्देशिका किंवा विलापिका." आपले बहुतांश वाङ्मय हे काव्यबद्ध आहे. कारण प्राचीन काळी मुद्रणकला प्रगत नव्हती. कवितेच्या तालबद्धता, लयबद्धता आणि नादमयता या गुणांमुळे मनातला आशय आठवणीत ठेवणे आणि एका पिढीकडून तो दुसऱ्या पिढीकडे सोपविणे शक्य होत असे. मुद्रण कलेचा शोध लागल्यानंतर मात्र पद्याप्रमाणेच गद्यात्मक लेखनही मोठ्या प्रमाणात लिहिले जाऊ लागले.

नाटक हे जसे संहितात्मक असते तसेच ती एक सादरीकरणाची कला आहे. ते एक दृश्यकाव्य आहे. हा प्रकारही आपल्या साहित्यपरंपरेत खूप प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. संस्कृत साहित्यातही भरतमुनी, कालिदास व इतर अनेक कवींनी नाटकावर आधारित आणि नाटकांचेही लिखाण केले आहे. मराठी साहित्य परंपरेतही गोंधळ, दशावतार, तमाशा आदी लोकपरंपरेत नाटकाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न झाला आहे. इंग्रजी आगमनानंतर हा कलाप्रकार अधिक लोकप्रिय झाल्याचे दिसते. नाटकाला जसा साहित्याचा संदर्भ आहे तसाच तो प्रयोगाचाही आहे. त्यामुळेच नाटक हा एक प्रयोगसिद्ध कलाप्रकार मानला जातो. साहित्य, संगीत, नृत्य, चित्र आणि शिल्प या पाचही कलांचा उत्कृष्ठ मिलाफ नाटकांमध्ये पहावयास मिळतो. कथा, कादंबरी अथवा काव्य हा प्रकार जसा एकट्याने आस्वाद घेण्याजोगा असतो तसे नाटकाचे नसते. नाटक ही कला समूहाने समूहासाठी केलेली कला असते. नाटकाच्या सादरीकरणातून जो नाट्यानुभव व्यक्त होतो थेट प्रेक्षकांसमोर व्यक्त होत असतो. त्यामुळे नाटकाला जिवंत कला असेही म्हटले जाते. चित्रपटात आपण जी दृश्ये पाहतो त्या दृश्यांचे चित्रिकरण पूर्वी केव्हा तरी झालेले असते. आपण पडद्यावर पाहतो तो केवळ आभास असतो. नाटकाचे मात्र तसे नसते. नाटक सादर करणारी प्रेक्षकांसमोरील माणसे खरीखुरी असतात.

नाटकाचे कथानक, पात्रसंयोजन, अंक, प्रवेश, स्थल, प्रसंग, संघर्ष, प्रारंभ-मध्य-शेवट असे घटक मानले जातात. या सर्व घटकांच्या सुंदर मेळातून चांगले नाटक आकारास येत असते. नाटक आनंदपर्यवसायी म्हणजे सुखात्म आणि दुःखपर्यवसायी म्हणजे दुःखात्म असते. प्रहसनात्मकही नाटके सादर करण्यात आलेली आहेत. या संदर्भात बबन प्रभू यांचे नाव गौरवाने घेतले जाते. नाटक मनोरंजनासोबतच प्रबोधनाचेही काम नेटकेपणाने करते. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, मामा वरेरकर, मो. ग. रांगणेकर, विजय तेंडुलकर, सतीश आळेकर, महेश एलकुंचवार, गो.पु. देशपांडे दत्ता भगत, शफाअत खान, जयंत पवार आदी अनेक नाटककारांनी मनोरंजनाबरोबरच समाजाचे प्रबोधनही केले आहे. आजच्या कालखंडात काही समीक्षकांनी नाटक हा साहित्यप्रकार न मानता तो एक स्वतंत्र कलाप्रकार मानावा अशीही भूमिका घेतलेली दिसते. कारण नाटकाचे मूलद्रव्य केवळ निवेदनाची भाषा नसून 'संवाद' आहे आणि माध्यम 'स्थल कालसापेक्ष अभिनय' आहे असेही सांगण्यात येते. नाटकाची व्यावसायिक, प्रायोगिक अशीही वर्गवारी करण्यात येते. नाटकांच्या सर्व संकेतांना झुगारुन देणारा न-नाट्य हाही एक नवा प्रकार विशेषतः १९८० नंतरच्या दशकात सुरु झाल्याचे दिसते. मात्र पाश्चात्त्य रंगभूमीच्या तुलनेत हा प्रकार मराठीत विशेष रूढ झाल्याचे दिसत नाही. नाटक, एकांकिका, दीर्घांक, नभोनाट्य, नाट्यछटा इत्यादी प्रकारांमध्ये नाट्यलेखन केले जाते.

कादंबरी हा साहित्याचा प्रकारही आधुनिक कालखंडात बराच लोकप्रिय झाला आहे. डॉ. वि.ना. ढवळे यांनी कादंबरीविषयी 'साहित्याचे तत्त्वज्ञान' या ग्रंथात विस्तृत विवेचन केले आहे. कादंबरी हा इतर वाङ्मयप्रकारात सर्वात विस्तृत आणि अनेक उपप्रकार सामावणारा एक महत्त्वाचा प्रकार आहे. इंग्रजी आगमनानंतर हा साहित्यप्रकार आपल्याकडे अधिक प्रमाणात लिहिला जाऊ लागला. तसे पाहिले तर कादंबरीला कोणताही विषय वर्ज नसतो. कोणत्याही विषयावर कादंबरी लेखन केले जाते. म्हणूनच कोणताही एक ठराविक आकृतीबंध या प्रकाराला नसतो. जीवनातील सर्वच ज्ञानशाखांशी या वाङ्मय प्रकाराचा संबंध असतो.

साहित्य प्रकारांमधील कथा आणि कादंबरीला लोकप्रिय साहित्य प्रकारचा दर्जा मिळालेला आहे. कारण वाचकांची कोणत्याही प्रकारची जिज्ञासा हे प्रकार शमवू शकतात. लेखकाच्या मनातील आशयाला आविष्कृत करण्यासाठी एक प्रकारचा मुक्त अवकाश कादंबरी देत असते. वाचकांना आशयाची व्याप्ती कळावी आणि त्यांची वाचनाची आवडही जोपासली जावी यासाठी कादंबरीचा लेखक नेहमी निवेदनावर भिस्त ठेवत असतो. कथानक, पात्र योजना, वातावरण निर्मिती, संवाद, संघर्ष, भाषाशैली या घटकांचा समर्पक वापर चांगला कादंबरीकार करीत असतो. कादंबरी लेखन करता करता चांगला लेखक एकप्रकारे जीवनावर भाष्य करीत असतो.

**६) कलात्मक अंग :** साहित्यकृतीचे यथायोग्य आकलन करायचे झाले तर साहित्यकृतीच्या कलात्मक अंगाकडे दुर्लक्ष करुन चालत नाही. त्यामुळे साहित्यकृतीचे साहित्यपरंपरेतील स्थान निश्चित होत असते. साहित्यकृतीचा विचार करताना साहित्यमूल्ये आणि जीवनमूल्ये यांचा विचार करावा लागतो. साहित्यकृतींमधून अभिव्यक्त होणाऱ्या या दोन गोष्टींमध्ये कलात्मकता अभिव्यक्त होत असते. साहित्यकृतीचा अथवा कलाकृतीचा आस्वाद घेत असताना वाचक, प्रेक्षक आणि समीक्षक यांनी विशिष्ट अशी तटस्थता बाळगणे अभिप्रेत असते. ही तटस्थताच कलाकृतीच्या कलात्मक अंगाकडे पहावयास शिकविते. कलात्मक तटस्थ किती असावे ही गोष्ट कलाकृतीच ठरवत असते. साहित्यकृती शब्द, भाषाशैली, प्रतिके आणि प्रतिमा अशा अनेक

अंगांनी विकसित होत असते. कलाकृतीकडे वाचकांनी किती अंतरावरुन पहायचे हे त्या साहित्यकृतीतूनच ठरेल अशा युक्त्याप्रयुक्त्यांची चपखल योजना लेखकाने केलेली असते. कलाकृतीच्या कलात्मक अंगांचा आस्वाद घेताना अथवा समीक्षा करताना व्यक्तिगत आवडीनिवडी दूर ठेवाव्या लागतात. अशा तटस्थतेमुळे कलाकृतीच्या कलात्मकतेचा अनेकांगांनी शोध लागत असतो. कलाकृतीच्या विशिष्ट अशा परिणामकारतेकरिता लेखकाने आशय आणि आविष्कारच्या परिणामकारतेसाठी नेमक्या कोणत्या गोष्टींचा वापर केला आहे हे जर पहावयाचे असेल तर केवळ मनोरंजनाच्या अथवा व्यक्तिगत आवडीनिवडीच्या पलीकडे जाऊन कलाकृतीचे मर्म समजून घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असते. त्यामुळे कलाकृतीच्या कलात्मकतेचा प्रत्यय येतो. यासंदर्भात वसंत पाटणकर यांनी 'साहित्यशास्त्र स्वरूप आणि समस्या' या ग्रंथात मांडलेले विचार महत्त्वाचे वाटतात ते म्हणतात, "साहित्यकृतीतून घडणारे जीवनदर्शन, तिच्यातील व्यक्तिरेखा, विचार, जीवनमूल्ये इत्यादी सर्व गोष्टी म्हणजे तिची द्रव्यसामग्री वा आशयद्रव्य असते. या द्रव्याचे जे अलौकिक रूप सिद्ध होते, त्यावर साहित्यकृतीची कलात्मकता, चांगलेपण अवलंबून असते. ही द्रव्यसामग्री जितकी विविध, सखोल, अनेक अंगे असलेली असेल त्या प्रमाणात साहित्यकृतीचे रूप अधिक गुंतागुंतीचे, व्यामिश्र, समृद्ध असेल. म्हणजेच घाटाची, रूपाची व्यामिश्रता, समृद्धता साहित्यिक श्रेष्ठतेचा, महत्तेचा निकष ठरतो." वसंत पाटणकर म्हणतात तसे साहित्यकृतीच्या श्रेष्ठतेचा विचार करावयाचा असेल तर कलाकृतीच्या सर्व घटकांकडे विलक्षण तटस्थेतेने पाहिले पाहिजे. ही तटस्थताच आपणास कलाकृतीतून व्यक्त होणाऱ्या कलात्मकतेकडे घेऊन जाते. शिवाय वाचक प्रेक्षकांच्या अनुभवाच्या कक्षा अशा कलात्मकतेमुळे रुंदावत असतात.

या संदर्भात मुद्दा समजून घेण्याकरिता आपणास उदाहरणादाखल नाटक या प्रकाराचा थोडक्यात विचार करता येईल. नाटकाचा अभ्यास दोन पातळ्यावर करता येतो. नाटकाला संहितामूल्य आणि प्रयोगमूल्य असते असे म्हटले जाते. नाटकातल्या संहितेचा विचार कलात्मकतेने जसा करता येतो. तसाच प्रयोगमूल्यांचा विचारही कलात्मकतेच्या अंगाने करता येतो. नाटकाची सुरुवात, मध्य आणि शेवट नाटककाराने कसा केला आहे. संवादाचे स्वरूप कसे आहे. नाटकाचा आशय काय आहे आणि तो कशाप्रकारे सांगितला आहे. असा विचार नाटकाच्या संहितेच्या अंगाने करता येतो आणि यातही कलात्मकतेचा विचार नाटककाराने केला आहे का याचा शोध घेता येतो. तसेच नाटकातील पात्रे, पात्रांची रंगभूषा आणि वेशभूषा, नेपथ्य, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना या अनुषंगानेही विचार केला जातो. नाटकाच्या एकूण परिणामकारतेकरिता या सर्व साधनांचा का आणि कसा उपयोग नाट्य लेखक आणि नाट्यदिग्दर्शक यांनी केलेला आहे. याचा विशिष्ट अशी तटस्थता राखून अभ्यास केला तर कलात्मकतेची विविध अंगे आपणास जाणवू लागतात. हे जाणवणे परिणामकारक व्हायचे असेल तर आपल्या व्यक्तिगत आवडीनिवडी दूर कराव्या लागतात.

**७) सत्ताशास्त्रीय अंग :** समाजातील प्रत्येक गोष्टीला तिचे म्हणून स्वतःचे असे अस्तित्व असते. या असण्याचे स्वरूप म्हणजेच त्या विशिष्ट अशा गोष्टीची सत्ता होय. साहित्यकृतीचेही तिचे म्हणून एक प्रकारचे सत्ताशास्त्रीय अंग असते - अस्तित्व असते. ती सत्ता समाज मनावर अधिराज्यही गाजवत असते. त्या सत्तेचे स्पष्टीकरण, समीक्षा अथवा मीमांसा करणारे शास्त्र म्हणजे सत्ताशास्त्र होय. आधिभौतिक, व्यावहारिक आणि प्रतिभासिक अशा तीन सत्ता प्रामुख्याने मानल्या जातात. या संदर्भात 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश' यामध्ये पुढील विवेचन करण्यात आले आहे, 'प्लेटोच्या मते प्रत्येक वस्तूच्या अस्तित्वामागे त्या वस्तूचे केवळ बुद्धिगम्य असे सत्व

असते. या सत्त्वामुळे त्या वस्तूला ती विशिष्ट वस्तू म्हणून अस्तित्व लाभते. ही आधिभौतिक सत्ता होय. प्रत्यक्षातील वस्तू, काल व अवकाश यांच्या चौकटीत असतात व ज्ञानेंद्रियांनी आपण त्यांचा अनुभव घेऊ शकतो. ही व्यावहारिक सत्ता होय. काल व अवकाश यांच्यात स्थान नसणाऱ्या, पण भासरूप पातळीवर अस्तित्वात असणाऱ्या गोष्टी किंवा मृगजळासारखी गोष्ट ही प्रातिभासिक सत्ता होय. कलाकृतीचे या तीनपैकी कोणते सत्ताशास्त्रीय स्थान आहे? हा सौंदर्यशास्त्रातील एक प्रश्न आहे.' कोणत्याही कलाकृतीच्या संदर्भात सत्ताशास्त्रीय स्थानाचा विचार करता सर्वच कलाकृतींना एकच एक सत्तास्थान असते; हे मत स्वीकारता येत नाही.

साहित्य, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प या मूळ पाच कला आहेत. या कलाकृतींमधून निर्माण होणाऱ्या संवेदना आणि त्यांचा आस्वाद यांचे स्वरूप वेगवेगळे असते. ताजमहाल ही एक अतिशय सुंदर कलाकृती आहे. ही कलाकृती काल आणि अवकाश यांच्या अस्तित्वात आहे. पण कादंबरी अथवा कथा हा साहित्यप्रकार पाहता या प्रकारांना काल आणि अवकाशाचे गणित जसेच्या तसे लावता येत नाही. काही कलाकृतीत वास्तवदर्शी चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केलेला असतो. कोणतीही चांगली कलाकृती ही प्रतिभा आणि वास्तव, कल्पना अशा गोष्टींच्या व्यामिश्रतेने निर्माण होत असते. त्यामुळे कलेच्या बाबतीत कोणतेही एकच एक सत्ताशास्त्रीय उत्तर शोधणे म्हणूनच शक्य नसते. क्रोचे या मीमांसकाने 'कलाकृती या मानसिक असतात.' असे मत मांडले आहे. क्रोचे यांचे हे मत एखाद्या साहित्यकृतीला लागू पडते तेवढे एखाद्या शिल्पकृतीला लागू पडेलच याची खात्री देता येत नाही. कलाकृतीच्या प्रकारानुसार माध्यम बदलत असते. संगीताचे माध्यम स्वर अथवा सूर हे असते. साहित्यकृतीचे माध्यम शब्द हे असते. रंग, रेषा आणि आकार हे चित्रकलेचे माध्यम असते. कलाकृतींमध्ये कुठे संवेदनेला महत्त्व असते तर कुठे रचनेला महत्त्व असते. त्यामुळे कलाकृतीच्या सत्तास्थानाच्या संदर्भात अनेक मीमांसकांनी परस्पर विरोधी मते मांडलेली आहेत. वॉरेन व वेलेक यांनी, 'कलाकृती व कविता ही केवळ मानसिक घटना नाही' असे म्हटले आहे. त्यांच्या मते कविता म्हणजे आदर्शांची समष्टी किंवा प्रमाणकांची संरचना होय. ही प्रमाणके समाजमानसात रूजलेली असतात; आणि तीच साहित्यात अवतरत असतात. याच प्रकारे सी.एम.जोड यांनी 'सौंदर्य हे वस्तुगत आहे' असे मानले तर आय.ए.रिचर्डस यांनी 'कलाकृती ही वाचकांच्या मनात अस्तित्वात असते.' असे म्हटले आहे. या सर्वांवरुन आपणास असे म्हणता येते की, सर्वच कलांचे सत्ताशास्त्रीय स्थान एकाच प्रकारचे नसते.

सौंदर्यमीमांसा या ग्रंथात रा. भा. पाटणकर यांनी कलाकृतीच्या सत्ताशास्त्रीय अंगाच्या संदर्भात विस्तृत विवेचन केले आहे. या विवेचनाचा आधार घेऊन आपणास असे म्हणता येते की, कवितेच्या अथवा कोणत्याही साहित्यकृतीच्या सौंदर्याच्या संदर्भात आस्वादाच्या पातळीवर विचार करता कोणताही एकच एक नियम नसतो. तो प्रत्येकाचा अर्थातच वेगवेगळा असतो. एकाच घटना प्रसंगांच्या संदर्भात प्रत्येक व्यक्तीची प्रतिक्रिया जशी वेगवेगळी असते; तशीच वेगवेगळी प्रतिक्रिया एका कवितेचीही असू शकते. उदाहरणार्थ बालकवींच्या औदुंबर या कवितेचे उदाहरण देता येईल. या एकाच कवितेवर असंख्य प्रतिक्रिया विचारवंत समीक्षकांनी नोंदविलेल्या आहेत. म्हणून "वाङ्मयीन कलाकृती मानवमनसापेक्ष ठरते. विशिष्ट सांस्कृतिक प्रवाहातच तिचे अस्तित्व संभवते व त्या पुरतेच ते मर्यादित असते." हे विधान सार्थ वाटते.

## १.७ साहित्यकृतींमधील अनुभवांची वैशिष्ट्ये

साहित्यकृती ही अनुभव घेण्याची कृती असते. या अनुभवांची वैशिष्ट्ये आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) आत्मनिष्ठा :** आत्मनिष्ठेला आत्मपरता असेही म्हणतात. शास्त्रीय लेखनात वस्तुनिष्ठतेला महत्त्व असल्याने तिथे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला स्थान नसते. त्यामुळे तिथे आत्मनिष्ठतेचा प्रश्न निर्माण होत नाही. ललित साहित्याच्या लेखनात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला महत्त्व असते. असे साहित्य जर यथार्थ व्हायचे असेल तर मात्र आत्मनिष्ठता हे वैशिष्ट्य महत्त्वाचे ठरते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा साहित्यकृतीतून उमटत असल्यामुळे संबंधित लेखन लेखकाशी निगडित असते. म्हणूनच अशा प्रकारच्या लेखनाला आत्मपर स्वरूपाचे लेखन असे संबोधले जाते. साहित्य प्रकारानुसार आत्मपर लेखनाचे स्वरूपही भिन्न प्रकारचे असते. कवितेच्या प्रांतात ते अधिक असते तर कादंबरीसारख्या प्रकारात ते तुलनेने कमी असते. तथापि कोणत्याही लेखकाने आपल्या आत्मपर अनुभवाशी तादात्म्य पावणे, एकरुप होणे आवश्यक असते.

स्थूलमानाने आत्मनिष्ठा म्हणजे लेखकाचे आपल्या अनुभवाशी असलेले प्रामाणिकपणाचे नाते होय. लेखकाच्या आत्मनिष्ठतेच्या संदर्भात बा.सी. मर्ढेकर यांनी 'वाङ्मयीन महात्मता' या निबंधात विस्ताराने लिहिले आहे. त्यांनी दोन प्रकारची आत्मनिष्ठा मानली आहे. लेखनपूर्व आत्मनिष्ठा आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठा हे ते दोन प्रकार आहेत. मर्ढेकरांच्या मते, साहित्यातील आत्मनिष्ठा हे एखादे नैतिक आधारतत्त्व नसून ती एक मानसिक अथवा आंतरिक स्थिती आहे. कोणताही लेखक त्याला आलेले अनुभव, त्याच्या आयुष्यात घडलेल्या घटना प्रसंग ही सामग्री घेऊनच साहित्यनिर्मिती करत असतो. या निर्मितीला उपकारक ठरेल अशा कल्पनेचीही मदत तो घेत असतो. हे सर्व करताना तो आपल्या अनुभवाशी किती प्रामाणिक राहतो, हे महत्त्वाचे असते. कलावंत जर आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहिला नाही तर त्याची कलाकृती कृत्रीम ठरण्याची शक्यता असते. वाचकाच्या मनावर अपेक्षित परिणाम उमटविण्यात ती अपयशी ठरण्याची शक्यता असते. त्यामुळे साहित्यकृतीच्या निर्मितीत लेखकाने आपल्या अनुभवाशी कलात्मक तादात्म्य पावण्याची गरज निर्माण होते. साहित्यनिर्मितीच्या या प्रक्रियेला आपण स्थूलमानाने लेखनपूर्व आत्मनिष्ठता असे म्हणू शकतो. त्याच बरोबर लेखक, कवी, कलावंताने घेतलेला अनुभव की ज्या अनुभवाने लेखकास लिहिण्यास प्रवृत्त केले आहे अशा आत्मिक अनुभवाची मांडणी करताना लेखकाने लिखाणात त्या अनुभवाशी प्रतारणा न करणे, त्यामुळे ज्या अनुभवाची मांडणी लेखकाला करावयाची असते; तो अनुभवच मुळात स्पष्ट असणे आवश्यक असते. आपल्याला नेमके काय मांडायचे आहे याचे पुरते भान लेखकाला असणे आवश्यक असते. हे भानच जर अस्पष्ट असेल, लेखकच जर अनुभवाची मांडणी करताना गोंधळलेला असेल, तर तो अनुभव यथार्थपणे कलाकृतीचे रूप घेऊ शकत नाही. त्यामुळे लेखकाने स्वतःशी तर प्रामाणिक असलेच पाहिजे शिवाय घेतलेल्या अनुभवाची मांडणी करतानाही त्याने स्वतःशी आत्मनिष्ठ असले पाहिजे. म्हणूनच चांगल्या साहित्यकृतीची निर्मिती करताना तिची सुरुवात जशी आत्मनिष्ठेने व्हावयास हवी तसाच साहित्यकृतीचा शेवटही आत्मनिष्ठेतच होणे अपेक्षित असते. या अनुषंगाने आत्माविष्कार आणि आत्मनिष्ठता यातील फरकही ध्यानी येणे गरजेचे आहे. आत्माविष्कार म्हणजे अनुभवाची मांडणी अथवा सादरीकरण

असे मानले तर आत्मनिष्ठता म्हणजे मांडणीतील अथवा सादरीकरणातील मूळ अनुभवाशी प्रामाणिकता असे मानले पाहिजे.

**२) सेंद्रीय एकात्मता :** साहित्यातील सेंद्रिय एकात्मता अथवा सेंद्रीयत्व या संकल्पनेला इंग्रजीत Organic Unity असे म्हटले जाते. तसे पाहिले तर सेंद्रीयत्व हा शब्द प्राणिशास्त्रगत शब्द आहे. तथापि ब्लादिमार वाइडले यांनी तो साहित्याच्या एकसंघत्वाच्या संदर्भात वापरला आहे. साहित्याच्या सेंद्रीयत्वाची संकल्पना सर्वप्रथम ॲरिस्टॉटलने वापरली. साहित्यकृतीच्या निर्मिती प्रक्रियेत अनेक घटकांचा सहभाग असतो. जसे की कथा, पात्रे, निवेदन, संवाद, संघर्ष, भाषाशैली, तसेच शब्दालंकार, अर्थालंकार इत्यादी घटकांच्या सुयोग्य रचनेमुळे कलाकृतीत एकजिनसीपणा येत असतो. मानवी शरीराच्या संदर्भात विचार करताना जसे हात, पाय, नाक, डोळे, कान इत्यादी अनेक अवयव गृहीत धरलेले असतात. या सर्वांचा मिळून जसा माणूस तयार होतो. तसेच साहित्यकृतीच्या संदर्भातही वरील घटक साहित्यकृतीचे साहित्यत्व ठरवत असतात. त्यामुळेच अनेकत्वातून होणारी एकत्वाची प्रतीती असे सेंद्रीय एकात्मतेचे स्वरूप असते. साहित्याच्या अनुभवात असलेल्या भिन्न भिन्न घटकांचा एकात्म संस्कार या संकल्पनेत अभिप्रेत आहे.

अशा प्रकारच्या संघटनेतील प्रत्येक घटक महत्त्वाचा असतो. साहित्यनिर्मितीत केवळ कथानक अथवा भाषाशैली असा एखादाच घटक महत्त्वाचा नसतो. प्रत्येक घटकाचे महत्त्व इथे अपेक्षित असून एक घटक दुसऱ्या घटकास कसा पूरक ठरतो, ते महत्त्वाचे असते. हा एकसंघपणा जितका परस्परपूरक तितकी कलाकृती यशस्वी असे मानावयास हरकत नाही. कलाकृतीची समीक्षा करताना म्हणूनच कलाकृतीच्या केवळ एकाच अंगाचा विचार करुन चालत नाही. तर कलाकृतीच्या निर्मितीतील प्रत्येक घटक कलाकृतीच्या उत्तम बांधणीसाठी कसा महत्त्वाचा ठरतो आहे; असा समग्रतेचा विचार या संकल्पनेत अभिप्रेत आहे. Organic या शब्दाचा अर्थही आपणास 'सुव्यवस्थित संघटना' हेच सुचवितो. म्हणजेच साहित्यकृतीत प्रत्येक घटक महत्त्वाचा असतो. प्रत्येक घटकाला एक प्रकारचे स्वयंपूर्ण अस्तित्व असते. अशा अनेक स्वयंपूर्ण भागाचे मिळून एक पूर्ण होत असते. कोणतीही चांगली कलाकृती ही अशाप्रकारे एक पूर्ण असते. या एका पूर्णात अनेक घटकांचे स्वयंपूर्णत्व सामावलेले असते. कलाकृतीच्या वाचकावर, आस्वादकावर अथवा नाटकाच्या संदर्भात विचार करता प्रेक्षकावर या पूर्णाचा एकात्म संस्कार होत असतो. या एकात्म संस्कारालाच सेंद्रीय एकात्मता असे म्हटले जाते.

**३) भाषेची वैशिष्ट्यपूर्णता :** भाषा आणि साहित्याचे परस्परपूरक असे अतूट असे नाते आहे. आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना इतरांना समजाव्यात या उद्देशाने माणसांनी आदिम कालखंडापासून काही चिन्हांची निर्मिती केली. या चिन्हांना समाजमान्यता मिळाली आणि भाषेचा उगम झाला. जीभ, ओठ, घसा, टाळू यांच्या साहाय्याने स्वरांवर कमी अधिक जोर देऊन विशिष्ट स्वरांची आणि ध्वनींची निर्मिती माणसाने गरजेपोटी केली. यानंतर माणसाने लिपी निर्माण केली. भाषेबरोबरच माणसाची विचार करण्याची क्षमताही विकसित होत गेली आणि भाषेच्या आधाराने कला, साहित्य, शास्त्र आदींचीही निर्मिती होत गेली. भाषेचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. व्यवहारभाषा, शास्त्रीय साहित्याची भाषा आणि ललित साहित्याची भाषा हे ते तीन प्रकार आहेत. आपण थोडक्यात ललित साहित्याच्या भाषेचा विचार इथे करणार आहोत.

कोणताही लेखक त्याला आलेल्या अनुभवांना भाषेच्या माध्यमातून आविष्कृत करत असतो. त्यामुळे अनुभवांना शब्दरुप देणे हे ललित साहित्याच्या भाषेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट उत्तम साहित्यिक अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या तीन शब्दशक्तींच्याद्वारे मांडण्याचा प्रयत्न करत असतो. यासंदर्भात वा.ल. कुलकर्णी यांनी नेमके निरिक्षण नोंदविले आहे. ते म्हणतात, "रोजच्या व्यवहारातील बोलण्यात भावना डोकावू लागली की तिचे स्वरूप बदलते. ती बोलणाऱ्याची 'स्वतःची भाषा' बनू लागते, आत्मनिष्ठ होते. त्यामुळे ती ललितवाङ्मयाच्या भाषेजवळ जाते. पण ललितवाङ्मयाच्या भाषेचे उद्दिष्ट केवळ भाव व्यक्त करणे नसून भावानुभाव साक्षात करणे हे असते. ती भाषा चित्रमयी, विविध संवेदनासूचक असते. प्रत्येक भावानुभवाला एक लय, एक ताल असतो. तोही भाषेद्वारा गोचर होणे अपेक्षित असते. त्यामुळेच प्रत्येक साहित्यकृतीची भाषा वेगळी असते." वा.ल. कुलकर्णी यांनी व्यवहाराची भाषा आणि साहित्याची भाषा यातील फरक या प्रकारे नेमका स्पष्ट करुन सांगितला आहे.

व्यवहाराची भाषा एकच एक अर्थ सूचित करत असते. कारण व्यवहार सुलभता हे या भाषेचे मुख्य उद्दिष्ट असते. शिवाय विचार, संकल्पना, तर्क, वस्तुनिष्ठता यांना शास्त्रीय भाषेत महत्त्वाचे स्थान असते. कारण शास्त्रीय भाषेतील संकल्पना प्रयोगांवर आधारलेल्या असतात. त्यामुळे एका पातळीवर त्यांना विश्वात्मक रूप प्राप्त झालेले असते. तथापि ललित साहित्याच्या भाषेचे तसे नसते. या भाषेतून विचार, कल्पना, भावना, अनेकार्थता, सूचकता, नाद, लय, ताल, अलंकार, प्रतिमा, प्रतीके यांची सृष्टी कवी निर्माण करत असतो. कलावंतांची निर्मिती ही नवनिर्मिती असते. प्रतिभेच्या जोरावर साहित्यिक जणू काही नवी सृष्टीच निर्माण करीत असतो. साहित्यिकाच्या कल्पनाशक्तीमुळे भाषेच्या लवचिकतेच्या गुणामुळे भाषेच्या स्थिर रूपातही बदल घडत असतो. ललित साहित्याची भाषा एकाच वेळी व्याकरणाचे बंधनही झुगारत असते. त्यामुळे ललित साहित्याची भाषा ही निश्चित वेगळी असते. त्यामुळे व्यक्ती तितक्या प्रकृती या नियमाप्रमाणेच लेखक तितक्या त्याच्या भाषा-शैली असे म्हणता येते. वरील प्रकारच्या काव्यात्म चिन्हांमुळे साहित्यात सौंदर्यनिर्मिती होत असते.

**४) विशिष्टता आणि सार्वत्रिकता :** साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव एकाच वेळी विशिष्ट असतो आणि त्याचवेळी तो सार्वत्रिकही असतो. साहित्यातील ही सार्वत्रिकता म्हणजेच विश्वात्मकता होय. ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे हे दोन महत्त्वाचे विशेष आहेत असे म्हटले पाहिजे. शास्त्रीय साहित्यात सार्वत्रिकता असते, म्हणजेच तो अनुभव सर्वांचाच असतो. शास्त्रीय नियम कोणत्याही काळी कोणत्याही ठिकाणी एकसारखेच असतात. ते बदलत नाहीत. शास्त्रीय साहित्यातला अनुभव कोणा एकट्याचा असत नाही. कारण शास्त्रीय शोध लावणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्या शोधावर नसतो. तसा अनुभव सर्वार्थाने सर्वांचा असतो. साहित्याचे तसे नसते. साहित्याचा अनुभव व्यक्तिसापेक्ष असतो. व्यक्तिपरत्वे तो बदलत असतो. त्यामुळेच साहित्यातील अनुभवाला विशिष्टता लाभलेली असते. उदाहरणादाखल केशवसुत यांनी लिहिलेल्या तुतारी या कवितेचे देता येईल. या कवितेत कवी म्हणतात, 'एक तुतारी द्या मज आणून फुंकिन मी ति स्व प्राणाने' केशवसुतांनी एका तुतारीची मागणी स्वतःसाठी केली आहे; असे वरकरणी दिसते आणि त्यात वावगे असेही काही नाही. पण या कवितेच्या अनुषंगाने विचार करता एवढाच संकुचित अर्थ केशवसुत यांना अभिप्रेत नसावा असेही वाटते. म्हणून हा अनुभव केशवसुत यांचा व्यक्तिगत आहे त्यामुळेच तो विशिष्ट असा आहे. पण ही कविता लिहून पूर्ण झाली, प्रकाशित झाली आणि ती समस्त वाचकांची झाली. त्यांनाही आणि आपणासही अन्यायाच्या विरोधात अशी तुतारी हवी आहे असे वाटू लागले तर तो अनुभव केवळ

केशवसुत यांचा एकट्याचा राहत नाही; तर तो सर्वांचा होतो. ललित साहित्याचा अनुभव जसा व्यक्तिसापेक्ष असतो तसाच तो व्यक्तिनिरपेक्षही असतो. त्यामुळे केशवसुतांचा अनुभव विश्वात्मक होतो. म्हणजेच कलाकृती एकाच वेळी विशिष्टही असते आणि सार्वत्रिकही असते.

साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव कवीचा खाजगी अथवा वैयक्तिक असतो. पण साहित्यनिर्मिती झाल्यावर साहित्यिकाच्या अनुभवातील वैयक्तिकता गळून पडत असते आणि तो अनुभव सर्वच वाचकांचा बनतो. नाटकाच्या संदर्भातही आपण या मुद्याचा विचार स्पष्ट करु शकतो. नटसम्राट हे वि.वा. शिरवाडकर यांचे गाजलेले नाटक आहे. ते एक वृद्ध झालेल्या नटाच्या आयुष्यावर आधारित आहे. पण हे नाटक पाहताना या नाटकातील दाहक असा अनुभव केवळ एका नटाचा उरत नाही; तर कोणत्याही देशातील, कोणत्याही प्रांतातील वृद्धाच्या वाट्याला आलेल्या शोकात्म अनुभवाशी तो एकरुप होतो. म्हणून तो अनुभव एकाच वेळी एका नटाचा तर आहेच पण तो आपल्याच घरात अपमानित झालेल्या समस्त वृद्धांचाही होऊ शकतो. म्हणूनच तो अनुभव विशिष्ट आणि सार्वत्रिक म्हणजेच विश्वात्मकही आहे. ललितेतर साहित्याचे मात्र तसे नसते. कारण अशा साहित्यातील अनुभव हे त्यातील वैचारिक, तर्काधिष्ठित अनुभवामुळे सार्वत्रिक झालेले असतात. ललित साहित्याचा अनुभव, त्याचा आस्वाद घेताना मात्र लेखक, कवीच्या व्यक्ती वैशिष्ट्याच्या अभावीही आपणास घेता येतो.

**५) साहित्याचे माध्यम आणि साधन यातील फरक :** भाषा हे ललित साहित्याचे माध्यम आहे की साधन आहे या प्रश्नावर बराच खल झालेला आहे. काही तज्ज्ञ भाषेला साहित्याचे माध्यम मानतात तर काही विद्वान भाषेला साहित्याचे साधन मानतात. भालचंद्र नेमाडे यांच्यासारख्या काही विचारवंतांनी हा प्रश्न 'अनाठायी आहे' असेही मत मांडलेले आहे. कोणत्याही कलेची निर्मिती करताना त्याला आवश्यक अशी सामग्री लागते. जसे की लोहाराचा घण, चित्रकाराचा ब्रश आणि रंग, शिल्पकाराची छन्नी आणि हातोडी. याचप्रमाणे साहित्याच्या निर्मितीकरिताही सामग्रीची आवश्यकता असते. साहित्यनिर्मितीसाठी आवश्यक अशी सामग्री कोणती ? तर शब्द, अर्थ, प्रतिमा, अलंकार इत्यादी सामग्रीच्या मदतीने कवी, लेखक साहित्याची निर्मिती करीत असतात. साहित्याच्या सामग्रीच्या संदर्भात विचार करता, इतर कलाप्रकारांप्रमाणे उदा. छन्नी, हातोडा, रंग इत्यादींप्रमाणे भाषेची सामग्री अथवा भाषा जड वस्तू नाही. ती माणसांची एक जन्मजात स्वयंनिर्मिती आहे. त्यामुळे साहित्य हे माध्यम की साधन हा प्रश्न निर्माण होतो. म्हणूनच वेलेक् व वॉरेन म्हणतात, "इतर कलांहून साहित्याची वेगळीक अशी की, साहित्यकलेला स्वतःचे असे खास माध्यम नाही व या कलेची अनेक मिश्ररुपे आणि सूक्ष्म संक्रमणे निसंशयपणे अस्तित्वात असतात." वेलेक् व वॉरेन यांनी कलाकृतीतील मिश्ररूपे आणि सूक्ष्म संक्रमणे यांना महत्त्व दिले आहे आणि ते रास्तही आहे.

साहित्याच्या भाषेच्या अनुषंगाने विचार करता साहित्याची भाषा ही रोजच्या बोलण्यातील व्यवहारातील भाषा नसते. तर ती भाषेचे सौंदर्याने संस्कारित झालेले एक रूप असते. कोणताही कवी, साहित्यिक त्याला आलेला अमूर्त असा अनुभव वाचकांच्या मनात संक्रांत करीत असतो. या अर्थाने तो त्याला आलेला अनुभव भाषेच्या माध्यमातून प्रकट करीत असतो. त्यामुळे भाषेला माध्यम असे म्हटले गेले आहे. तसेच जर कवीचा अनुभव नुसता समजून देण्याचे काम भाषेने केले असेल तर ते अर्थातच साधन होईल. उदाहरणार्थ निबंध या वाङ्मय प्रकारामध्ये समजून सांगण्याला महत्त्व असते. या अनुषंगाने विचार करता भाषा हे साधन ठरते. म्हणूनच भाषा हे एकाचवेळी साहित्याचे साधनही ठरते आणि माध्यमही ठरते असे आपण म्हणू

शकतो. भाषा ही साधन की माध्यम या संदर्भात भालचंद्र नेमाडे यांनी ही संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे, "भाषा ही अर्थवहनाचे कार्य करते. भाषा या साधनाची परिणती माध्यमात होते. व्याकरणाचे नियम सांभाळीत हे कार्य जोवर भाषा करते तोवर ती साधन असते आणि जेव्हा ते कार्य करुन भाषा आणखी काही अर्थ प्रकट करु लागते तेव्हा ती माध्यम बनते. या क्षणी ती (नुसती अर्थसापेक्ष न राहता) घाटसापेक्ष वा रूपसापेक्ष होऊ लागते." त्यामुळेच साधन की माध्यम हा प्रश्न भालचंद्र नेमाडे यांना अनाठायी वाटतो. भावकवितेत भाषा माध्यम म्हणून काम करते, तर नाटक आणि निबंधात ती साधन म्हणून काम करते आणि कादंबरी सारख्या प्रकारात भाषा साधन आणि माध्यम दोन्हीही असते.

भाषा ही माध्यम की साधन या अनुषंगाने विचार करता, आपणास पुढे असेही म्हणता येते की, कथा, कविता, नाटक, कादंबरी, निबंध अशा साहित्य प्रकारात भाषा ही केवळ भाषा म्हणून अवतरत नाही, तर साहित्यनिर्मिती प्रक्रियेत भाषेचे प्रतिमाखंडात रूपांतर होते. कवितेच्या बाबतीत तर ते अधिकच होते आणि ती माध्यम स्वरुपाची होते. त्यामुळे आपणास असे म्हणता येते की, भाषा हे साहित्याचे मूलद्रव्य आणि साधनच आहे. तथापि भाषेचे प्रतिमा, प्रतिके, अलंकार इत्यादीत रुपांतर झाले की त्याला साहित्याचे माध्यम म्हणता येईल.

**६) साहित्याचा घाट :** घाट या शब्दाला प्रतिशब्द म्हणून आकार असे म्हणतात. इंग्रजीत या शब्दाला form असे म्हणतात. form ही संज्ञा प्रकार, रचना, संघटना, आकार, आकृतिबंध, पद्धती, तंत्र, शैली, अभिव्यक्ती, रूप अशा अनेक अर्थाने वापरली जाते. कलाकृतीच्या घाटाच्या संदर्भात वसंत पाटणकर म्हणतात, "कलाकृती वा साहित्यकृती ही विविध प्रकारच्या अनेक घटकांनी बनलेली असते. या अनेक घटकांना बांधणारे, संघटित करणारे वा एकत्रित करणारे नियम, तत्त्व वा तत्त्वे कोणती या प्रश्नाचा शोध आपण घेत असतो. या तत्त्वालाच principle of form असे म्हटले जाते. साहित्याचा घाट असे म्हणताना आपल्याला तिचे रूप म्हणजेच रचना, संघटना, आकार, आकृतिबंध, अभिव्यक्ती इत्यादी अभिप्रेत असते. घाट ही संज्ञा कलासाहित्याच्या क्षेत्रात या विशिष्ट अर्थाने योजत असतो." कलाकृतीच्या घाटाच्या संदर्भात विचार करता वसंत पाटणकरांचे हे विवेचन महत्त्वाचे वाटते. घाट या शब्दात प्रमाणबद्धता, व्यवस्थितपणा, बांधेसूदपणा हा अर्थ सामावलेला आहे. बा.सी. मर्ढेकरांनी त्यांच्या 'सौंदर्य आणि साहित्य' या ग्रंथात "कलाकृतीचे सौंदर्य हे त्यात आविष्कृत झालेल्या फॉर्मवर, सुसंघटनेवर, तिच्या घडणीवर, किंवा घाटावर अधिष्ठित असते. कोणत्याही कलाकृतीचा घाट किंवा रूपबंध त्या कलाकृतीत अंतर्भूत असलेल्या अनुभवाशी निगडित असतो." अशा आशयाचे प्रतिपादन केले आहे.

कलाकृतीच्या घाटाच्या संदर्भात अनेक विचारवंतांनी विस्ताराने 'घाट' या तत्त्वाचे विवेचन केले आहे. ॲरिस्टॉटलने आदि-मध्य-अंताचे तत्त्व सांगितले आहे. तसेच कांटने अनेकतेत एकता, क्लाइव्ह बेलने अर्थपूर्ण रूपबंध अशा तत्त्वांचा विचार मांडला आहे. शिवाय कलाकृतीच्या अंतर्गत सुसंगती, सेंद्रिय एकात्मता, आशय-अभिव्यक्ती यांच्यातील एकजीवत्व, अनेकार्थता, विरोधभास, ताण वा संघर्ष, अपरिचितीकरण अशी अनेक तत्त्वेही घाटाच्या संदर्भात योजलेली आहेत. पौर्वात्य आणि आधुनिक साहित्य समीक्षेतही या अनुषंगाने बराच विचार झालेला दिसून येतो. वक्रोक्ती, ध्वनी, औचित्य विचार तसेच बा.सी. मर्ढेकर यांनी मांडलेली संवाद, विरोध, समतोल ही लयतत्त्वे अशा तत्त्वांचा कलाकृतीच्या 'घाटा'संदर्भात विचार करता येतो.

या मुद्यांच्या अनुषंगाने वरीलपैकी सर्वच मुद्यांचा विचार इथे करणे शक्य नाही. तथापि स्पष्टीकरणादाखल आपण ॲरिस्टॉटलने दिलेल्या एका तत्त्वाचा थोडक्यात विचार करु. कोणतीही चांगली कलाकृती ही एक स्वयंपूर्ण समष्टी किंवा पूर्ण असायला हवी अशी ॲरिस्टॉटल यांची कलाकृतीकडून अपेक्षा आहे. कलाकृतीच्या आटोपशीरपणाबद्दल त्यांनी विस्ताराने चर्चा केली आहे. कलाकृतीचा आकार आशयानुरुप असावा. तो इतका मोठा अथवा लहान असू नये की ज्यामुळे कलाकतीचे आकलन होण्यास बाधा निर्माण व्हावी यासाठी त्यांनी एक उदाहरण दिले आहे. एका धान्याच्या कणावरील चित्र असो किंवा कित्येक मैल लांबीचे चित्र असो त्याचे आकलन या अशा आकारामुळे शक्य होणार नाही. त्यामुळे कलाकृतीचा आकार महत्त्वाचा असतो. असे ॲरिस्टॉटला वाटते. याच बरोबर कलाकृतीची सुरुवात, मध्य आणि कलाकृतीच्या शेवटही अत्यंत महत्त्वाचा आणि एकजिनसी असला पाहिजे; अशा अर्थाचे प्रतिपादनही त्यांनी केलेले आहे. तो उत्कंठावर्धक आणि चढत्या भाजणीचा असला पाहिजे. नाटक या कलाप्रकाराकरिता हा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. नाटकाचा शेवट जर उत्कंठावर्धक व्हायचा असेल तर नाट्यवस्तूची गुंफण नाटककाराला विचारपूर्वक करणे आवश्यक ठरते. नाटकाच्या शेवटचा अंदाज जर पहिल्याच प्रवेशास आला तर वाचक प्रेक्षकांची जिज्ञासा नाटकाच्या अखेरपर्यंत राहणार नाही. तेव्हा आधी काय आणि कसे सांगायचे, मध्यंतर कधी करायचा आणि शेवट कसा करायचा हे नाटकाच्या घाटाच्या संदर्भात जसे महत्त्वाचे आहे तसेच ते इतरही साहित्यकृतीसाठी ही गरजेचे असल्याचे प्रतिपादन ॲरिस्टॉटलने केल्याचे दिसून येते. कोणतीही सुरचित कथावस्तू वाटेल तिथे सुरु होत नसते आणि वाटेल तिथे संपतही नसते. कारण ती आदी-मध्य-अंत या तत्त्वानुसार बांधलेली असते. तात्पर्य काय तर घाट म्हणजे साहित्यकृतीतील विविध घटकांची सुयोग्य जुळणी करणारा घटक आणि या जुळणीचे 'रूप' होय. अर्थातच कोणत्याही चांगल्या कलाकृतीत घाटाला अनन्यसाधारण महत्त्व असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'ललित' साहित्य म्हणजे काय ते सांगा ?

## १.८ समारोप

साहित्याच्या प्रकृतीच्या अनुषंगाने विचार करता आपणास साहित्य या प्रकाराच्या स्वरूपाविषयी किती खोलवर विचार करावा लागतो ते दिसून येते. साहित्य ही संज्ञा आपण बरेचदा अत्यंत सढळपणे वापरतो. पण या संज्ञेत किती घटक अंतर्भूत असतात, हे पाहिले तर थक्क व्हायला होते. कारण प्राचीन काळापासून या संज्ञेविषयीचा विचार अनेक विचारवंत पंडितांनी केलेला आहे. या संदर्भात पौर्वात्य आणि पाश्चात्त्य अशा दोन परंपरा आपणास दाखवता येतात. या दोन्ही परंपरांनी आपणास साहित्याच्या वैशिष्ट्यपूर्ण अंगांचा परिचय करुन दिला आहे. त्यांनी शब्द, अर्थ, भावना, लयबद्धता, अनेकार्थता, सूचकता, जीवनभाष्य अशा अनेक घटकांच्या विवेचनातून साहित्याची वैशिष्ट्ये सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात त्यांनी साहित्याच्या व्याख्याही सांगितलेल्या आहेत.

munotes.in

साहित्यकृती समजून, आकलन करुन घेण्यासाठी, तिची समीक्षा करण्यासाठी साहित्यकृतींच्या विविध अंगांचा परिचय असणे खूप गरजेचे असते त्यामुळे साहित्यातील भाषा नेमकी कसे काम करत असते? आशय आणि अभिव्यक्ती यात लेखक कसा सुसंवाद साधत असतात? कलावंतांच्या कल्पकतेला साहित्यकृती कशी महत्त्व देत असते? साहित्याचे स्वरूप प्रचारात्मक, मनोरंजनात्मक आणि प्रबोधनात्मक कसे असते? साहित्य कोणकोणत्या प्रकारांमध्ये लिहिले जाते? इत्यादी बाबीही साहित्याची प्रकृती समजावून घेताना अर्थातच महत्त्वाच्या असतात. याचबरोबर साहित्यातून जी अनुभव वैशिष्ट्ये प्रतीत होतात. या अनुषंगानेही आपण विचार केला आहे. साहित्यनिर्मितीच्या प्रांतात आपल्या अनुभवांशी लेखकाने अव्यभिचारी निष्ठा बाळगली पाहिजे; तरच साहित्य कसदार होत असते. आशय आणि अभिव्यक्ती यात एकात्मता येण्यासाठी साहित्याच्या विविध अंगांचा विचार लेखकाच्या दृष्टिकोणातून कसा गरजेचा असतो? साहित्यातून व्यक्त होणारे अनुभव एकाचवेळी विशिष्ट आणि सार्वत्रिक कसा असतो? माध्यम आणि साधनांमध्ये कशी एकरुपता साधणे कलावंतांसाठी आवश्यक असते? इतर अनेक गोष्टींसारखाच साहित्यालाही कसा आकार असतो - घाट असतो? या अनुषंगाने आपण विस्ताराने या प्रकरणात उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे. तात्पर्य साहित्यकृतीची प्रकृती समजावून घेताना वरीलप्रमाणे विचार करणे अनिवार्य ठरते.

## १.९ संदर्भ ग्रंथ


१. जोग, रा.श्री., 'अभिनव काव्यप्रकाश' : व्हीनस प्रकाशन पुणे, १९९७.
२. नेमाडे, भालचंद्र, 'साहित्याची भाषा' : साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८७
३. पाटील, गंगाधर, 'समीक्षेची नवी रूपे' : मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. १९५५
४. पाटील, गंगाधर, 'समीक्षामीमांसा' : मौज प्रकाशन, मुंबई. १९५५
५. गणोरकर, प्रभा, संपा., वसंत आबाजी डहाके व इतर, 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश' : ग.रा. भटकळ फाउण्डेशन प्रकाशन, मुंबई २००१

**पूरक ग्रंथ :**

१. मालशे, मिलिंद, जोशी, अशोक, 'आधुनिक समीक्षा-सिद्धांत' : मौज प्रकाशन, मुंबई २००७
२. आचवल, माधव, 'किमया' : मौज प्रकाशन, मुंबई १९६१
३. गाडगीळ, गंगाधर, 'खडक आणि पाणी' : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६०
४. गोडसे, द.ग. 'पोत' : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६३
५. रसाळ, सुधीर, 'कविता आणि प्रतिमा' : मौज प्रकाशन, मुंबई २००७


munotes.in

## १.१० सरावासाठी प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी

१) साहित्याच्या विविध व्याख्यांच्या आधारे साहित्याची प्रकृती स्पष्ट करा.

२) साहित्यकृतींच्या विविध अंगांचा परामर्श घ्या.

३) साहित्यकृतींमधून व्यक्त होणारी वैशिष्ट्ये उदाहरणांसह अधोरेखित करा.

### ब) टीपा लिहा.

१) साहित्यकृतीच्या भाषिक अंगाचा परिचय करुन घ्या.

२) लेखनपूर्व आत्मनिष्ठा आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठा यांचे स्वरूप स्पष्ट करा.

३) साहित्याचा घाट म्हणजे काय ?

४) साहित्याचे माध्यम आणि साधन यातील फरक स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

# घटक - २

## साहित्य निर्मिती प्रक्रिया

**घटक रचना :**

२.१ उद्देश
२.२ प्रस्तावना
२.३ साहित्य निर्मिती प्रक्रियेचे स्वरूप
२.४ साहित्यनिर्मितीच्या शक्ती
२.५ प्रतिभाव्यापार आणि स्वप्नव्यापार
२.६ साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व
२.७ भारतीय परंपरेतील प्रतिभाशक्तीचा विचार
२.८ कल्पनाशक्ती संदर्भातील प्लेटो, कांट, कोलरिज, फ्रॉईड, प्रभाकर पाध्ये यांचे विचार
२.९ समारोप
२.१० संदर्भ ग्रंथ
२.११ स्वाध्याय

### २.२ उद्देश

१) साहित्य निर्मिती प्रक्रियेचे स्वरूप लक्षात येईल.
२) साहित्यनिर्मितीच्या ज्या विविध शक्ती त्याची ओळख होईल.
३) भारतीय परंपरेतील प्रतिभाशक्तीचा मांडलेला विचार लक्षात येईल.
४) कल्पनाशक्तीविषयी विविध अभ्यासकांनी केलेले विश्लेषण ध्यानात येईल

### २.१ प्रस्तावना

मानवी जीवसृष्टी अनेकविध वस्तूंनी बनलेली आहे. अशा वस्तूंचे मुख्यतः दोन प्रकार पडतात. त्यामध्ये एक निसर्गनिर्मित तर दोन मानवनिर्मित वस्तूंचा समावेश होतो. निसर्गनिर्मित वस्तू या स्वयंभू, निर्हेतूक, निरुद्देशकीय असतात. मात्र याउलट मानवनिर्मित वस्तूंचे असते. त्या हेतूपूर्वक निर्माण केल्या जातात. मानवी जीवनाला साहाय्यभूत ठरणे, त्यातून माणसाची गरज भागणे, मानवाच्या जीवनास त्या उपयोगी होणे इ. हेतू त्यांच्या निर्मितीमागे असतात. असे असले तरी यातून शेवटी माणसाला आनंद मिळणे हे त्यांचे अंतिम ध्येय असते. कलानिर्मिती ही त्याच आनंदाची परिणीती आहे. साहित्य ही त्या कलांपैकीच एक आहे. साहित्य ही मानवनिर्मित कला आहे. हे सूर्यसत्य कोणीही नाकारू शकणार नाही. मानवाने केलेली साहित्याची निर्मिती ही

त्याच्या सर्जनशीलतेचा आविष्कार आहे. मात्र सर्वच माणसे साहित्य निर्माण करत नाहीत. काहीच व्यक्ती लेखक असतात. त्याच्याकडेच लेखनाची प्रतिभाशक्ती असते. तोच आपले जीवनानुभव साहित्यातून मांडतो. मात्र ते अनुभव तो जसेच्या तसे न मांडता त्याला जे भावलेले असते ते सर्जशीलपणे शब्दबद्ध करतो. त्याची ही निर्मिती साहित्याचे विश्व विकसित करत असते. या निर्मितीची विशिष्ट प्रक्रिया आहे. साहित्याच्या अभ्यासात ही प्रक्रिया उलगडून दाखविली जाते. प्राचीन काळापासून साहित्याचा पौर्वात्त्य व पाश्चात्त्य अभ्यासकांनी या साहित्यनिर्मिती प्रक्रियेविषयी चिंतन मांडलेले आहे. याचा विस्तृत विचार प्रस्तुत ठिकाणी करायचा आहे.

## २.३ साहित्य निर्मिती प्रक्रियेचे स्वरूप

साहित्यविचारात साहित्यनिर्मिती हा महत्त्वाचा घटक आहे. लेखक साहित्य का लिहितो ? त्याच्या लेखनाची प्रेरणा कोणती असते ? लेखक लेखन कसे करतो ? वगैरे प्रश्न या घटकाच्या मागे दडलेले असतात. वास्तविक साहित्यनिर्मिती ही लेखकनिष्ठ प्रक्रिया आहे. लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याची जडणघडण, त्याचे जीवन, त्याची कौटुंबिक परिस्थिती, त्याचा सामाजिक, सांस्कृतिक परिवेश, त्याचा भवताल म्हणजे त्याचा परिसर, भौगोलिकता, वातावरण इ. गोष्टी या प्रक्रियेत अंतर्भूत असतात. या सर्वाच्या एकसंघ रचनेतून साहित्यनिर्मिती घडते. याची एक प्रक्रिया असते. तिला साहित्य निर्मिती प्रक्रिया असे म्हणतात. भारतीय साहित्यविचारात याविषयी मूलभूत चिंतन केलेले आहे. प्राचीन मीमांसकांनी काव्यशास्त्रात कवी, लेखक यांची सर्वसामान्य माणसाशी तुलना करताना तो त्यांच्यासारखाच दिसत असला तरी त्याच्याकडे लेखनाची प्रेरक शक्ती असते. तिला प्रतिभाशक्ती असेही म्हटले आहे. साहित्यशास्त्रामध्ये या प्रतिभेचा विचार मूलभूतपणे केला असून तो विचार पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

## २.४ साहित्यनिर्मितीच्या शक्ती

साहित्य शास्त्रामध्ये प्राचीन काळापासून साहित्याच्या निर्मितीविषयी मूलभूत चिंतन मांडलेले आहे. पौर्वात्य अथवा पाश्चात्त्य अभ्यासकांनी या निर्मितीच्या काही शक्ती नमूद केलेल्या आहेत. त्यामध्ये प्रतिभा, स्फूर्ती, कल्पनाशक्ती आणि उत्प्रेक्षणशक्ती, भावनात्मकता यांचा समावेश होतो.

**प्रतिभा :**

प्रतिभा ही साहित्य निर्मितीमधील प्रमुख शक्ती आहे. किंबहुना तिला साहित्यनिर्मितीचे जनककारण असेही म्हटले जाते. पौर्वात्य अभ्यासकांनी याविषयी विविधांगी विचार मांडलेले आहेत. त्यांचा आपण पुढे विस्ताराने विचार करणारच आहोत. इथे केवळ प्रतिभेची संकल्पना समजून घ्यावयाची आहे. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, कवीच्या वास्तव जीवनातील अनुभवांना नवे रूप, नवा अर्थ आणि नवा संदर्भ देणाऱ्या प्रतिभेचे अंतरंग उलगडणे ही कठीण गोष्ट आहे, पण सूक्ष्म सौंदर्यदृष्टी आणि उज्ज्वल कल्पनाशक्ती हे तिचे विशेष मानण्यात येतात. एक नवीन, अपूर्व विश्व निर्माण करण्याचे तिचे सामर्थ्य लक्षात येत असल्याने आणि त्याच वेळ तिच्या स्वरूपाचा नेमका अंदाज लागत नसल्यामुळे तिला दीर्घकाळपर्यंत परमेश्वरी देणगी

मानण्यात आले. प्रतिभेला अलौकिक शक्ती मानले गेले याचे प्रमुख कारण तिचे विरलत्व होय. तिचे अस्तित्व सर्वांच्या ठिकाणी नसून फारच थोड्यांच्या ठिकाणी असते. समाज हा अनेक व्यक्तींचा समूह असतो, पण त्यातले थोडे लोक कवी अथवा लेखक असतात. मानसशास्त्रात प्रतिभेचा विचार वेगळ्या पद्धतीने केलेला आहे. प्रतिभावंताच्या ठिकाणी निर्मितीक्षमतेबरोबरच एक विक्षिप्तपणा आढळत असतो. त्यामुळे प्रतिभा आणि मानसिक विकृती यांचे साहचर्य गृहीत धरुन प्रतिभा म्हणजे एक मानसिक विकृतीच मानले गेले आहे. प्रसिद्ध इटालियन मानसशास्त्रज्ञ लोंब्रोसो यांनी प्रतिभेला वेडाची बहीण म्हटले आहे. मात्र ते सत्य नाही. कोलरिज या अभ्यासकाच्या मते, विक्षिप्तपणा प्रतिभावंताच्या ठिकाणी असतो हे खरे, पण त्याला मानसिक विकृती म्हणता येणार नाही. सर्वसामान्य माणसाच्या मनोव्यापाराहून प्रतिभावंताचे मनोव्यापार वेगळे असतात. त्याला अपवादात्मकता असे म्हणता येईल.

नवनिर्मिती हे प्रतिभेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कवी वास्तवाचे कधीच यथातथ्य चित्रण करीत नाही. तर त्याला प्रतिभेची जोड देऊन वास्तवाचे सर्जनशील आविष्करण करत असतो. एकूणच कलेबाबतची प्रतिभा ही सौंदर्याधारित असते. कलात्मक सत्याला सौंदर्यदृष्टीचा स्पर्श लाभलेला असतो. या दृष्टीच्या आधारेच कवीकडून अनुभवांची निवड होते आणि त्यांना आकर्षक रूप लाभते. कलानिर्मितीसाठी आवश्यक असणारा अलिप्तपणा आणि व्यक्तिगत अनुभवातील विश्वात्मक आशयाचा शोध या गोष्टीही प्रतिभेमुळेच कवीला शक्य होतात. त्यामुळे प्रतिभा ही साहित्यनिर्मितीमधील महत्त्वाची शक्ती आहे.

### स्फूर्ती :

प्रसिद्ध कवी वर्डस्वर्थ यांनी काव्याची व्याख्या उत्कट भावनांचा सहज, उत्स्फूर्त आविष्कार अशी केलेली आहे. यामध्ये स्फूर्ती या साहित्यनिर्मितीच्या शक्तीचे सूत्र अनुस्यूत आहे. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, "स्फूर्ती ही एक अतिशय उत्कट अशी मानसिक अवस्था आहे. ही निर्मितीच्या जाणिवेने संपूर्णपणे भारलेली कविमनाची अवस्था असते. कवीच्या मनात अनुभवांची झालेली पुनर्रचना, त्यांना प्राप्त होत असलेला नवा संदर्भ सहज उद्रेकाने बाहेर पडावा लागतो. त्याला नेमके तोंड फुटण्याच्या दृष्टीने स्फूर्तीचीच आवश्यकता असते. असे असले तरी स्फूर्ती ही शक्ती प्रतिभेसारखी नसते. तिच्यात लहरीपणा असतो. ती हुकमीपणाने जागृत होऊ शकत नाही. कवीला नेहमीच तिच्या कलाने घ्यावे लागते. ती प्रयत्नसाध्य, स्थलकालसापेक्ष नसते. अनेकदा या स्फूर्तीच्या क्षणी काव्यरचनाही होत नाही. भरुन दाटून आलेल्या अवस्थेत कवीला आविष्कार जमतही नाही, पण स्फूर्ती सुप्त प्रतिभेला चालना मात्र जरुर देते. त्यामुळेच साहित्याच्या ज्या शक्ती सांगितल्या जातात त्यामध्ये स्फूर्तीचा समावेश केला जातो."

### कल्पनाशक्ती आणि उत्प्रेक्षणशक्ती :

कोलरिज या अभ्यासकाने या दोन साहित्य निर्मितीतील शक्तीविषयी मूलभूत चिंतन मांडलेले आहे. त्यांच्या मते, "कल्पनांशी केलेली बरीच वैचारिक, चमत्कृतिपूर्ण क्रीडा असते तर कल्पनात्मकतेत चैतन्याचा किंवा मानवी अंत:करणाचा आविष्कार असतो. उत्प्रेक्षा म्हणजेच कल्पनांचा स्वैर विहार होय. मात्र कल्पनाशक्ती ही एक संपूर्ण नवनिर्मिती साधणारी शक्ती आहे. ते एक प्रतिभेचे आधारभूत अंग असते. कल्पनाशक्तीच्या कार्यात धारणाशक्ती आणि स्मरणशक्ती यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. मानवी मनावर नेहमी नानाविध संस्कार होत असतात. ते तसे विस्मृतीतही जात असतात. पण त्यांचा संचय, त्याची धारणा कळत नकळत

मानवी मनात होत असते. स्मरणशक्तीच्या जोरावर त्यातील अर्थपूर्ण संस्काराची माणूस पुन:निर्मिती करीत असतो. साहित्यनिर्मितीत त्या जुन्या संस्कारांना नवे रूप, नवा संदर्भ लाभत असतो. हे कार्य धारणा आणि स्मरण या दोन शक्तींच्या साहाय्याने कल्पनाशक्ती करते हाच काव्यव्यापार असतो."

साहित्य निर्मितीमध्ये भावनांना महत्त्वाचे स्थान असते. किंबहुना विचारांपेक्षा भावनेवर जास्त भर असतो. कल्पनाशक्तीच्या आधारावर भावानुभवास गोचर रूप देणे हेच तिथे साध्य असते. या भावनात्मकतेचाच एक प्रकार म्हणजे सहानुभाव होय. कवी अंत:करणात एक विशाल सहानुभूतीचे अस्तित्व असते. तिची विशालता, व्यापकता आणि सर्वस्पर्शित्व यावर अवलंबून असते. साहित्यात लेखक, कवीच्या व्यक्तिगत अनुभूती विश्वासात्मक व्हाव्या लागतात. त्या कल्पनाशक्ती आणि व्यापक सहानुभाव यांच्या मिलाफानेच होऊ शकतात. याच्या जोरावरच मानवी मन आणि व्यवहार यात कवी खोलवर प्रवेश करु शकतो. एकूणच ही भावनात्मकता साहित्यनिर्मितीमध्ये महत्त्वाची आहे.

## २.५ प्रतिभाव्यापार आणि स्वप्नव्यापार

साहित्य विचारात प्रतिभेची संकल्पनात्मक मांडणी विचारात घेतल्यानंतर प्रतिभाव्यापार आणि स्वप्नव्यापार या दोहोंची चर्चा महत्त्वाची ठरते. विविध मानसशास्त्रांनी या व्यापाराविषयी मूलभूत चिंतन केलेले आहे. डॉ. सुधीर रसाळ यांनी आपल्या 'कविता आणि प्रतिमा' या ग्रंथामध्ये याविषयी लिहिलेले आहे की, 'विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सिग्मंड फ्रॉईडने आणि इतर मनोविश्लेषण शास्त्रज्ञांनी अर्थबोध आणि अबोध मनांच्या स्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आणि त्याचबरोबर स्वप्नांचे यशस्वी विश्लेषण करायला सुरुवात केली. त्यामुळे मानसशास्त्रात तर क्रांती झालीच, पण त्याबरोबर समीक्षा शास्त्रालाही आपल्या काही संकल्पना व्यवस्थित मांडता आल्या. स्वप्नांचे विश्लेषण करताना त्यांना स्वप्ने व काव्य यात विलक्षण साम्य आढळून आले. स्वप्न प्रतीकांचे बनलेले, प्रतीके उकलून मूळ स्वप्न हेतू शोधता येतो. स्वप्ने मुख्यत: अतृप्त इच्छांची कल्पित तृप्ती मिळविण्यासाठी पडतात. कविताही प्रतिकांची बनलेली, काव्यप्रतीकेही उकलता येऊ शकतात व त्यामागील मानसिक प्रेरणा शोधता येऊ शकतात. स्वप्न आणि वास्तव यांच्या प्रमाणेच काव्य व वास्तव यांच्या नात्याचा वेगळ्या प्रकारे अन्वय लावणे शक्य झाले. त्या दोन्ही वास्तवाच्या केवळ प्रतिकृती नाहीत हे मत मांडले जाऊ लागले. दोन्हीत होणारी प्रतिकांची रचना काल्पनिक असते. तिच्यात काटेकोर कार्यकारणभाव किंवा तार्किकता शोधता येत नाही. माणसांची स्वप्ने दोन प्रकारची असतात. जागेपणीची स्वप्ने आणि रात्री झोपेत पडणारी स्वप्ने या दोन्ही प्रकारांचे विश्लेषण फ्रॉईड यांनी केलेले आहे.' प्रतिभाव्यापार आणि स्वप्न व्यापार यांच्यातील साम्यभेदांचा विचार साहित्य विचारात अनेकांनी केलेला आहे. याविषयी अरविंद कुलकर्णी यांनी 'साहित्यविचार' या ग्रंथात केलेले विवेचन महत्त्वाचे आहे. वरील सर्व विवेचनातून याचा प्रत्यय येतो.

## २.६ साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व

कोणताही लेखक हा सर्वप्रथम माणूस असतो. सर्वसामान्य माणसासारखाच त्याचाही जीवनव्यवहार असतो. मात्र तोच साहित्याची निर्मिती करु शकतो. इतर माणसे करु शकत

नाहीत. यामागे लेखकाचे वेगळे व्यक्तिमत्त्व असते. अरविंद वामन कुलकर्णी यांनी 'साहित्यविचार' या ग्रंथामध्ये लेखकाची गुणवैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. त्यामध्ये संवेदनक्षमता, शैशववृत्ती, अनुभवसमृद्धी, विद्वत्ता, वाङ्मयीन दृष्टिकोन यांचा समावेश होतो. या सर्व विशेषांचा विचार साहित्य निर्मितीमध्ये महत्त्वाचा ठरतो. त्यांचा तपशीलवार विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

**संवेदनक्षमता :**

माणूस हा संवेदनशील प्राणी आहे. प्रत्येक माणूस संवेदनक्षम असतो, पण संवेदनशमता हे लेखकाचे खास वैशिष्ट्ये असते. संवेदनक्षमता म्हणजे भावविवशता किंवा हळवेपणा नसतो. कोणत्याही अनुभवातील सूक्ष्मातिसूक्ष्म बारकावे टिपण्याची क्षमता म्हणजे संवेदनक्षमता होय. साहित्यकृतीतील भावनेचे आरोह-अवरोह व परिपोष या क्षमतेमुळेच सुयोग्य व परिणामकारक असतात. ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांविषयीची साक्षात प्रतीती आस्वादकाला घडवून देणे यामुळेच लेखक व कवीला जमते. नव्या काळात काव्याचे स्वरूप वगैरेबद्दल नव्या संकल्पना मांडल्या जाऊ लागल्या. या नव्या संकल्पनाविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, "कवीच्या अनेकविध जाणिवा मिळून त्याची समग्र संवेदनप्रकृती निर्माण होत असते. त्याच्याकडून लिहिल्या जाणाऱ्या सर्व काव्याला ती अंतःस्थपणे सूत्ररूपाने जोडीत असते. या संवेदनप्रकृतीमुळेच विशिष्ट कवीची प्रत्येक कविता एक स्वतंत्र, परिपूर्ण रचना असूनही ती त्याच्या अन्य कवितांशी जोडली जाते. कवीची संवेदनप्रकृती एकदा स्थिरावली की, त्याच्या लेखनात कलात्मकता उरत नाही. नवे नवे अनुभव पूर्ण प्रस्थापित झालेल्या संवेदनप्रकृतीत परिवर्तन घडवीनासे होतात. व्यक्तीच्या संवेदनप्रकृती वा संवेदनक्षमतेबद्दल जसे आढळते तसेच एखाद्या काळातही एक सर्वसाधारण संवेदनप्रकृती तयार होत असते. एका विशिष्ट तऱ्हेने अनुभवांचे निरीक्षण, त्यांचा स्वीकार आणि मग त्यांची लावली जाणारी संगती ही काही काळात समानपणे सर्व कवींच्यात वावरताना दिसते."

**शैशववृत्ती :**

लेखकाच्या अंगी ज्याप्रमाणे संवेदनक्षमता महत्त्वाची आहे तशीच त्याच्या व्यक्तिमत्त्वामध्ये शैशववृत्ती महत्त्वाची असते. त्याला बाळपणाचे स्वभावविशेष असे म्हणतात. असा विचार अनेक मानसशास्त्रज्ञांनी मांडलेला आहे. कवित्वास आवश्यक असा वृत्तीचा ताजेपणा, संवेदनक्षमता, निरागसपणा इत्यादी विशेष कवीच्या ठिकाणी कायम राहिले पाहिजेत. हे वृत्तीविशेष माणसाच्या ठिकाणी बाल वयात असतात. डॉ. सुधीर रसाळ यांनी कविता आणि प्रतिमा या ग्रंथात याविषयी मार्मिक भाष्य केले आहे. ते लिहितात, "माणूस मोठेपणी त्याची जीवनपद्धती व आस्थाविषय नक्की झाल्यामुळे त्यांनाच अनुलक्षूण अनुभव घेत असतो. मुलांच्या बाबतीत किंवा बालवयात असे नसते. या वयात जीवनपद्धती व आस्थाविषय नक्की झालेले नसतात. त्यामुळे प्रत्येक अनुभव हा अनुभव म्हणून उपयुक्ततानिरपेक्ष बुद्धीने स्वीकारण्याची एक क्रिया या वयात मन करीत असते. बालकाची ही वृत्ती मोठेपणीही कवीमध्ये टिकत असते. इतर सर्वसामान्य माणसे मात्र मोठेपणी रूढ पद्धतीनेच अनुभव घेत असतात." एकूणच प्रौढावस्थेतही शैशववृत्ती जपणे म्हणजे ही विशिष्ट काव्योपयोगी मानसिकता जपणे होय. असे अरविंद कुलकर्णी यांनी म्हटलेले आहे.

**अनुभव समृद्धी :**

साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूतील हा महत्त्वाचा पैलू आहे. याचा विचार संवेदनशीलता आणि शैशववृत्तीच्या आधारेच केला जातो. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात,

क्षेत्र व खोली या दोन दृष्टींनी अनुभवांची समृद्धी जोखली जाते. म्हणजे अनुक्रमे संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीने. लेखकांचे अनुभवक्षेत्र मर्यादित आहे की व्यापक, असा एक विचार केला जातो. अनुभवक्षेत्राच्या व्यापकतेपेक्षा खोलीचे व उत्कटतेचे प्रत्ययकारक चित्रण महत्त्वाचे मानणारा हा एक पक्ष आहे. नुसती विविधता किंवा भौगोलिक विस्तार साहित्यकृतीच्या श्रेष्ठत्वाला उपकारक ठरत नाही. तो अनुभव किती खोलवर वेध घेऊन लेखक, कवीने टिपलेला आहे हे महत्त्वाचे आहे. संवेदनक्षमता आणि शैशववृत्ती या दोन विशेषांमुळेच लेखक एखाद्या अनुभवाची उचित व्यवस्था लावण्याच्या अनेक शक्यता पडताळून पाहू शकतो आणि उचित असा कलात्मक रूपबंध निर्माण करु शकतो. आजची नवी समीक्षा तर लेखकाची अनुभवसमृद्धी याच निकषावर म्हणजे शक्यता पडताळण्याच्या सामर्थ्यावर जोखताना दिसते. लेखनात अपरिचित व विविधतापूर्ण अशा अनुभवांच्या केवळ दर्शनाची अपेक्षा नसते. उलट अनुभवविश्वाचे जिवंत, चैतन्यमय दर्शन महत्त्वाचे असते. या दोन्ही विशेषांचा मिलाफ एखाद्या साहित्यकृतीत आढळला, तर दूधात साखर या न्यायाने त्या कृतीचा दर्जा उंचावतो, लेखकालाही महत्त्व प्राप्त होते. वरील विवेचनातून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील अनुभवसमृद्धी या पैलूचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

**विद्वत्ता :**

प्राचीन संस्कृत मीमांसकांनी लेखक, कवीच्या अंगी असाव्या लागणाऱ्या ज्या महत्त्वपूर्ण गुणांचा विचार केलेला आहे त्यामध्ये विद्वत्ता याचा प्राधान्याने समावेश होतो. कवी ज्ञानी असावा असे मत त्यामध्ये अनुस्यूत आहे. विद्वत्ता, व्युत्पन्नता, व्यासंग, पांडित्य हे सर्व शब्द तसे समानार्थक आहेत. ज्ञानसंपन्नता हा साहित्यिकाचा एक आवश्यक विशेष मानता येईल. मात्र असे असले तरी लेखकाच्या ठिकाणी विद्वत्ता हवीच असे नाही. कारण अनेक कवी लेखक हे विद्वत्तेच्या पातळीवर पोहचू शकत नसले तरी त्यांच्या लेखनात प्रचंड मोठी शक्ती असते. ते प्रतिभावंत असतात.

**वाङ्मयीन दृष्टिकोन :**

लेखक अथवा कवी हा एक प्रतिभावंत, सर्जनशील व्यक्ती असतो. त्याचे व्यक्तिमत्त्व इतरांपासून भौतिकदृष्ट्या वेगळे नसले तरी त्यांची मनोभूती, विचारभूमी ही इतरांपेक्षा निश्चितपणे वेगळी असते. यामागे त्याचे स्वविषयी, समाजाविषयी, लेखनाविषयीचे दृष्टिकोन दडलेले असतात. लेखकांची ही दृष्टी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू असतो. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, "साहित्यिकाच्या बाबतीतही जीवनविषयक आणि साहित्यविषयक असे दोन दृष्टिकोन असतात. त्याचे हे दृष्टिकोन त्याच्या साहित्यनिर्मितीत सहभागी होतात. उदा. हरिभाऊ आपटे हे सुधारणावादी लेखक होते. त्यांचा हा दृष्टिकोन त्यांच्या साहित्यातही परावर्तित झालेला आहे. असेच कलावाद व जीवनवाद या दोन दृष्टिकोनाविषयी म्हणता येईल."

एकूणच लेखकाचे, साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व हा साहित्य निर्मितीमधील महत्त्वाचा घटक असतो. त्याचे नानाविध पैलू असतात. हे पैलू त्याच्या व्यक्तिमत्त्वाला नाविन्य प्राप्त करुन देतात.

## २.७ भारतीय परंपरेतील प्रतिभाशक्तीचा विचार

भारतीय साहित्य विचारात संस्कृत व प्राकृत अभ्यासकांची परंपरा महत्त्वाची आहे. संस्कृत परंपरेत साहित्याचा सैद्धांतिक विचार सर्वप्रथम करण्यात आल्याचे दिसते. त्यामध्ये

दण्डी, वामन, मम्मट, जगन्नाथ, भट्ट तौता, हेमचंद्र, अभिनवगुप्त, रुद्रट या अभ्यासकांचे योगदान महत्त्वाचे आहे. या सर्वांनी साहित्य निर्मिती प्रक्रियेतील प्रतिभाशक्तीचा मूलभूत विचार केलेला आहे, जो भारतीय परंपरेतील साहित्य विचाराला पायाभूत बैठक देणारा आहे. त्यांचे चिंतन केवळ भारतीयच नाही तर जागतिक पातळीवरील साहित्य विचाराला प्रेरक ठरलेले आहे. त्यामुळे या सर्वांचे चिंतन ठळकपणे लक्षात घेणे अगत्याचे ठरेल.

**दण्डी :**

प्रतिभेविषयी दण्डी या मीमांसकाने 'नैसर्गिकी' आणि 'पूर्ववासना गुणानुबन्धि' असे शब्द योजिलेले आहेत. नैसर्गिकी म्हणजे जन्मजात मिळालेली तर पूर्ववासना गुणानुबन्धि म्हणजे पूर्वजन्माच्या संस्काराच्या परिणामातून मिळालेली अशी प्रतिभा असते असे दण्डी यांनी म्हटलेले आहे. दण्डीने प्रतिभेचे स्वरूप पूर्वजन्मामध्ये मनावर झालेल्या संस्कारातून निष्पन्न होणारे अंतःस्फूर्त ज्ञान असे सांगितले आहे. त्यांच्या मते, प्रतिभा ही प्रयत्नांनी प्राप्त होत नाही. असे असले तरी काव्यसंपदा ही श्रुत आणि अभियोग म्हणजे व्युत्पन्नता आणि अभ्यास यांनी प्राप्त होणारी असते असेही ते म्हणतात.

**वामन :**

दण्डीप्रमाणेच वामन या मीमांसकांनेही प्रतिभेचे नाते पूर्वजन्माच्या संस्कारांशी जोडलेले आहे. त्यांच्या मते, प्रतिभा ही 'जन्मान्त्रगत संस्कारविशेषः' आहे. याचा अर्थ प्रतिभान हा पूर्वजन्मांपासून प्राप्त झालेला एक विशिष्ट संस्कार असतो. त्या संस्कारातूनच प्रतिभेची निर्मिती होते.

**मम्मट :**

प्रतिभेची व्याख्या करताना मम्मट या संस्कृत मीमांसकाने 'शक्तिःकवित्व् बीजरूप संस्कारविशेषः' असे म्हटलेले आहे. याचा अर्थ प्रतिभा ही एक शक्ती असून तिचे बीजरूप संस्कारातून म्हणजेच पूर्वजन्माच्या संचितातून उत्पन्न होते अशी मम्मटाची भूमिका होती. जी दण्डी व वामन या मीमासकांच्या विचारांशी समांतर आहे.

**रुद्रट :**

रुद्रट या मीमांसकाच्या मते, या शक्तीमुळे मनोवृत्ती तल्लीन होतात आणि वर्ण्यविषयासंबंधी स्फूरण होऊन आपोआप उचित शब्द सूचतात. त्यांनी प्रतिभेचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक सहज आणि दोन उत्पाद्य यांचा त्यामध्ये समावेश होतो. सहज प्रतिभा ही कवीबरोबरच जन्म घेणारी म्हणजे जन्मजात असते. उत्पाद्य प्रतिभा ही शास्त्राभ्यास किंवा मणिमंत्रोषधाने प्राप्त होणारी प्रयत्नसाध्य आहे.

**अभिनवगुप्त :**

प्रतिभा ही 'अपूर्व वस्तु निर्माणक्षम प्रज्ञा' आहे असे अभिनव गुप्त यांनी म्हटलेले आहे. पूर्वी कधीही नसलेल्या, नवीन वस्तूंची निर्मिती करण्याचे सामर्थ्य जिच्यात आहे ती शक्ती म्हणजेच प्रतिभा होय. असे त्यांचे म्हणणे होते. इथे प्रतिभेच्या संदर्भात वापरलेला प्रज्ञा हा शब्द महत्त्वाचा आहे. प्रज्ञा ही एक मनाची शक्ती असली तरी ती स्मृती, बुद्धी, तर्कशक्ती यापेक्षा वेगळी आहे. स्मृती ही भूतकाळाशी निगडित असते, मती ही भविष्यातील गोष्टी प्रत्यक्षपणे पाहते, बुद्धी ही तत्कालाशी म्हणजे वर्तमानकाळाशी संबंधित असते, तर प्रज्ञा ही भूतभविष्य वर्तमान या तिन्ही काळात वावरते. म्हणजे प्रज्ञा ही जेव्हा एकदा घेतलेला अनुभव स्मरुन दुसऱ्या संदर्भात योजते तेव्हा त्यातूनच काव्यात्म प्रतिमा किंवा अलंकार जन्माला येतात.

munotes.in

**राजशेखर :**

'काव्यमीमांसा' या ग्रंथामध्ये राजशेखर यांनी साहित्याची सृष्टी ही प्रतिभासनिबंधनाच्या स्वरूपाची असते असे म्हटलेले आहे. शास्त्रीय वर्णन यांतील भेद दाखवण्यासाठी त्यांनी स्वरूप निबंधन आणि प्रतिभासनिबंधन असे दोन शब्द वापरले आहेत. या विश्वातील वस्तू जशा असतात तसे त्यांचे वर्णन, त्यांच्या वस्तुनिष्ठ धर्माचे वर्णन हे स्वरूप निबंधनन होय. प्रतिभासाचे स्वरूप कवीच्या प्रतीतीशी निगडित असते. प्रतिभास हा वस्तूमध्ये नसून तो पाहणाऱ्याच्या दृष्टीमध्ये असतो. असे राजशेखर यांचे मत होते.

**महिमभट्ट :**

महिमभट्ट यांनी 'व्यक्तिविवेक' या ग्रंथाची निर्मिती केली आहे. त्यांनी प्रतिभेचा विचार करताना तिची व्याख्या दिलेली आहे. त्यांच्या मते, रसोचित शब्दार्थाचे चिंतन करताना मन एकाग्र झाले की एका विशिष्ट क्षणात वस्तूच्या गाभ्याला स्पर्श करुन उदित झालेली कवीची प्रज्ञा म्हणजे प्रतिभा होय. महिमभट्ट यांनी प्रतिभेचा विचार करताना मनाच्या एकाग्रतेवर भर दिलेला आहे. विशेषतः ते प्रतिभेला तिसऱ्या डोळ्याची उपमा देतात. हा डोळा वस्तूच्या अंतःस्वरूपाशी भिडतो. त्यावेळी लौकिक दृष्टीला जे दिसत नाही ते त्याच्या या तिसऱ्या अलौकिक डोळ्याला दिसते. असे महिमभट्ट यांचे मत होते.

**वाग्भट :**

वाग्भटाने प्रतिभेचे लक्षण, प्रसन्न शब्द, नवीन अर्थ, त्यांचा संयोग आणि स्मरण या गोष्टी चांगल्या कवीच्या ज्या बुद्धीत स्फुरतात अशी सर्वतोमुखी बुद्धी म्हणजे प्रतिभा असे सांगितले आहे. या व्याख्येत निर्मितीमध्ये अभिप्रेत असलेल्या नवीन अर्थाचा म्हणजे नवीन जाणिवेचा जसा उल्लेख आहे त्याप्रमाणे ही निर्मिती साहित्याची असल्यामुळे ती शब्दरूप असल्याचेही सुचवलेले आहे. या जाणिवा सहज स्फुरलेल्या असल्यामुळे त्यांचा आणि त्या ज्या प्रसन्न शब्द रूपामध्ये ग्रंथित होतात. अलंकाराची निर्मिती ही प्रस्तुत आणि अप्रस्तुत किंवा उपमेय आणि उपमान यांच्या नव्या संयोगांतून होते. त्यातील अप्रस्तुते किंवा उपमाने म्हणजे केव्हातरी, प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे घेतलेले अनुभव असतात. त्यांचे प्रमुख अनुभवाच्या संदर्भात स्मरण होऊन त्यांचा प्रस्तुताशी संयोग साधणे हा प्रतिभेचाच व्यापार मानला जातो.

**हेमचंद्र :**

हेमचंद्र यांनी प्रतिभेची व्याख्या 'प्रतिभा नवनवोन्मेष शालिनी प्रज्ञा' अशी केलेली आहे. याचा अर्थ जुन्या, परिचित विषयांना नवनवीन रूपे देणारी बुद्धी म्हणजे प्रतिभा असा सांगितला जातो. इथे हेमचंद्र हे प्रज्ञा हा अतिशय महत्त्वाचा शब्द वापरतात.

**जगन्नाथ :**

संस्कृत परंपरेत पूर्वजन्माबरोबर प्रतिभा ही दैवी शक्ती आहे असा एक विचार मांडला जातो. जगन्नाथ या मीमांसकाने याची चर्चा सर्वप्रथम केली आहे. त्यांच्या मते, प्रतिभा ही देवता, महापुरुष यांच्या प्रसादामुळे, आशिर्वादामुळे वा अदृष्टामुळे प्राप्त होत असते. सर्व संस्कृत मीमांसकाप्रमाणेच जगन्नाथ हेसुद्धा प्रतिभेचा विचार पारंपरिक पद्धतीनेच मांडतात.

**भट्टतौत :**

संस्कृत परंपरेत भट्टतौताने केलेले प्रतिभेचे विवेचन वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी दर्शन व वर्णन अशा दोन संकल्पना मांडल्या आहेत. वसंत पाटणकर यांनी याविषयी मूलभूत चिंतन

मांडलेले आहे. ते लिहितात, दर्शन म्हणजे विविध प्रकारच्या वस्तूंच्या धर्माच्या तत्त्वांचे ज्ञान होय. हे ज्ञान ज्याला होते तो शास्त्रानुसार कवी ठरतो. म्हणजेच शास्त्रानुसार ऋषीला कवी म्हटले आहे. परंतु लोक व्यवहारातील कवी याचा अर्थ ज्याच्या ठायी दर्शन व वर्णन या दोन्ही गोष्टी असतात असा होय. वर्णन करण्याची कवीची शक्ती म्हणजेच प्रतिभा आहे असे भट्टतौत म्हणतात.

एकूणच भारतीय साहित्यविचारातील वरील प्रतिभाविवेचन मूलभूत स्वरूपाचे आहे. त्यात पूर्वजन्म, संस्कार, दैववाद दिसत असला तरी काव्यशास्त्रामध्ये त्याला महत्त्वाचे स्थान आहे. संस्कृत साहित्य मीमांसकांनी प्रतिभा ही काव्यामध्ये नव्या नव्या उन्मेषांचा आविष्कार करणारी असते असे म्हटलेले आहे. तिच्यातून लेखनाला अपूर्वता मिळते. साहित्यातील आशय, रचना, शब्द यांना नवता प्राप्त होते. असा विचार मांडलेला आहे. संस्कृत साहित्य शास्त्रज्ञांनी दिलेली ही प्रतिभेची लक्षणे पाहिली तर त्यातून प्रतिभेची वैशिष्ट्ये जाणवतात. म.सु. पाटील यांनी याविषयी लिहिले आहे की, 'प्रतिभा ही निर्मितीशी निगडित असलेली मनाची शक्ती आहे. ती जन्मदत्त देणगी आहे. तिचे स्वरूप अलौकिक असते. ती मनाच्या एकाग्र अवस्थेत क्रियाशील होते. ती वस्तूचे अंतःस्वरूप पाहू शकते. या शक्तीमुळे समोर नसलेल्या वस्तूही कवीला प्रत्यक्षातील वस्तूंसारख्या दिसतात. तिच्यामुळे नवे अर्थ, नव्या जाणिवा किंवा नव्या कल्पना स्फुरतात. अपूर्व अशा कथानकांची निर्मिती तीच करते. नव्या किंवा अपूर्व जाणिवा निबद्ध करणारे शब्द सुद्धा प्रतिभेमुळे सुचतात. त्यामुळे प्रतिभा ही मानवी सर्जनशीलतेची शक्ती आहे.'

## २.८ कल्पनाशक्ती संदर्भातील प्लेटो, कांट, कोलरिज, फ्राईड, प्रभाकर पाध्ये यांचे विचार

साहित्य निर्मिती प्रक्रियेमध्ये प्रतिभेचा विचार जसा महत्त्वाचा आहे तसाच कल्पना शक्तीचा विचारही महत्त्वपूर्ण आहे. विशेषतः प्राचीन साहित्य चिंतकांनी जिला प्रतिभा म्हटले तिला आधुनिक विशेषतः पाश्चात्त्य अभ्यासकांनी कल्पनाशक्ती असे म्हटलेले आहे. प्रस्तुत ठिकाणी आपल्याला प्लेटो, कांट, कोलरिज, फ्रॉईड व प्रभाकर पाध्ये यांनी कल्पनाशक्ती संदर्भात मांडलेले विचार लक्षात घ्यायचे आहेत. मात्र तत्पूर्वी कल्पनाशक्ती संकल्पना समजून घेणे क्रमप्राप्त ठरेल.

वसंत पाटणकर यांनी 'साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या' या ग्रंथामध्ये कल्पना या शब्दाचा मतितार्थ अत्यंत विस्तृतपणे मांडलेला आहे. ते लिहितात, कल्पना (Imegination) ही संज्ञा अनेकार्थी आहे. या संज्ञेचे शब्दकोशात अनेक अर्थ दिलेले आहेत. मनःपटलावर चित्र उमटविणारी मानसिक शक्ती, युक्ती, विचार, तर्क, मनात केलेली योजना, शंका, आभास, तरंग, हेतू, गृहीत धरणे इत्यादी अर्थ आहेत. कल्पना ही संज्ञा आपण जेव्हा नेहमीच्या जीवन व्यवहारात वापरत असतो, तेव्हा शब्दकोशातील वरीलपैकी काही अर्थ त्या त्या विशिष्ट संदर्भात अभिप्रेत असतात. मुख्यतः वास्तवाला विरोधी, खोटे या अर्थाने होय. त्यामुळे कल्पनाशक्ती याचा नेहमीच्या व्यवहारातील अर्थ वास्तवापासून दूर होणारी, खोटी, भ्रामक, आभासमय चित्रे निर्माण करणारी व त्याद्वारे मनाचे रंजन करणारी शक्ती आहे. साहित्य अथवा कलेच्या क्षेत्रात कल्पनाशक्तीचा अर्थ नेहमीचा ऋणमूल्यसूचक नसतो तर त्याला प्रतिष्ठा असते. नवनिर्मिती करणारी शक्ती असा भाव त्यात अभिप्रेत असतो. साहित्य निर्मिती प्रक्रियेत या कल्पनाशक्तीचा

munotes.in

विचार मूलभूतपणे केलेला आहे. विशेषतः पाश्चात्त्य व आधुनिक अभ्यासकांनी यावर भाष्य केलेले आहे. त्यातील काही निवडक चिंतनाचा आपण विचार करणार आहोत.

**प्लेटो :-**

थोर ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो हे साहित्याचे उत्कृष्ट जाणकार होते. त्यांनी साहित्याची मूलभूत मीमांसा केलेली आहे. त्यांच्या मते, आदर्श राज्यपद्धती घडविण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे असून त्याचा एक महत्त्वपूर्ण भाग हा साहित्य आहे. साहित्यादी कला ज्ञानविषय असतात. त्यांचे नाते मनाच्या अवस्थांशी असते. ज्ञानविषय व मनाच्या अवस्था यांच्यातील परस्परसंबंध मांडताना प्लेटोने ज्ञानाच्या चार पायऱ्या सांगितल्या आहेत. त्यामध्ये सर्वात खालच्या पायरीवर प्रतिमा आहे. तिचे नाते कल्पनेशी असते. ती कल्पना आभासात्मक व भ्रमात्मक आहे. असे त्यांचे म्हणणे आहे. असे असले तरी ज्ञान प्रक्रियेत ही पायरी महत्त्वाची असून तिच्यावरच पुढे वस्तू, संकल्पना व परमसत्य या पायऱ्या उभारलेल्या असतात. कल्पनेनंतर विश्वास, संकल्पनात्मक विचार व परमज्ञान प्राप्त होते अशी भूमिका प्लेटो यांनी घेतलेली आहे. इथे प्लेटोने केलेला कल्पनेचा विचार प्रतिभात्मक असून त्याला पाश्चात्त्य साहित्यविचारात महत्त्वाचे स्थान आहे.

**कांट :-**

प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कांट यांनी कल्पनाशक्ती ही ज्ञानाला कारणीभूत होणाऱ्या मनाच्या ज्या शक्ती आहेत त्यापैकी एक आहे असे म्हटलेले आहे. याचा अर्थ कल्पनाशक्ती ही एक मानसिक शक्ती आहे असे ते मानतात. संवेदनशक्तीमुळे एखाद्या वस्तूकडून आपणास विशिष्ट स्वरूपाच्या संवेदना प्राप्त होतात. त्यापूर्वीच्या अनेक अनुभवांतून त्या वस्तूची संकल्पना आपल्या ठिकाणी असलेल्या संकल्पनाशक्तीने तयार केलेली असते. ती सामान्य असल्यामुळे ती विशिष्ट संवेदनांना सरळ सरळ लावता येत नाही. म्हणजे विशिष्ट सर्पाकडून येणाऱ्या विशिष्ट संवेदना आणि आपल्या डोक्यात असलेले सर्पत्व यांचा सरळ संयोग होत नाही. त्यामुळे हा सर्प आहे हे ज्ञान निष्पन्न होत नाही. तेव्हा विशिष्ट संवेदना आणि सामान्य संकल्पना यामध्ये संयोग साधणारी जी शक्ती कांटने मानली, ती कल्पनाशक्ती होय. कल्पनाशक्ती हे संयोग साधण्याचे कार्य संकल्पनांवर आधारित असे कल्प तयार करून करते. आणि कल्पांच्या मध्यस्थीने संकल्पना आणि संवेदना यांचा संयोग साधला की हा सर्प आहे हे ज्ञान निष्पन्न होते.

कांट यांनी कल्पनाशक्तीला निर्मितीक्षम कल्पनाशक्ती असेही म्हटलेले आहे. ज्यावेळी एकदा अनुभवलेले इंद्रियसंवेद्य घटक केवळ पुन्हा अनुभवण्यासाठी मनात साठवण्याचे कार्य कल्पनाशक्ती करते तेव्हा तिला कांट पुन्हा प्रत्ययकारी कल्पनाशक्ती ही संवेदनांच्या सामग्रीत संकल्पनांच्या मदतीशिवाय व्यवस्थापन करते. त्याला संकल्पना नसतात असे नाही, पण निश्चित स्वरूपाच्या संकल्पना नसतात. त्यामुळे अशा अनुभवात संवेदनशक्ती, संकल्पनाशक्ती आणि कल्पनाशक्ती यांचे कोणत्याही नियमाशिवाय स्वैर मिलन घडते. हाच सौंदर्याचा अनुभव होय. असे कांटच्या कल्पनाशक्तीविचाराचे विवेचन म. सु. पाटील यांनी केलेले आहे.

**एस. टी. कोलरिज :-**

कोलरिज यांचा कल्पनाशक्तीचा विचार पाश्चात्त्य साहित्यमीमांसेत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी कल्पनाशक्तीचे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यामध्ये एक प्रथम श्रेणीची व दोन द्वितीय श्रेणीची कल्पनाशक्ती यांचा समावेश होतो. या कल्पनाशक्तीच्या प्रकारांच्या स्वरूप याविषयी डॉ. रा. भा. पाटणकर लिहितात, प्रथम श्रेणीची कल्पनाशक्ती सर्व सेंद्रिय ज्ञानात महत्त्वाची कामगिरी

बजावते. हे कार्य संवेदनशक्ती व संकल्पनाशक्ती यांचे मिलन घडून आणणे होय. याचा अर्थ ही कल्पनाशक्ती ज्ञानाची निर्मिती करते. ती कल्प निर्माण करून ज्ञानाची निष्पत्ती करणाऱ्या कांटच्या निर्मितीक्षम कल्पनाशक्तीसारखी आहे. परंतु ही शक्ती सगळ्या माणसांना लाभलेली असते. ती कलावंतांपुरती मर्यादित नाही. कलावंतांचा संबंध द्वितीय श्रेणीच्या कल्पनाशक्तीशी आहे. ही शक्ती एक निराळेच विश्व निर्माण करते. ती संवेदनशक्तीकडून मिळलेली सामग्रीपण त्यातून एक नवी बंदिश निर्माण करणे हा द्वितीय श्रेणीच्या कल्पनाशक्तीचा उद्देश असतो. ही बंदीश म्हणजेच कलाकृती किंवा कलावंताचे निराळेच असे विश्व होय. वरील सर्व विवेचनावरून कोलरिजने मांडलेल्या कल्पनाशक्ती विचाराचे स्वरूप स्पष्ट होते.

**फ्रॉईड :-**

फ्रॉईड हे जगविख्यात मानसशास्त्रज्ञ होते. त्यांनी मानवी मन व कल्पनाशक्तीचा मूलगामी विचार केलेला आहे. त्यांच्या मते कलेचा उगम हा मानवी मनाच्या विविध स्तरांमधून होतो. फ्रॉईडच्या कल्पनाशक्तीविचाराविषयी वसंत पाटणकर लिहितात, फ्रॉईड व फ्रॉईडवादी मनोविश्लेषणशास्त्रज्ञांनी काव्य व स्वप्न यांच्या तुलनेच्या आधारे काव्यनिर्मितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते चांगले काव्य हे स्वप्नांप्रमाणेच गुंतागुंतीचे, अतार्किक व प्रतीकात्मक स्वरूपाचे असते. आपल्या स्वप्नांची पाळेमुळे जशी अबोध वा बोधपूर्व मनात असतात तशीच ती काव्यनिर्मितीचीही असतात. स्वप्नांमुळे जशी इच्छातृप्ती होते, तशीच ती काव्यामुळेही होते. प्रत्यक्ष काव्य लेखनप्रक्रिया ही जाणिवेच्या पातळीवर होत असते. त्यामुळे जाणिवेच्या पातळीवरील घटकांचाही काव्यात शक्य तेवढा उपयोग होत असतो. परंतु कवीलाही अज्ञात असणाऱ्या त्याच्या मनोविश्वात काव्याची पाळेमुळे असतात. काव्यातील प्रतिमा, प्रतीके, एकूणच आशय व रूपविशेष आदि घटकांचे स्वरूप विशिष्ट प्रकारचे का आहे, याचा उलगडा अबोध मनातील प्रक्रियांचे स्वरूप कळल्यावर होत असतो. एका अर्थाने कल्पनाशक्ती ही स्वप्नांमध्ये विविध प्रकारच्या प्रतिमा घडवत असते, तिथे तिचा मुक्त विहार चाललेला असतो. त्याप्रमाणे काव्यनिर्मितीतही कल्पनाशक्ती प्रतिमा घडवते, मुक्त, नियमरहित विहार करते. फ्रॉईड यांच्या विचारातून त्यांच्या पुरस्कारकर्त्यांनी कल्पनाशक्तीचे मूळ मानवी नेणिवेत शोधलेले आहे. स्वप्नांचे सार्वभौमत्व मान्य करून अनियंत्रित कल्पनाशक्तीचा पुरस्कार केला आहे.

**प्रभाकर पाध्ये :-**

मराठी साहित्यविचारात प्रभाकर पाध्ये यांनी साहित्य निर्मिती प्रक्रियेविषयी मूलभूत विचार मांडलेले आहेत. त्यांनी संज्ञा, बोधना व प्रतिभा अशा तीन महत्त्वपूर्ण संकल्पना मांडल्या. सर्व विश्व म्हणजे उर्जा आहे. मानवाची संज्ञाशक्ती ही वैश्विक उर्जेचेच एक रूप आहे. या वैश्विक उर्जेतूनच, संज्ञेचा उगम झाला आहे. आपल्या सर्व संज्ञाव्यापाराच्या मुळाशी बोधना असते. मानवाच्या धडपडीमागे त्याची जीवन जगण्याची जबरदस्त इच्छा, जीवनतृष्णा असते. या जीवनतृष्णेतूनच बोधनेची निर्मिती व विकास झाला आहे. मानवाचा बहुतांश जीवनव्यवहार जीवनतृष्णेनेच ग्रासलेला असतो. त्यांनी प्रतिभेची संकल्पना मानवी जीवनाच्या व्यावहारिक, वैचारिक आणि कलात्मक अशा सर्व अंगांना व्यापणारी आहे. ते प्रतिभेचे बद्ध प्रतिभा आणि मुक्त प्रतिभा असे दोन प्रकार मानतात. त्यातील बद्ध प्रतिभा ही त्यांच्या मते बोधनेशी त्याचप्रमाणे कारागिरी, तंत्रज्ञान, संस्थात्मक आचारधर्म, व्यावहारिक नीती वगैरे जीवनाच्या व्यावहारिक अंगांशी निगडित आहे. याउलट मुक्त प्रतिभा ही नवनिर्मितीशी संबंधित असल्याचे ते सांगतात. ती ही नवनिर्मिती कला, विज्ञान, तत्त्वज्ञान, उच्च धर्म, विशुद्ध स्नेह, क्रीडा, शुद्ध नीती इत्यादी क्षेत्रांमध्ये स्वरंजनात्मक वृत्तीने करते. नवनिर्माणक्षमता हा तिचा धर्म आहे. कलेच्या विश्वात ती

नवनवीन संकल्पनांचा उपयोग करते आणि त्या रूपबंधात चैतन्य ओतण्यासाठी भावनानिर्मितीचा उपयोग करते.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रतिभाव्यापार आणि स्वप्नव्यापार म्हणजे काय ते सांगा ?

## २.९ समारोप

साहित्यविचारात साहित्यनिर्मिती हा महत्त्वाचा घटक आहे. साहित्यशास्त्रात पौर्वात्य आणि पाश्चात्त्य मीमांसकांनी याची विशिष्ट तत्त्वे विशद करून साहित्यनिर्मितीची प्रक्रिया सविस्तरपणे सांगितली आहे. यामध्ये प्रतिभा हा केंद्रवर्ती घटक असून त्याची मूलभूत चिकित्सा वरील विवेचनातून आपल्या लक्षात आलेली आहे. त्याला जोडूनच कल्पनाशक्ती विषयी पाश्चात्त्य अभ्यासकांचे चिंतनही महत्त्वाचे आहे. जे आधुनिक पद्धतीचे असून त्यातून साहित्याचा नवा अन्वयार्थ दृग्गोचर झालेला आहे.

## २.१० संदर्भ ग्रंथ

१. 'साहित्यशास्त्र : उद्‌गम आणि विकास' : पांडुरंग वामन काणे
२. 'साहित्यविचार' : डॉ. अरविंद वामन कुलकर्णी
३. 'साहित्यविचार' : संपादक डॉ. दत्तात्रय पुंडे, डॉ. स्नेहल तावरे
४. 'भारतीय साहित्यशास्त्र' : ग. त्र्यं, देशपांडे
५. 'पाश्चात्त्य साहित्यशास्त्र' : सिद्धांत आणि संकल्पना : डॉ. सुरेश धायगुडे
६. 'आधुनिक साहित्य सिद्धांत' : मिलिंद मालशे, अशोक जोशी

## २.११ स्वाध्याय

१. साहित्यनिर्मितीप्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा.
२. साहित्यनिर्मितीच्या शक्ती विशद करा.
३. प्रतिभाव्यापार आणि स्वप्नव्यापार याविषयी अभ्यासकांनी मांडलेल्या विविध मतांचा आढावा घ्या.
४. साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू स्पष्ट करा.
५. भारतीय परंपरेतील प्रतिभाशक्तीचा विचार विशद करा.
६. कल्पनाशक्तीसंदर्भात प्रभाकर पाध्ये यांचे विचार स्पष्ट करा.

❖❖❖❖

# घटक - २.१

## साहित्याची आस्वादप्रक्रिया

**घटक रचना :**

२.१.० उद्दिष्ट्ये
२.१.१. प्रस्तावना
२.१.२. आस्वाद म्हणजे काय ?
२.१.३. साहित्याची आस्वादप्रक्रिया
२.१.४. आस्वादकाचे गुणधर्म
२.१.५. साहित्यानुभवाचे सर्वसाधारण स्वरूप
२.१.६. वाचनप्रक्रिया, कालधिष्ठित, संप्रेषण-विश्लेषण प्रक्रिया
२.१.७. साहित्यिक ज्ञानक्षमता – जोनाथन कलर
२.१.८. समारोप
२.१.९. संदर्भ ग्रंथ

### २.१.० उद्दिष्ट्ये

१) साहित्याची आस्वाद प्रक्रिया समजण्यास मदत होईल.
३) साहित्य आस्वादकाच्या ठिकाणी असणारे गुणधर्म लक्षात येतील.
३) साहित्यानुभावाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे हे लक्षात येईल.
४) वाचन प्रक्रिया व कालाधिष्ठीत संप्रेषण - विश्लेषण प्रक्रिया समजेल.

### २.१.१. प्रस्तावना :

साहित्यविचारातील महत्त्वाचा घटक म्हणजे आस्वाद होय. लेखक कलाकृतीचे लेखन करत असतो. ती कलाकृती वाचकापर्यंत जाते तेव्हा त्या कलाकृतीची खरी कसोटी असते. वाचकाला कलाकृतीमधून कोणता जीवनाशय मिळतो. ती कलाकृती वाचकाला, रसिकाला कोणता जीवनानुभव देते यावर त्या कलाकृतीचे श्रेष्ठत्व अवलंबून असते. कलाकृतीच्या या प्रक्रियेत वाचक हा घटक महत्त्वाचा असून आस्वादन प्रक्रियेमधील तो महत्त्वाचा भाग असतो. त्यामुळे या आस्वादप्रक्रियेचा विचार करणे अगत्याचे ठरते. साहित्यविचारात याविषयी प्राचीन काळापासून मूलभूत चिंतन मांडलेले आहे. विशेषतः पौर्वात्य आणि पाश्चात्त्य अभ्यासकांचे आस्वादप्रक्रियेसंदर्भात केलेले विवेचन महत्त्वपूर्ण आहे. यामध्ये आस्वाद या शब्दार्थापासून

त्यातील विविध घटकांची संकल्पना विस्ताराने मांडलेली आहे. याचा तपशीलवार विचार पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

## २.१.२. आस्वाद म्हणजे काय?

आस्वाद हा शब्द पाकशास्त्रातून आलेला आहे. संस्कृतमधील त्याचा अर्थ चव, चव घेणे, खाऊन पाहणे असा आहे. इंग्रजीत त्याला टेस्ट (Test) असे म्हणतात. एखाद्या पदार्थाची चव कशी झालेली आहे. तो चांगला झाला आहे की नाही याची पारख आस्वादातून लक्षात येते. मात्र हा शब्द अनेक संदर्भात विविधार्थाने वापरला जातो. सामान्यपणे आस्वाद हा शब्द एखाद्या गोष्टीमुळे होणारा आनंद, सुख, समाधान वगैरे दर्शवितो. साहित्यशास्त्रात आस्वाद ही संकल्पना पाकशास्त्रातून आलेली आहे. प्राचीन भाषाविशारद भरतमुनींनी नाट्यशास्त्रात आस्वाद ही संज्ञा सर्वप्रथम वापरली. आस्वादयन्ति सुमनस्ः प्रेक्षकाः असे त्यांनी म्हटलेले आहे. साहित्यविचारात आस्वाद म्हणजे रसग्रहण, आकलन आस्वादात मोडते. इंग्रजीत त्याला Test असे म्हटले जाते. याचा अर्थ to value properly किंवा Sympathetic recognition of excellence असा आहे. म्हणजे साहित्यकृतीतील नेमक्या सौंदर्यांची सहानुभूतिपूर्वक घेतलेली दखल आणि त्याद्वारा केलेले योग्य मूल्यमापन आस्वाद या संकल्पनेत अंतर्भूत असते.

## २.१.३. साहित्याची आस्वादप्रक्रिया :

कोणत्याही साहित्यकृतीचे सौंदर्य हे कलाकृतीच्या अंतरंग व बहिरंग या दोहोतही अंतर्भूत असते. आशय आणि अभिव्यक्ती या दोन स्तरावरून साहित्यातील सौंदर्याचा शोध घेतला जातो. या दोहोंच्या उभारणीतील कौशल्याची दखल आस्वादप्रक्रियेत येते. या प्रक्रियेविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, साहित्यकलेचे मूलद्रव्य वा साधन शब्द आहे. ते नुसतेच मानवनिर्मित नसून मानवशरीरांतर्गतही आहे. लिखित शब्द किंवा भाषा या साधनाच्या आधारे लेखकाचे अमूर्त मनोगत, अनुभव मूर्त वा गोचर होत असतो. या व्यवहारात रसिकाचा संबंध लेखकाचा अनुभव कलाकृतीच्या रूपाने गोचर झाल्यानंतर येतो. रसिकमनाशी संयोग पावतो तो शब्दरूप झालेला लेखकाचा अनुभव. ही संयोगप्रक्रिया म्हणजेच 'आस्वादप्रक्रिया' होय.

साहित्याची आस्वादप्रक्रिया विविध घटकांनी बंदिस्त असते. लेखक, साहित्यकृती आणि रसिक असा लेखनाचा विचार करताना नेहमीच एक त्रिकोण कल्पित केला जातो. आस्वादप्रक्रियेचा विचार करताना यापैकी रसिक किंवा आस्वादक या तिसऱ्या कोनाचाच विचार महत्त्वाचा ठरत असतो. कारण लेखक हा निर्माता, साहित्यकृती ही निर्मिती असे दोन कोन ठरतात. आस्वादक हा या निर्मितीची नेमकी दखल घेऊ पाहणारा तिसरा कोन होय. त्याच्याकरवीच आस्वादनाची क्रिया घडते. यासाठी तो ज्या शक्तीचा आधार घेतो ती शक्ती म्हणजे रसिकता, सौंदर्यक्षमता ही होय. साहित्याकडे पाहण्याची दृष्टी कोणतीही असो, त्यातून संभवणाऱ्या फलिताचे स्वरूप कसेही असो, पण आस्वादनाची म्हटली जाणारी क्रिया एकच होत असते. आस्वादक कोणत्याही संप्रदायातील असला तरी त्याचा प्रयत्न साहित्यकृतीतील मर्माचे, सौंदर्याचे, रसाचे ग्रहण करणे हाच असतो. तेव्हा आस्वादकांना अभिप्रेत असणारे मार्ग भिन्न असतात. पण त्याचे साध्य एकच असते ते म्हणजे सौंदर्यशास्त्राची एक शाखा आहे असे म्हटलेले आहे.

munotes.in

आस्वादप्रक्रियेविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, लेखक त्याला विशेषकरून जाणवलेले अनुभव शब्दांच्या आधारे विशिष्ट रुपात साकार करीत असतो, तीच साहित्यकृती होय. शब्द हेच तिचे मूलद्रव्य व साधन असते. वाचक त्या शब्दांचा आधार घेऊनच त्यामागील लेखकाचा अनुभव हेरू पाहत असतो. त्याची ही कृती म्हणजे काव्यास्वाद होय. अशा आस्वादात त्याच्या मनावर साहित्यकृतीचा एक एकात्म संस्कार होत असतो. या संस्कारात आशय आणि अभिव्यक्ती यांचे ऐक्य सामावलेले असते. अशा संस्कार स्वीकाराच्या द्वाराच तो साहित्यकृतीच्या अंतरंगाचे व बहिरंगाचे विशेष आपल्या अनुभवविश्वात सामावून घेत असतो. तेव्हा काव्यास्वाद म्हणजे सर्वार्थाने रसिकाच्या मनाने कलाकृतीत केलेले आवगाहन होय. हे आवगाहन हा प्रवेश जितके सूक्ष्म, उत्कृष्ट व चोखंदळ तितका आस्वाद वरच्या श्रेणीचा आणि त्यातील आनंदही मोठा, वरचा श्रेणीचा मानला जातो.

साहित्यकृतीकडे पाहण्याचे अनेक विद्यमान दृष्टिकोन आहेत. त्यामुळे भिन्न भिन्न समीक्षापद्धती अस्तित्वात आलेल्या आहेत. अशा पद्धतींपैकी आस्वादसमीक्षा ही सरळसरळ रसास्वादावरच भर देऊन अस्तित्वात आलेली पद्धती आहे. पण चरित्रात्मक, ऐतिहासिक, समाजशास्त्रीय, मार्क्सवादी, मानसशास्त्रीय वगैरे ज्या इतर पद्धती दिसतात त्यांच्याबाबतीतही आस्वाद हा पायाभूत घटक आहे. दृष्टी कोणतीही असो, ती कलावादी असो वा जीवनवादी, कलाकृतीचा आस्वाद ही सर्वप्रथम आवश्यक बाब आहे. एकूणच आस्वादप्रक्रिया ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. कलाव्यवहारात तिला महत्त्वाचे स्थान असते. त्यामध्ये विविध घटक अंतर्भूत असून त्यांची संगती लक्षात घेणे अगत्याचे असते.

## २.१.४. आस्वादकाचे गुणधर्म :

साहित्याच्या आस्वादप्रक्रियेत वाचकाची भूमिका महत्त्वाची असते. तो रसिक, आस्वादक या भूमिकेतून साहित्याचा आस्वाद घेतो. काव्यास्वाद हा योग्य रीतीने झाल्याशिवाय काव्यसौंदर्याची जाणीव होणे शक्य होत नाही. त्यामुळे या आस्वादप्रक्रियेत आस्वादक हा महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या माध्यमातून ही सर्व प्रक्रिया घडत असते. चांगला आस्वादक होण्यासाठी त्याच्या अंगी काही गुणधर्म असावे लागतात. अरविंद वामन कुलकर्णी यांनी साहित्यविचार या ग्रंथामध्ये आस्वादकाचे गुणधर्म सांगितलेले आहेत. त्यामध्ये १. मानसिक स्वास्थ्य, २. सौंदर्यदृष्टी, ३. रसिकता, ४. संवेदनक्षमता, ५. कलाशास्त्राचे अध्ययन, ६. जिज्ञासा, ७. मनाची निर्मलता, ८. कलाकृतीशी तद्रूप होण्याची क्षमता, ९. साहित्य आणि साहित्यप्रकार यांचे ज्ञान, १०. कलात्मक अलिप्तता, ११. प्रतिभा यांचा समावेश होतो. या सर्व आस्वादक गुणविशेषांचा विचार पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

### १. मानसिक स्वास्थ्य :

आस्वादप्रक्रियेत मानसिक स्वास्थ्य महत्त्वाचे असते. कलास्वाद ही एक मानसिक गरज असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीजवळ ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात असतेच असते. गाण्याची रुची नसलेला माणूस विरळच असतो. पण सर्वांजवळ असणारी ही रसिकता संस्कारित नसते, ती केवळ प्राथमिक आवडीच्या स्वरूपाची असते.

## २. सौंदर्यदृष्टी :

साहित्यविचारात सौंदर्य हे मूलतत्त्व मानलेले आहे. लेखक अथवा वाचक या दोहोंच्या पातळीवर सौंदर्यदृष्टी अतिशय महत्त्वाची आहे. आस्वादकांच्या अंगी ही सौंदर्यदृष्टी असणे गरजेचे असते. कोणती कलाकृती चांगली आहे. याची दृष्टी वाचन, चिंतन व अभ्यासातून घडते. वाचकाचे वाचन जेवढे चांगले तेवढे वाचकाचे चिंतन अधिक प्रगल्भ असते. यातूनच त्याची सौंदर्यदृष्टी विकसित होते असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

## ३. रसिकता :

कलास्वाद ही एक मानसिक गरज असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीकडे ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात असतेच. मात्र सामान्य वाचक आणि रसिक यांच्यात फरक असतो. चोखंदळ वृत्ती, सूक्ष्म निरीक्षण आणि चांगल्या वाङ्मयीन संस्कारातून सामान्य व्यक्ती रसिक बनतो. अरविंद कुलकर्णी यांनी रसिकतेविषयी मार्मिक विवेचन केलेले आहे. ते लिहितात, रसिकता ही संस्कारांनी तयार होते. पण ती शिकवून येत नाही. तशीच प्रयत्नसाध्यही नाही. ती मुळात जशी असेल तशीच मात्र शेवटपर्यंत राहत नाही. विकसनशीलता हा तिचा विशेष म्हणावा लागेल. अधिकाधिक वाचनामुळेच वाचनातील चांगल्या वाईटाची सीमारेषा स्पष्ट होत जातात. कलामीमांसकांच्या मार्गदर्शनामुळे मूल्यमापनाचे निकषही त्याच्या हाती येऊ शकतात. एकदा आवडीने वाचलेले पुस्तक दहा पंधरा वर्षांनी पुन्हा वाचायला घेतले की त्यात नवनवीन सौंदर्यस्थळांचे दर्शन होत जाते. ते केवळ विकसित झालेल्या रसिकतेमुळे. रसिकतेत रसिकाच्या संस्काराचा वाटा मोठा असतो. प्रत्येक रसिक हा कोणत्या ना कोणत्या समाजात व संस्कृतीत वाढलेला असतो. त्याच्या मनाच्या घडणीत आणि एकूण दृष्टिकोनात त्याच्या संस्कृतीचे गुणविशेष मुरलेले असतात. त्याच्या आवडी निवडी, आचार, चालीरीती, जीवनविषयक दृष्टिकोन, एकूणच जगण्याची पद्धत या साऱ्यांवर त्याच्या संस्कृतीची सावली पडलेली असते. म्हणूनच संस्कृतीचे सूत्र रसिकतेच्या घडणीत महत्त्वाचे असते.

## ४. संवेदनक्षमता :

साहित्यकृती ही समजण्यासाठी नसून अनुभवण्यासाठी असते असे म्हटले जाते. यालाच प्रा. गो. वि. करंदीकर यांनी ‘कविता भोगणे’ असे म्हटले आहे. हे अनुभवणे किंवा भोगणे रसिक-आस्वादक त्यांच्या संवेदनक्षमतेच्या जोरावर करू शकतो ती जितकी उत्कट, तीव्र, अचूक, सूक्ष्म, सर्वस्पर्शी तितका साहित्यकृतीचा अनुभव किंवा (उप) भोगही उत्कट, तीव्र, अचूक, सूक्ष्म, सर्वस्पर्शी होतो. अशा संवेदनक्षमतेच्या अभावी वाचक फक्त त्या त्या साहित्यकृतीचा दर्शनी अर्थ लावू शकतो. त्या कृतीत दडलेले सौंदर्य हेरू शकत नाही. संवेदनक्षमता जन्मजात असते. ती एखाद्या समाजाची वा संस्कृतीची मिरासदारी नसते. अरविंद कुलकर्णी यांनी संवेदनक्षमतेविषयी केलेले वरील विवेचन महत्त्वपूर्ण आहे.

## ५. कलाशास्त्राचे अध्ययन :

कोणत्याही गोष्टीचे ज्ञान हे ती गोष्ट समजून घेण्यासाठी उपकारक ठरते. कलेच्या क्षेत्रात कलाशास्त्राचे अध्ययन हे महत्त्वाचे असून कलास्वादासाठी ते उपकारक आहे. असे अध्ययन कला किंवा साहित्यातील चांगले वाईट समजण्यास, त्या दृष्टीने साहित्यकृतीची निवड व वर्गवारी करण्यास आणि मुख्यतः त्याचा सौंदर्यात्मक संदर्भ लक्षात घेण्यास मदत करते. एखादी साहित्यकृती कशामुळे चांगली उतरली आहे किंवा कशामुळे सुमार उतरली आहे याचे ज्ञान कलाशास्त्राचे अध्ययन देते. मुळात वाचनाचे वेड असलेला माणूस जसजसे आधिकाधिक

वाचन करीत जातो तसतसे त्याचे वाचन अधिक डोळस, जास्त प्रगल्भ व प्रौढ होते. वाचनाचा असा व्यासंगच त्या व्यक्तीला एक दृष्टी देतो. वाचनाचे वेड ही मुळातच आवश्यक गोष्ट असून त्याशिवाय तिचे व्यासंगात रूपांतर होणे अशक्य आहे.

### ६. जिज्ञासा :

मानवी जीवनविकासात जिज्ञासा ही अतिशय महत्त्वाची बाब ठरलेली आहे. किंबहुना माणसाच्या सर्जनशीलतेचा तो एक गुणविशेष असतो. अरविंद कुलकर्णी यांनी आस्वादाला आवश्यक असणाऱ्या गुणांमध्ये तिचा समावेश केलेला आहे. याविषयी ते लिहितात, मानवी मन आणि मानवी जीवन यातील व्यवहार, त्यातील गुंतागुंत, त्यातील सदृश्य, अदृश्य दालने इत्यादींबद्दलचे माणसाच्या मनाला एक खोल कुतूहल असते. साहित्यकृतीतील आशय आणि आविष्काराबद्दलचे असेच खोल कुतूहल मनाला त्या कृतीवर एकाग्र करते. त्या कृतीद्वारा जे जे समोर येते त्याचा स्वीकार या जिज्ञासेपोटी व्हायला लागतो. तिच्यापोटीच गोचर होणाऱ्या अनुभवविश्वाची संगतीही लावली जाते. एकूणच जिज्ञासा हा आस्वादातील महत्त्वाचा गुणविशेष आहे.

### ७. मनाची निर्मलता :

जुन्या संस्कृत मीमांसकांनी आस्वादकाचे मन दर्पणवत हवे असे सांगितले आहे. दर्पण म्हणजे आरसा होय. आरसा स्वच्छ असावा लागतो, तरच तो योग्य असे प्रतिबिंब दर्शवू शकतो, त्याच्यावर नेमक्या आणि नेटक्या स्वरूपात प्रतिबिंब उमटू शकते. योग्य आस्वादनासाठी साहित्यकृतीचे यथायोग्य असे प्रतिबिंब गढूळ होण्याचा संभव असतो. हे मन जर पूर्वग्रहदूषित असेल तर प्रतिबिंब गढूळ होण्याचा संभव असतो. समजा, नवकाव्याबद्दल आपल्या मनात, ते वाईट आहे असा पूर्वग्रह दृढ झाला आहे असे झाले तर आपण नवकाव्याचा आस्वाद या पूर्वग्रहातूनच घेऊ लागतो व त्यामधील फक्त उणीवांचाच विचार अधिकतेने मांडू लागतो. म्हणून पूर्वग्रहविरहित स्वच्छ मन हा योग्य आस्वादासाठीचा एक अत्यावश्यक विशेष ठरतो.

### ८. कलाकृतीशी तद्रूप होण्याची क्षमता :

आस्वाद प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक हा आस्वादक असतो. त्याच्या मनाची अवस्था आस्वादनासाठी महत्त्वाची असून कलाकृतीच्या आस्वादनात कलाकृतीशी तद्रूप होणे अगत्याचे असते. त्याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, आस्वादकाजवळ कलाकृती आणि तिचा लेखक यांच्याशी तद्रूप होण्याची क्षमता हवी. ती असल्याशिवाय कलाकृतीत सामावलेले अर्न्तबाह्य विश्व आणि त्यामागचे लेखकाचे मन तो खऱ्या अर्थाने अनुभवू शकणार नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. रसिकमन ही सुद्धा एक सविकल्प समाधीची अवस्था आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. रसिकमन अशा आस्वादकाळी तल्लीन झालेले असते. त्या क्षणी त्याला त्या साहित्यकृतीशिवाय इतर कोणत्याच गोष्टींचे भान नसते. अशी कलाकृतीमय अवस्था आस्वादकाळी प्राप्त झाली की, मगच त्या साहित्यकृतीतील सौंदर्याचा साक्षात्कार रसिक मनाला होऊ शकतो.

### ९. साहित्य आणि साहित्यप्रकार यांचे ज्ञान :

काव्यास्वादात ज्ञानाला ज्ञान म्हणून स्थान नसते तर काव्यगत ज्ञान म्हणून ते लक्षात घेतले जाते. यामध्ये साहित्य आणि साहित्याचे प्रकार हे महत्त्वाचे असतात. त्यांचे आकलन करून घेणे, त्यांचा अभ्यास असणे, त्यांचे ज्ञान अवगत असणे या गोष्टी आस्वाद प्रक्रियेत

munotes.in

महत्त्वाच्या ठरतात. त्यामुळे आस्वादकाकडे या प्रकारचे ज्ञान हे गरजेचे असते. कारण हे ज्ञानच त्याला साहित्याचा आस्वाद घेताना मार्गदर्शक, प्रेरक ठरते. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, साहित्यकृती नेमकी कोणत्या प्रकारात मोडणारी आहे हे लक्षात घेणे तिच्या मर्मग्रहणाच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरणारे असते. त्या त्या साहित्य प्रकाराच्या अनुषंगाने जीवनदर्शनाबाबतच्या अपेक्षा संकोचत असतात किंवा रूंदावत असतात. अल्पकाळाचे परिमाण असणारी कथा आणि प्रदीर्घ काळाचे परिमाण असणारी कादंबरी यातील विवेक आस्वादकाला मदत करीत असतो. तो तो साहित्यप्रकार हाताळण्यातील लेखकाचा कच्चेपणा, नवशिकेपणा किंवा सराईतपणा अशा ज्ञानाच्या जोरावरच रसिक आस्वादकाळी ताडू शकते. एखादा लेखक चाकोरीबद्ध लेखन करणारा आहे की नवा मार्ग निर्माण करणारा बंडखोर आहे याचे निदान अशा ज्ञानाच्या आधारेचे रसिक करु शकतो. एकूणच वरील विवेचनावरुन आस्वाद प्रक्रियेतील साहित्याचे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे हे आपल्या लक्षात येते.

### १०. कलात्मक अलिप्तता :

पाश्चात्त्य अभ्यासक बुलो यांनी सौंदर्यशास्त्राचा विचार करत असताना समीक्षेचे रूप म्हणून अलिप्ततेची संकल्पना मांडलेली आहे. साहित्याच्या आस्वादनामध्ये कलात्मक अलिप्तता जरुरी असते. ज्याप्रमाणे कलास्वादात तद्रूपता आवश्यक आहे त्याचप्रमाणे अलिप्तता ही सुद्धा गरजेची गोष्ट असते. त्याशिवाय निखळ आनंद घेता येत नाही. म्हणून साहित्य विचारात या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू असून ते नाणे हे आस्वादाचे आहे असे अरविंद कुलकर्णी यांनी म्हटलेले आहे. ते पुढे लिहितात, साहित्यकृतीतून आविष्कृत होणाऱ्या विश्वाशी आपण एकरुप वा तद्रूप झालो नाही, तर त्या विश्वातील तपशिलाची, त्याद्वारे सिद्ध होणाऱ्या व्यूहाची आणि त्या व्यूहाच्या नेमक्या रोखाची आपणास कल्पना येणार नाही. त्यातील बारकावे, त्यांची गुंतागुंत आणि सोडवणूक, साहित्य कृतीतील आशय व आविष्कार यांचे यथार्थ अस्तित्व इत्यादींचा थांग लागणार नाही, पण या बरोबरच या सर्व गोष्टींमध्ये आपण पूर्णपणे बुडून गेलो तर यांची संगती लावणे, यांची वीण तपासणे, यांचा कलात्मक संदर्भ लावणे, शेवटी मूल्यमापन करणे इत्यादी गोष्टींचा थांग लावणे अशक्य होईल. त्यासाठी अलिप्तता हवी. अशी अलिप्तता आस्वाद प्रक्रियेत मुळातच असेल तर आस्वादन विषयाचे नेमके कलात्मक आकलन शक्य होऊ शकते. एकूणच वरील विवेचनावरुन आस्वादकासाठी कलात्मक अलिप्तता महत्त्वाची असते. हे लक्षात येते.

### ११. प्रतिभा :

आस्वादकाच्या अंगी असाव्या लागणाऱ्या विविध गुणविशेषांमध्ये शेवटी प्रतिभा विशेषांचा निर्देश केला जातो. वास्तविक प्रतिभा ही साहित्य निर्मितीमधील केंद्रवर्ती घटक आहे. लेखकाच्या अंगी या प्रतिभेचा जसा अंतर्भाव असावा लागतो तशाच प्रकारे वाचक, रसिक, आस्वादकाच्या अंगी सुद्धा प्रतिभेची गरज असते. याची मांडणी प्राचीन काळापासून मीमांसकांनी केलेली आहे. अभिनव गुप्त या संस्कृत काव्य मीमांसकांने आदर्श रसिकांचे वर्णन करताना 'आधिकारीचात्र विमल प्रतिभानशाली सह्रदय' अशी त्याच्या बद्दलची अपेक्षा व्यक्त केली आहे. यातील सह्रदय हा शब्द फार अर्थपूर्ण आहे. रसिक सह्रदय हवा. म्हणजे लेखक व साहित्यकृती यांच्या बद्दलच्या त्याच्या दृष्टिकोनात या भूमिकेत मुळातच सहानुभाव हवा. प्रतिभेने युक्त असा सह्रदय अधिकारी असाच त्याचा अर्थ आहे. इथे अभनिव गुप्ताने जो सह्रदय अधिकारी असा उल्लेख केलेला आहे तो म्हणजे साहित्यातील जाणकार, माहितगार, ज्ञानी असला पाहिजे. पण तो नुसताच ज्ञानी वा माहितगार असता उपयोगाचा नाही, तर तोही प्रतिभावंत असला पाहिजे. नुसता लेखकच

प्रतिभाशाली असून भागत नाही, तर रसिकही प्रतिभाशाली हवा. म्हणून आस्वादासाठी अतिशय महत्त्वाचा गुण म्हणजे आस्वादकाच्या अंगी प्रतिभा असणे हा होय. तिच्या आधारेच रसिक साहित्य कृतीतील सर्व सूचक स्थळे जाणू शकतो.

डॉ. अरविंद कुलकर्णी यांनी केलेले वरील आस्वादकाच्या गुण विशेषांचे विवेचन महत्त्वपूर्ण आहे. आस्वाद प्रक्रिया समजून घेण्यासाठी या सर्व विशेषांचा अंतर्भाव महत्त्वाचा ठरतो. उत्तम आस्वादकच साहित्याचा आनंद घेऊ शकते. त्यातून साहित्याचा व्यवहार गतिमान होत असतो.

## २.१.५ साहित्यानुभवाचे सर्वसाधारण स्वरूप

साहित्य ही जीवननिष्ठ कला आहे. मानव आपल्या जीवन जाणिवा साहित्यातून शब्दबद्ध करत असतो. या आविष्कारामागे त्याच्या जीवनानुभवांची संगती असते. मानवी जीवनातील अनुभव विविधांगी स्वरूपाचे असतात. कलानुभव हा यातील एक महत्त्वाचा अनुभव आहे. साहित्य विचारात या अनुभवाविषयी मूलभूत चिंतन मांडलेले आहे. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, 'अनुभव या संकल्पनेत तीन घटक सामावलेले दिसतात. संवेदना, विचार आणि भावना हे ते तीन घटक होत. डोळे, नाक, कान, जीभ, त्वचा या पाच ज्ञानेंद्रियांमार्फत माणसाचे बाह्य सृष्टीशी क्रिया प्रतिक्रियात्मक व्यवहार चालू असतात. यापैकी कोणत्याही इंद्रियाद्वारा बाह्य सृष्टीचा लाभणारा संदेश, त्याला मेंदूकरवी दिले जाणारे प्रत्युत्तर आणि त्याचे माणसाच्या ठिकाणी संभवणारे परिणाम ही सर्व प्रक्रिया पाहू जाता बाह्य गोष्टींच्या संयोगातून पहिल्यांदा संभवते ती ऐंद्रिय संवेदना हे लक्षात येते. या संवेदनाचा अर्थ लावला गेल्यानंतर विचार व भावना या गोष्टी येतात. या तिन्हींच्या एकत्रीकरणातूनच एक विशिष्ट अर्थ व रोख प्राप्त झालेली जाणीव संपूर्ण जाणीव संभवते. तिला अनुभव म्हणता येईल. साहित्यानुभवाविषयीसुद्धा याच घटकांचा आधार असतो.' अरविंद कुलकर्णी यांनी आपल्या साहित्यविचार या ग्रंथांत साहित्यानुभवाचे विशेष सांगितलेले आहेत. त्यामध्ये १. संवेदनात्मकता, २. भावनात्मकता, ३. वैचारिकता, ४. सूचकता, ५. विशिष्टता आणि विश्वात्मकता, ६. सेंद्रियत्व यांचा समावेश होतो. या सर्वांमधून अनुभवाचे सर्वसाधारण स्वरूप दृग्गोचर होते. या सर्व विशेषांचा विस्तृतपणे विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. संवेदनात्मकता :**

मानवी व्यक्तित्वाचा एक विशेष हा संवेदनशीलता असतो. या संवेदनेतूनच त्याची सर्जनशीलता विकसित होते. ऐंद्रिय संवेदनात्मकता हा कलात्मक अनुभवातील आद्य घटक आहे. कोणत्याही कलावंताच्या ठिकाणी तीव्र संवेदनशीलता असावीच लागते. त्याशिवाय तो जीवनानुभवांना कलात्मक रूप देऊ शकत नाही. याची चर्चा साहित्यशास्त्रात सौंदर्य विचार चिंतनातून विकसित झालेली आहे. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, बा. सी. मर्ढेकरांनी संवेदना जागृतीवर आधारित असा कलेविषयी काव्याविषयी जो लयसिद्धांत मांडला आहे, त्याच्या स्पष्टीकरणासाठी ते फक्त बालकवींचे उदाहरण देतात. मर्ढेकरांनी संवेदनांचे संवाद आणि विरोध असे दोन गुणात्मक आणि समतोल असा एक संख्यात्मक मिळून तीन गट काव्यात निर्माण होतात आणि त्यातून सौंदर्य प्रतीती कशी येते याचे विस्तृत विवेचन केले आहे. एकूणच ही संवेदनात्मकता लेखकाच्या अनुभव विश्वाचा महत्त्वपूर्ण भाग असते हे आपल्या लक्षात येते.

### २. भावनात्मकता :

साहित्यानुभवातील संवेदनेच्या नंतरचा महत्त्वाचा घटक म्हणजे भावनात्मकता होय. कलानुभवाचे हे विशेष आहे. साहित्याची व्याख्या करताना भावनांचा उत्कट आविष्कार अशी केली जाते. इथे भावना ही मानवी संवेदनाच असते. पाश्चात्त्य साहित्यमीमांसेत याचा विस्ताराने विचार केलेला आहे. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, ललित साहित्याच्या संसाराचा आधारस्तंभ म्हणजे भावना विलास होय. त्यामुळे या अनुभवात असणारा भावनेचा स्पर्श वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. त्यामुळेच हा अनुभव काही विशिष्ट भावनांची जागृती आणि परिपोष करु शकतो. बोझकिट या सौंदर्य शास्त्रज्ञाच्या मते सौंदर्यानुभवात एक सुखद भावना असते. ललित साहित्याचा कोणताही प्रकार घेतला तरी त्यातील भावदर्शन नेहमीच महत्त्वाचे मानले जाते. संस्कृत मीमांसकांनी केलेली रसचर्चा ही यावर आधारित आहे. रस म्हणजे भावनेचीच एक विशिष्ट अवस्था होय. पाश्चात्त्य समीक्षेतही भावनानुबंधी घटक सांगितलेले आहेत. तेव्हा काव्यात आवश्यक असणारा भावनात्मकता हा विशेष त्यामागील अनुभवाबाबत आवश्यक असतो. वरील विवेचनातून साहित्यानुभवातील भावनात्मकतेचे महत्त्व अधोरेखित होते.

### ३. वैचारिकता

साहित्याचे ललित व ललितेतर साहित्य असे विभाजन केले जाते. त्यातील ललित साहित्य हे जसे भावनिक असते. त्याचप्रमाणे ललितेतर साहित्य हे वैचारिक असते असे म्हटले जाते. त्यामुळे वैचारिकता हे साहित्यातील अनुभवाचे एक विशेष ठरते. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, ललितेतर किंवा शास्त्रीय साहित्य हे ज्ञानाशी संबंधित असल्यामुळे बुद्धिमार्गाशी निगडित मानले जाते, पण ललित साहित्यालाही विचारांचे वावडे नसते / नसावे. इथे पथ्य इतकेच पाळले गेले पाहिजे की, ते लालित्याच्या अंगाने विकसित झाले पाहिजे. शास्त्रीय वा ललितेतर साहित्यात तो फक्त विचार म्हणून नांदत असतो. कलाकृती काही एक निश्चित विचार, वैचारिक दृष्टिकोण आपल्याला देतात. त्यांचे साहित्य आनंद देतेच, पण आनंदा बरोबर विचारही देते. याचे कारण एकच त्यामागील अनुभवात असलेला विचार बलत्र घटक होय. तिथे विचार हा नुसता वैचारिक पातळीवर राहत नाही, तर तो कलेच्या पातळीवर चढविलेला दिसतो. विचारांमुळे साहित्यकृतीला आपोआप एक भारदास्तपणा प्राप्त होत असतो. या घटकामुळेच त्या त्या साहित्यकृतीत एक वेगळे सामर्थ्य निर्माण होत असते. एकूणच वैचारिकता हे साहित्यानुभावाचा महत्त्वाचा पैलू आहे.

### ४. सूचकता

कलात्मक अनुभवाबद्दल संवेदना, भावना व विचार या घटकांना महत्त्वाचे स्थान आहे. याबरोबरच इतरही काही घटक त्यात महत्त्वाचे असतात. सूचकता हा त्यापैकी एक महत्त्वाचा विशेष होय. सूचकतेमुळे कलात्मक अनुभवाच्या ठिकाणी वसणाऱ्या लवचिकतेची कल्पना येऊ शकते. ललित साहित्यकृतीचे जे अनके अर्थ संभवू शकतात ते त्यामागील अनुभवाच्या ठिकाणी बसणाऱ्या सूचकता या विशेषामुळेच घडते. ललितेतर साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवात जर अशी लवचिकता आली किंवा अनेकार्थता आली तर अनर्थ संभवेल हे वेगळे सांगायला नको. तिथे निश्चितार्थ हवा. सूचकतेमुळे ललित साहित्यानुभवात चमत्कृती जाणवते आणि ती त्या अनुभवाला आकर्षक बनविते. एक कविता अनेकांकडून अनेकार्थांनी वाचली जाते, किंवा एकाच व्यक्तीला ती अनेकदा वाचताना अनेक अर्थाची जाणीव होत जाते, यामगील कारण त्यातील सूचकतेचे सामर्थ्य हेच होय असे अरविंद कुलकर्णी यांनी म्हटलेले आहे.

## ५. विशिष्टता आणि विश्वात्मकता

ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे हे दोन विशेष महत्त्वाचे आहेत. मुख्यतः ललितेतर साहित्यामागील अनुभवात फक्त विश्वात्मकता हा विशेष असतो असे म्हणता येईल. कारण त्यावर तो शोधणाऱ्या, ज्याचा तो आहे त्याच्या विशिष्टत्वाचा ठसा उमटलेला नसतो. तो अनुभव सर्वार्थाने सर्वांचा असतो. जसा न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत आहे. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, कवीचा विशिष्ट अनुभव जेव्हा काव्यातून व्यक्त होतो तेव्हा तो एकाच वेळी त्या कवीचा राहून सर्वांचा होत असतो. पण काव्यातून व्यक्त होत असतानाच त्यातील खासगीपणा किंवा वैयक्तिकता गळून पडत असते. तसतसा एकाच वेळी तो अनुभव कवीचा असतो तसाच तमाम वाचकांचाही बनतो. म्हणजेच विशिष्टत्व अबाधित ठेवूनही तो विश्वात्मक बनतो. ते सर्वच ललित साहित्यकृतीमागील विशिष्टत्व निरपेक्ष झालेले असतात. फक्त विश्वात्मक झालेले असतात. त्यांच्यावर त्यांच्या निर्मात्याचे ठसे नसतात. म्हणून शास्त्रातील लिखित प्रयोगानुभव फक्त साऱ्या जगाचे होत जातात. पण ललित साहित्यकृतीमागील अनुभवांचा आस्वाद त्यांच्या निर्मात्याच्या व्यक्ती वैशिष्ट्यांच्या जाणिवेशिवाय अशक्य असतो. वरील सर्व विवेचनातून साहित्यातील अनुभवाचे असणारे विशेष विशिष्टता आणि विश्वात्मकता हे अतिशय महत्त्वाचे आहेत. त्यातून व्यक्त होणारा अनुभव वेगळ्या स्वरूपाचा असतो. याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही.

## ६. सेंद्रियत्व

साहित्यानुभवातील खास विशेषांपैकी सेंद्रियत्व हा विशेष आहे. सर्वप्रथम ॲरिस्टॉटल यांनी कलाकृतीच्या सेंद्रियत्वाची संकल्पना मांडली. सजीव शरीराप्रमाणे कलाकृतीची रचना हवी, असे त्यांचे मत दिसते. हेगेल यांनी सौंदर्यानुभवाच्या बाबतीत याची मांडणी केली आहे. अनेकत्वातून होणारी एकत्वाची प्रतीती असे तिचे स्वरुप येथे मांडलेले आहे. साहित्यानुभवात किंवा कलानुभवात वसणाऱ्या भिन्न भिन्न घटकांचा एकात्म संस्कार यात अभिप्रेत आहे. याविषयी अरविंद कुलकर्णी लिहितात, नाक, कान, हात, पाय इत्यादी अनेकविध अवयवांच्या वा घटकांच्या चैतन्यमय एकत्रीकरणातून मानवी शरीराची संघटना जशी संभवते तशीच अनेकविध घटकांच्या आधारे साधली जाणारी एकात्म भाषिक संघटना म्हणजे कलाकृती वा साहित्यकृती आणि त्यामागील अनुभव होय. अशा संघटनेतील प्रत्येक घटकाची अपरिहार्य आवश्यकता महत्त्वाची आहे. जसा मानवी शरीराचा शरीर म्हणून एकच एक संस्कार होतो. हात, पाय, तोंड इ. घटकांचे वेगवेगळे संस्कार स्वतंत्रपणे जाणवत नाही. अशीच एकात्मता कलानुभवाबाबतच संभवते. म्हणजे ललित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव जिवंत हवा, स्वतंत्र हवा, चैतन्यमय हवा आणि मुख्य म्हणजे अंतर्बाह्य सुसंघटित हवा, एकात्म हवा हा सेंद्रीयतेचा या संदर्भात अर्थ आहे.

एकूणच मानवी जीवनातील विविध अनुभव आणि कलानुभव यांचा परस्परसंबंध घनिष्ठ स्वरूपाचा असतो. तरीसुद्धा कलानुभवाचे वेगळेपण त्याच्या सर्वसाधारण स्वरूपातच दडलेले आहे. इथे संवेदना, भावना आणि विचाराबरोबरच वरील सर्व घटक महत्त्वाचे आहेत. यातून साहित्यानुभवाचे संचित तयार होते.

## २.१.६ वाचन प्रक्रिया, कालाधिष्ठित संप्रेषण-विश्लेषण प्रक्रिया

साहित्य व्यवहारात आस्वाद, आकलन, मूल्यमापन या विविध प्रक्रिया आहेत. कोणतीही कलाकृती समजून घेण्यासाठी याच पायऱ्यांनी जावे लागते. साहित्य विचारात जी आस्वादप्रक्रिया सांगितली जाते त्यामध्ये वाचन प्रक्रिया या घटकांचा अंतर्भाव केला जातो. वाचन हा साहित्यास्वादातील महत्त्वाचा भाग आहे. किंबहुना तो आद्य घटक ठरतो. याविषयी वि.ना. ढवळे लिहितात, साहित्यकृती लक्षपूर्वक वाचल्याशिवाय आस्वाद शक्य नाही. साहित्यकृती पूर्ण वाचल्यावरच तिच्यामुळे आपल्याला आनंद वाटला की नाही, तिच्यामुळे आपल्या भावना व बुद्धी यांवर काय परिणाम झाला वगैरे गोष्टीबद्दल बोलता येईल. अगदी लहान कविता किंवा निबंध यांचा आस्वाद आणि दीर्घ कलाकृतीचा आस्वाद यांत आपोआपच फरक पडतो. एखादे सोपे भावगीत एकदा ऐकले तरी आपणाला आनंद वाटू शकेल व ताबडतोब वाहवा असा उद्‌गार काढणारे श्रोते सर्वत्र आढळतात. पण दीर्घकाव्य, कादंबरी इत्यादींचा नुसता आस्वाद घेण्याकरिता सुद्धा पुष्कळच जास्त वेळ द्यावा लागतो. रसास्वादाला अधिकच वेळ लागतो.

या सर्व प्रक्रियेत काळाचे भान विसरता येत नाही. प्रथमतः येणारा अनुभव हा कमी कालावधीचा असल्यामुळे त्याचा आस्वादही मर्यादित ठरु शकतो. मात्र एखादी कलाकृती एकदा वाचून झाल्यानंतर काही काळ जाऊ दिला असता परत वाचली तर त्यातील अनुभव वेगळा ठरु शकतो. तिचे आकलन वेगळे ठरते. त्यामुळे साहित्यास्वादात कालाधिष्ठितता असते असे म्हणता येते.

आस्वादक कलाकृतीचे वाचन करतो. तिचा आस्वाद घेतो त्यानंतर जी महत्त्वाची पायरी येते ती म्हणजे त्या कलाकृतीचे विश्लेषण करणे होय. साहित्य व्यवहारात यासाठी समीक्षा ही शाखा महत्त्वाची ठरते. समीक्षेमध्ये कलाकृतीचा केवळ आस्वाद घेतला जात नाही तर तिचे योग्य मूल्यमापनही केले जाते. समीक्षक आपल्या चिंतनातून कलाकृतीमधील आशय संप्रेषित करतो.

munotes.in

## २.१.७ साहित्यिक ज्ञानक्षमता - जोनाथन कलर

साहित्याच्या आस्वादविषयी पौर्वात्य आणि पाश्चात्त्य अभ्यासकांनी विविध संकल्पना, सिद्धांत मांडलेले आहेत. त्यामध्ये साहित्यिक ज्ञानक्षमता ही जोनाथन कलर यांनी मांडलेली संकल्पना महत्त्वाची आहे.

याविषयी वसंत पाटणकर यांनी अतिशय मार्मिक विवेचन केले आहे. ते लिहितात, कलरने ही संकल्पना नोम चॉम्स्की या भाषावैज्ञानिकाच्या भाषिक क्षमता या संकल्पनेच्या आधारे मांडलेली आहे. चॉम्स्कीच्या मते प्रत्येक अव्यंग माणसाला त्याची निजभाषा अवगत असते. त्या विशिष्ट भाषेच्या उपयोगामध्ये, तिच्यातील संदेशनाचे संप्रेषण व ग्रहण यामागे भाषिक नियमांची एक व्यवस्था उभी असते. या भाषिक नियम व्यवस्थेच्या ज्ञानामुळेच कोणत्याही व्यक्तीला असंख्य अशी अर्थपूर्ण वाक्ये निर्माण करणे व इतरांनी निर्माण केलेल्या अशा वाक्यांचा अर्थ ग्रहण करणे शक्य होते. या ज्ञानालाच चॉम्स्की 'भाषिक क्षमता असे म्हणतो. या भाषिक क्षमतेच्या संकल्पनेला अनुसरुन कलर यांनी आपली साहित्यिक क्षमतेची संकल्पना मांडलेली आहे.'

जोनाथन कलर यांनी साहित्यिक क्षमतेमध्ये तीन प्रकारच्या ज्ञानाचा समावेश केलेला आहे. त्यामध्ये १. भाषिक संकेतांचे ज्ञान, २. साहित्यिक संकेतांचे ज्ञान, ३. सांस्कृतिक संकेतांचे ज्ञान यांचा समावेश होतो. यांचा विस्तारपूर्वक विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. भाषिक संकेतांचे ज्ञान :**

कलर यांच्या मते, कोणत्याही भाषेतील साहित्यकृतीचे वाचन करण्यासाठी आपल्याला त्या भाषेचे व्याकरण, तिची एकूण विविध स्तरांवरील नियम व्यवस्था, संकेत यांचे ज्ञान असायला हवे. ही भाषिक क्षमता नसेल तर आपल्याला साहित्यकृतीचे वाचनच करता येणार नाही. परंतु भाषिक क्षमता आहे म्हणून केवळ त्याचमुळे आपल्याला साहित्यकृती ही साहित्यकृती म्हणून वाचता येईल असे नाही. आपण या क्षमतेच्या आधारे साहित्यकृतीचे केवळ एक भाषिक कृती म्हणून वाचन करु शकतो.

**२. साहित्यिक संकेतांचे ज्ञान :**

प्रत्येक साहित्यिक परंपरेत विविध साहित्यिक संकेत असतात. हे संकेत साहित्य प्रकार व साहित्याची तंत्रे, शैली, प्रतिमा, प्रतीके, व्यक्तिरेखा असे घटक इ. विषयीचे असतात. कथात्म साहित्याच्या वाचनाचे संकेत व कवितेच्या वाचनाचे संकेत एकाच प्रकारचे असत नाहीत. कथात्म साहित्यातही वास्तवदर्शी साहित्याचे संकेत, तेथील अपेक्षा एक प्रकारच्या असतात. सारांश, साहित्य हे साहित्य म्हणून वाचण्यासाठी अशा विविध साहित्यिक संकेतांचे ज्ञान आवश्यक आहे. एखाद्या साहित्यपरंपरेवर अन्य साहित्यपरंपरेचा प्रभाव, संस्कार पडलेला असला तर साहित्यिक संकेतांचे क्षेत्र विस्तारते.

**३. सांस्कृतिक संकेतांचे ज्ञान :**

बहुतांश साहित्यकृतीत भाषिक व साहित्यिक संकेतांबरोबरच सामाजिक, राजकीय, धार्मिक इत्यादी सांस्कृतिक व्यवस्थांमधील संकेतांचाही आविष्कार झालेला असतो. या सांस्कृतिक विचार प्रणालीचा, मूल्यांचा स्वीकार-अस्वीकार साहित्यकृतीतून होत असतो. त्यामुळे साहित्यकृतीचे यथार्थ आकलन होण्यासाठी आपल्याला या विविध सांस्कृतिक संकेतांचे ज्ञानही आवश्यक ठरते. उदा. हरी नारायण आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांतील जीवन दर्शनाचे यथार्थ आकलन व्हायचे असेल तर एकोणिसाव्या शतकातील विशिष्ट वर्गातील जीवन पद्धतीच्या संकेतांचे, परंपरांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याखेरीज त्या साहित्याचे मर्म आपल्याला उलगडू शकणार नाही.

जोनाथन कलर यांच्या साहित्यिक ज्ञानक्षमता या संकल्पनेविषयी वसंत पाटणकर यांनी केलेले वरील विवेचन महत्त्वपूर्ण आहे. या तीनही संकेतांचे ज्ञान लेखकाला अधिक प्रगल्भ बनवते. किंबहुना त्याची कलास्वाद क्षमता विकसित होते. त्यामुळे कलर यांची साहित्यिक ज्ञानक्षमता ही संकल्पना अतिशय महत्त्वाची ठरते.

**आपली प्रगती तपासा :**

१) आस्वाद म्हणजे काय ते सांगा ?

## २.१.८ समारोप

साहित्य विचारात आस्वाद प्रक्रिया अतिशय महत्त्वाची आहे. लेखक, साहित्यकृती आणि वाचक यांच्यातील हा एक सर्जनशील व्यवहार आहे. विशेषतः वाचकाच्या जीवनातील हा कलात्मक आनंद देणारा घटक असतो. गो. म. कुलकर्णी यांनी आस्वादप्रक्रिया म्हणजे एक हृदयसंवाद आहे असे म्हटलेले आहे. यातून साहित्य व्यवहारातील आस्वादाचे महत्त्व अधोरेखित होते.

## २.१.९ संदर्भ ग्रंथ


१) 'साहित्य विचार' : अरविंद वामन कुलकर्णी

२) 'साहित्यशास्त्र : स्वरुप आणि समस्या' : वसंत पाटणकर

३) 'साहित्य विचार' : संपादक डॉ. दत्तात्रय पुंडे, डॉ. स्नेहल तावरे

४) 'भारतीय साहित्यशास्त्र' : ग. त्र्यं. देशपांडे

५) 'पाश्चात्त्य साहित्यशास्त्र' : सिद्धांत आणि संकल्पना : डॉ. सुरेश धायगुडे

६) 'आधुनिक साहित्य सिद्धांत' : मिलिंद मालशे, अशोक जोशी


## २.१.१० स्वाध्याय

१) आस्वाद ही संकल्पना स्पष्ट करा.

२) साहित्याची आस्वाद प्रक्रिया सविस्तर विशद करा.

३) आस्वादकाचे गुणधर्म लिहा.

४) साहित्यानुभवाचे सर्वसाधारण स्वरूप उदाहरणांसह विशद करा.

५) जोनाथन कलर यांची साहित्यिक ज्ञानक्षमता ही संकल्पना स्पष्ट करा.

❖❖❖❖

# घटक-३.१

## साहित्य प्रयोजन

**घटक रचना :**

३.१.१ उद्देश
३.१.२ प्रस्तावना
३.१.३ लौकिकतावादी भूमिका
३.१.४ सत्य
३.१.५ ज्ञान
३.१.६ नीती
३.१.७ बांधिलकी
३.१.८ समारोप
३.१.९ संदर्भग्रंथ
३.१.१० स्वाध्याय

### ३.१.१ उद्देश

१) साहित्याचे प्रयोजन समजावून घेणे.
२) साहित्यनिर्मितीत साहित्यिकाची अलौकिकतावादी भूमिका समजावून घेणे.
३) साहित्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या सत्याचे स्वरूप जाणून घेणे.
४) साहित्य आणि नीतीचा संबंध अभ्यासणे.
५) साहित्यनिर्मितीतून मिळणाऱ्या व्यवहार ज्ञानाचा शोध घेणे.
६) प्रयोजन विचारातील महत्त्वाचे असलेल्या बांधिलकीचे स्थान समजावून घेणे.

साहित्यप्रयोजन हा विचार भारतात भरतापासून म्हणजेच (इ.स. पूर्व २००) पर्यंत केला गेला आहे, आणि तो आजतागायत चालूच आहे. यामध्ये विशेष म्हणजे हा प्रयोजनविचार लेखक आणि वाचक या दोघांच्याही दृष्टिकोनातून प्रारंभापासून केला गेला आहे. कित्येक वेळा साहित्याचे प्रयोजन म्हणजे साहित्यनिर्मितीमागील हेतू व साहित्य, वाचनाचा परिणाम हा विचार एकत्रच झाल्यामुळे काहीसा वैचारिक गोंधळही निमार्ण झालेला आहे.

साहित्यप्रयोजनाचा विचार करताना किंवा साहित्यनिर्मिती होताना साहित्यिकाचे उद्दिष्ट तर तपासले जाते परंतु वाचकाचा उद्देश काय? याचाही विचार होणे आवश्यक असते. आपल्या लेखनाचा वाचकावर परिणाम व्हावा, असेही साहित्यिकाला वाटत नसते. साहित्यिक

साहित्यकृती साहित्य निर्माण करुन जातो. त्यानंतर त्या साहित्यावर विविध अंगाने त्याची मीमांसा होत असते. यातूनच अनेक मतमतांतरे व अभ्यासनीय विचार पुढे येतात. साहित्यनिर्मितीच्या प्रयोजनाचा उद्देश काय? साहित्यप्रयोजनाचा विचार करण्याअगोदर वाचकांना साहित्यनिर्मितीतून जाणवलेल्या अनुभवांचा आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंध आहे का? असा वाचक विचार करतो. लेखक आणि वाचकाच्या दृष्टिकोणातून साहित्याचे प्रयोजन काय? ते कोणता अर्थ प्रतित करते हे बघणे आवश्यक आहे.

## ३.१.२ प्रस्तावना

साहित्याचे प्रयोजन म्हणजे साहित्य लिहिण्याचा किंवा वाचण्याचा हेतू, उद्दिष्ट होय. प्रयोजनाचा अर्थ हेतू किंवा उद्दिष्ट असे म्हणता येईल. कोणत्याही वस्तूच्या स्वरूपाचा तिच्या प्रयोजनाशी अगदी जवळचा संबंध असतो. उदा. कापड ही एक वस्तू आहे. मग त्याची निर्मिती शर्ट, कोट, रुमाल, सतरंजी अशा वेगवेगळ्या कारणासाठी होऊ शकते. लेखक कलाकृतीच्या स्वरूपाचा विचार करुन त्याची प्रयोजने ठरवित असतो. भावना चेतवण्याकरिता, विशिष्ट मताचा प्रचार करण्याकरिता, उच्चतर कलात्मक आनंद मिळविण्याकरिता साहित्याची निर्मिती होत असते त्यांनाच आपण प्रयोजन असे म्हणतो.

प्रत्येक कृतीला अथवा घटनेला काहीतरी कारण असते, हेतू असतो. त्याशिवाय तिची निर्मिती होत नसते. साहित्यिकाने प्रतिभेच्या बळावर निर्माण केलेली साहित्यकृती निर्माण झाल्यानंतर ती साहित्यकृती वाचकांसही तेवढ्याच प्रमाणावर आपलीशी वाटून जाते. त्यातून तो आनंद घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु साहित्यकृतीची निर्मिती होत असताना त्याचे नेमके प्रयोजन काय? हा प्रश्न निर्माण झाल्यास त्यात वावगे वाटण्याचे काही कारण नाही. कारण निर्मितीनंतर प्रत्येकजण त्याचा हेतू, उद्देश तपासण्याचा प्रयत्न करीतच असतो. या निर्मिती संदर्भात म्हणजेच साहित्यकृती निर्मितीच्या अर्थात साहित्याचा प्रयोजनाचा विचार फार पूर्वीपासून अनेक साहित्य मीमांसकांनी मांडला आहे. त्यामध्ये भरत, भामह, दंडी, रुद्रट, वामन, कुंतक, भोज, मम्मट यांनी साहित्याच्या प्रयोजनाचा विचार प्रकर्षाने मांडला आहे. साहित्याला मानवी जीवनात फार श्रेष्ठ स्थान देण्यात आले आहे. थोड्याशा निरीक्षणावरुन देखील हे सहज लक्षात येत. सर्व देशांत शैक्षणिक अभ्यासक्रमात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात साहित्याचा निश्चितपणे समावेश केलेला आहे. विद्यापीठांमध्ये विविध भाषांमधील वाङ्मयाचे अध्ययन, अध्यापन करणारे विभाग असतात. ते करीत असलेल्या साहित्यविषयक संशोधनाला समाजाची मोठी मान्यता मिळते. नियतकालिकांमधून, वृत्तपत्रांमधून साहित्याबद्दल विशेषतः नवीन साहित्याविषयी चर्चा होत असते. समाजातील अनेक साहित्यप्रेमी, व्यक्ती, संस्था या विषयात रस घेताना दिसतात. आकाशवाणी, दूरदर्शन इ. माध्यमेही याला अपवाद नाही.

साहित्यातील नव्या, जुन्या विचारप्रवाहांची व सतत बदलणाऱ्या प्रयोगांची नोंद घेतली जाते. समाजात साहित्यिकांना मोठा मान-सन्मान असतो. अनेक खाजगी सामाजिक संस्था अथवा शासन यंत्रणाही त्यांना वेगवेगळे पुरस्कार देत असतात. साहित्यिकांचा गौरव करण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. हे सर्व पाहिल्यावर साहजिकच असा विचार मनात येतो की, साहित्याला इतके महत्त्व कशासाठी? साहित्य असे कोणते कार्य करते की, ज्याच्यामुळे त्याला एवढे मोठे स्थान प्राप्त झाले आहे? थोडक्यात म्हणजे साहित्याचे प्रयोजन

काय? ज्या कारणासाठी एखाद्या वस्तूची निर्मिती करण्यात येते. ते कारण म्हणजे त्या वस्तूचे प्रयोजन होय. 'लिहिणे' हे 'लेखणी' या वस्तूचे प्रयोजन आहे. आपण दैनंदिन जीवनात वावरताना त्या प्रत्येक वस्तूचे काहीतरी प्रयोजन असते. हा नियम साहित्यालाही लागू आहे. फरक एवढाच आहे की, व्यवहारातील एखाद्या वस्तूचे प्रयोजन आपण ताबडतोब सांगू शकतो. त्याच तत्परतेने साहित्याचे प्रयोजन सांगणे सोपे नसते. लेखक का लिहितो?, वाचक, रसिक का वाचतो? हे प्रश्न साहित्याचा अभ्यास करताना आपणापुढे यावेत, हे स्वाभाविक आहे. साहित्यनिर्मितीमागे साहित्यिकाचा काही उद्देश असतो का? हा प्रश्न जितका लक्षणीय आहे, तितकाच वाचकाचा संबंध साहित्याशी असल्यामुळे वाचकाच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा आहे. कित्येकवेळा साहित्याचा अभ्यास करताना साहित्यिकापेक्षा वाचकाला, रसिकाला महत्त्व प्राप्त होते. कारण लेखकाने, साहित्यिकाने लिहिलेले साहित्य वाचकाने वाचल्याशिवाय त्या साहित्याचा बरे-वाईटपणा, त्याची श्रेष्ठ-कनिष्ठता कशी आजमावता येणार? हे देखील महत्त्वाचे आहे. साहित्याचे मूल्यमापन करताना, वाचकाकडून वाचन होत असताना तो वाचक केवळ मूल्यमापन करण्यासाठी वाचत नसेल तर तो कोणत्या ना कोणत्यातरी कारणासाठीच वाचत असतो हेही संभवनीय आहे. कोणतेही उद्दिष्ट समोर ठेवून वाचक वाचन करतो. तसेच साहित्यिक काहीतरी उद्देश समोर ठेवून साहित्यनिर्मिती करतो असे म्हणणे धाडसाचे ठरणार आहे.

लेखक लिहितो, आपली कलाकृती लिहून मोकळा होता. ती निर्मिती फक्त त्याने स्वतःसाठीच केलेली असते असे त्याला वाटणे हे साहजिकच आहे. परंतु, त्या निर्मितीमधून त्याला फक्त समाधान मिळणे हाच उद्देश पुढे येईल. कारण निर्माण केलेले साहित्य आपल्याच दफ्तरात पडून राहून त्याचा उपयोग काय? त्यामुळे केवळ स्वतःसाठी साहित्यिक लिहितो असे म्हणणेही संयुक्तिक वाटत नाही. निसर्गात निर्माण झालेल्या अनेक बाबी आहेत त्या का निर्माण झाल्या? कशा निर्माण झाल्या? या विषयीचे प्रश्न सुटणार नाहीत. परंतु साहित्यिकाने निर्माण केलेली साहित्यकृती का निर्माण केली याचे उत्तर साहित्यिक तर देईलच. पण वाचक देखील याचे उत्तर अभ्यासांती देवू शकेल.

साहित्यनिर्मिती मागच्या प्रयोजनासंदर्भात अनेक अभ्यासकांनी, संशोधकांनी आपापली मतमतांतरे मांडली व त्यामधून निघालेल्या निष्कर्षामधून ठोस असे एकच एक महत्त्वाचे व निर्णयात्मक साहित्याचे प्रयोजन आहे, असे म्हणणेही योग्य वाटण्याजोगे नाही. या मतमतांतरामधूनच काही प्रयोजने वाचकनिष्ठ आहेत. तर काही साहित्यिक या प्रयोजनाचा विचार करताना साहित्यनिर्मितीचा उद्देश काय असू शकतो? हेही पाहणे आवश्यक आहे.

## ३.१.३ लौकिकतावादी भूमिका

साहित्यनिर्मिती करण्यामागचा साहित्यिकाचा हेतू, उद्देश, प्रयोजन या अंगाने विचार करीत असताना साहित्य लेखकाला लौकिक मिळवून देतो. त्याचा अनेक वाचकांमध्ये बोलबाला झालेला असतो. बहुतेक साहित्यिक त्यांची स्तुती व्हावी, प्रशंसा व्हावी यासाठी लिहितो. असे असून देखील लेखन करणाऱ्या अनेक साहित्यिकांना यश मिळेलच असे नाही. त्यामुळे 'प्रसिद्धी' लौकिक मिळवण्यासाठी लिहिणारा साहित्यिक कधीच श्रेष्ठ ठरत नाही. हा हेतू ठेवणे म्हणजे साहित्यलेखनाच्या बाबतीत बालीशपणाचे ठरेल. त्यामुळे खरे साहित्यिक प्रसिद्धीच्या,

लौकिकाच्या मागे कधीही धावत नाहीत. ते आपले साहित्यलेखनाचे कार्य निरंतर करत राहतात. म्हणूनच अशा साहित्यिकांना प्रसिद्धी आपोआप मिळते, त्यांचा लौकिक होतो.

संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली 'ज्ञानेश्वरी' ही आपल्याला लौकिक मिळावा, आपल्याला प्रसिद्धी मिळावी म्हणून लिहिलेली नाही. तसेच संत ज्ञानेश्वरांप्रमाणे इतर संत कवींनी देखील निर्माण केलेल्या साहित्यकृती, लेखन हे लौकिक मिळविण्यासाठी झालेले नाही. शाहीरी कवी, केशवसुत, गो.व. देवल, कृ.पा. खाडिलकर, राम गणेश गडकरी यांचे साहित्यनिर्मिती मागचे उद्देश हे लौकिक मिळवण्यासाठी तयार झालेले नाहीत. मात्र त्यांना यशस्वी साहित्यिक म्हणून पुढील काळात समाजमान्यता मिळालेली आहे. साहित्यकृतीला विविध प्रांतांमध्ये मिळालेले अनेक पुरस्कार, होणारी समीक्षा, संशोधन, त्यांच्या साहित्यकृतीचा लौकिक झाल्यानंतर त्याची चर्चा होत असते व त्यातूनच त्याला अजून लेखनास प्रोत्साहन मिळत राहते व तो लेखन करत असतो. परंतु दर्जेदार लेखन करणारे साहित्यिक कसल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता लेखन करीत असतात.

साहित्यिकाने निर्माण केलेली साहित्यकृती ही तिच्या वाचनानंतर वाचक निर्णय देत असताना त्याची वृत्ती ही निरंकुश स्वच्छ असते. लौकिक मिळावा म्हणून वाचक वाचन करतो, असे कधीही होत नाही. साहित्यिक साहित्य निर्मिती करताना आपल्या स्वतःच्या अंतर्मनातून लिहिण्याचा प्रयत्न करतो. लौकिक मिळविण्याचा फंदात पडणारे साहित्यिक तात्पुरत्या कालखंडात त्यांना वाचक नावाजतील परंतु त्यांच्या साहित्यकृतीमधून मूल्यांकनाच्याद्वारे ज्यावेळी साहित्याकृतीतील सामाजिक, वाङ्मयीन मूल्यांचा विचार करताना समीक्षक, संशोधक त्या साहित्यकृतीचा दर्जा तपासत असतो. साहित्यिक आपल्या प्रतिभा सामर्थ्याने जरी साहित्य निर्माण करीत असला तरी त्याच्या शब्द सामर्थ्याला फार महत्त्व आहे. वि. स. खांडेकरांच्या 'ययाती' कादंबरीस ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांचा नावलौकिक झाला. कारण, त्यांच्या शब्द सामर्थ्याने कादंबरीला सामर्थ्य प्राप्त झाले आहे.

साहित्यिक लेखन करत असतो, परंतु साहित्य हे मानवी अपत्य आहे, असे ते म्हणतात. ते यामुळेच की, त्यांची ती कलाकृती त्याने निर्माण केल्यानंतर तिच्यात मानवी जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. परंतू त्यातील लेखनाची शैली, बाज, शब्दसामर्थ्य हेच साहित्यकृतीला उच्च दर्जापर्यंत घेऊन जात असते. साहित्यकृतीला नाव मिळविण्यासाठी खास अशी कौशल्या पूर्वक योजना करावी लागते, असे नाही. जे साहित्यिक जाणीवपूर्वक नावलौकिक, प्रसिद्धी मिळविण्यासाठी लेखन करतात ते कधीच यशस्वी होत नसतात व त्यांना प्रसिद्धीही मिळत नसते. कारण कृत्रिम पद्धतीने लेखन करणारे व ओढाताण करुन लेखन करणारे लेखक यशस्वी झालेले नाहीत व त्यांना प्रसिद्धीही मिळत नाही हे वास्तव आहे.

पूर्वीच्या काळी भोज, भूषण, कालिदास, कवी रघुनाथ पंडित यासारख्यांना राजाश्रय मिळून काव्यापासून अर्थप्राप्ती झाली. पेशवाईत शाहीर कवींना असा मान मिळाला. आजदेखील भा.रा. तांबे, यशवंत, चंद्रशेखर यांना आपण राजकवी म्हणून ओळखतो. पण हा राजाश्रय मिळविण्यापूर्वी या कवींनी आपला लौकिक व्हावा, असा दृष्टिकोन ठेवलाच असेल असे नाही. लौकिकतावादी आपल्या लेखनासाठी साहित्यिक लौकिक मिळावा यादृष्टीने जरी विचार करत असले तरी लौकिक मिळविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे हे योग्य वाटण्यासारखे नाही व तार्किक पातळीवर ते पटण्यासारखे नाही.

साहित्यकृती लिहीत असताना लेखक एखादी कलाकृती लिहितो. ती वाचकाला भुरळ घालते. वाचक तल्लीन होऊन ती कलाकृती वाचत असतो. लेखन करण्यासाठी साहित्यिकाच्या अनुभवाचा, कल्पनाशक्तीचा, प्रतिभेचा वापर होतो. विनोदी साहित्याने पु.ल. देशपांडे यांना लौकिक मिळाला म्हणून पु.ल. देशपांडे जाणीवपूर्वक लौकिक मिळवण्यासाठी लेखन करत राहिले असे नाही. साहित्यातून मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मानवी जीवनमूल्यांचा अंतर्भाव होत असेल तर ते साहित्य सर्वांगाने महत्त्वपूर्ण असते.

साहित्यिक कादंबरीकार शिवाजी सावंत यांनी 'मृत्युंजय' सारखी उच्चतम दर्जाची साहित्यकृती लिहिली. त्यांना त्या साहित्यकृतीने उच्चपातळीवरचा लौकिक मिळवून दिला. परंतु साहित्यकृती लिहिताना लौकिक मिळवण्यासाठी साहित्यिकाने जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला नाही. लौकिकतावादी दृष्टीकोनातून साहित्याच्या प्रयोजनाचा विचार करत असताना वरील मुद्यांचा परामर्श आपण घेतला.

## ३.१.४ सत्य

सत्य वाचकांसमोर मांडण्यासाठी, सांगण्यासाठी साहित्य निर्मिती होते असे जरी प्रयोजन सांगण्यात येत असले तरी देखील उपरोक्त प्रयोजनाची मीमांसा करता साहित्यप्रांतात साहित्यप्रकारांचा विषय चर्चित असता कथा, कादंबऱ्या वाचताना जाणवते की, त्यामधील जग आपल्या सभोवतालच्या जगासारखेच आहे. साहित्यिकाला आलेल्या अनुभवातून साहित्यकृतीची निर्मिती होते. आपल्या कल्पनेच्या साहाय्याने साहित्यिक त्यामध्ये अधिक भर घालून एक नवे जग निर्माण करतो. परंतु हे जग सत्य मुळीच नसते. चित्रकार जसे छायाचित्र रेखाटतो तशा प्रकारची ती निर्मिती असते.

साहित्य हा मानवी जीवनाचा आरसा आहे, असे म्हणतात. परंतु आरशामधील प्रतिबिंब किंवा छायाचित्र यामध्ये एक प्रकारची स्थिरता असते. पण साहित्य हे एका साहित्यिक कलावंताने केलेली निर्मिती असल्याने त्यामध्ये सजीवपणा साहजिकच प्रकर्षाने जाणवतो. सत्य वा असत्य यांचा विचार केल्यास अवास्तवही म्हणता येणे योग्य नाही. परंतु सत्याचा परामर्ष घेण्याचा प्रयत्न केल्यास सर्वच जसेच्या तसे सत्य घटनांवर, अनुभवावर आधारलेले मुळीच नसते. साहित्यिकाला जाणवलेल्या सत्याला एक वेगळे सौंदर्यरूप साहित्यिक देतो. सत्याचा परामर्ष पाहताना बालकवींच्या कवितेतील फुलराणी हे निमित्त आहे. सत्य वास्तवाशी त्याचा काडीमात्रही बंध नसतो. ते फुल कशाप्रकारचे, कसले आहे, रंग, गंध असा कसलाही संबंध नसताना एक सुंदर दृश्य कवी वाचकांसमोर उभे करतो. याचा खरे सत्य असणाऱ्या विश्वाशी काही देखील संबंध नाही. तरीदेखील आपल्या मनाला ते दृश्य सत्य वाटून जाते. ही कलावंतांची एक जादुई निर्मिती म्हणावी लागते.

याचप्रमाणे गो. ब. देवलांच्या शारदा नाटकात वास्तवामध्ये एका अल्पवयीन मुलीचे लग्न एका वृद्ध व्यक्तीशी ठरते, ही बातमी साहित्यिकाच्या कानी पडल्यावर त्याची संवेदनक्षमता जागृत होऊन तो लेखनास प्रवृत्त होतो व शारदा नाटक तयार होते. या नाटकातील विषय समाजातल्या सत्य घटनांशी एकरूप आहे. तो सत्य आहे, परंतु नाटकातील पात्रांचा या सत्याशी संबंध असेलच असे नाही. 'पण लक्षात कोण घेतो ?', 'नटसम्राट' या साहित्याकृतीतील सत्यता ही समाजातील वास्तव असल्यानेच त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडले. आपल्याला साहित्यातील

इसापनीतीमधील प्राण्यांना बोलता येते हे जग सत्य नसते ते अशक्यप्राय: असणाऱ्या विषयांना स्पर्श करणारे असे असल्याने त्यावर थोडा वेळ विश्वास बसेल पण ते कल्पित असल्याचे जाणवेल. सत्याच्या भूमीतून पोषण होऊन असत्य कल्पित स्वतःचे रूप घडवीत असते. अशावेळी त्याला स्वतंत्र असे व्यक्तिमत्व दाखवत असते. सत्य व असत्य असे याचे एक नाते असते. अद्भुत कथा, नवल कथा यामधील जग वरवर पाहता सत्यापेक्षा वेगळे वाटते. पण त्या सर्व ठिकाणी व्यक्त होणारा मानवी स्वभाव वास्तव मानवी स्वभावाशी समांतरच असतो.

उपरोक्त प्रयोजनाचा विचार हा वाचकनिष्ट प्रयोजनाच्या दृष्टीने करणे क्रमप्राप्त ठरेल.

## ३.१.५ ज्ञान

साहित्याला शिक्षणात स्थान देण्यात आले आहे. हे आपण मागे पाहिले आहे. शिक्षणाचे मुख्य प्रयोजन ज्ञान देणे हे आहे. त्यामुळे साहित्याचे प्रयोजनही ज्ञान देणे हे असावे असे वाटणे, स्वाभाविक आहे. प्राचीन काळापासून वाङ्मय हे ज्ञान आहे. असा दृष्टिकोन अनेक श्रेष्ठ विचारवंतांनी केलेला दिसून येतो. भरतमुनींनी आपल्या ‘नाट्यशास्त्र’ या ग्रंथात नाटकाला पंचम वेद असे म्हटले आहे. तर राजशेखर यांनी आपल्या ‘काव्यमीमांसा’ या ग्रंथात वेदविद्या, तर्कशाळा, वाणिज्य, अर्थशास्त्र, धर्मशाळा यांच्याबरोबरच पंचमी साहित्यविद्या म्हणून साहित्याचा गौरव केला आहे मम्मटाने जे प्रयोजन सांगितले आहे त्या प्रयोजनामध्ये व्यवहार ज्ञान हे प्रयोजन सांगितले आहे.

पाश्चात्त्य साहित्य विचारामध्येही हा दृष्टिकोन ठळकपणे दिसून येतो. पाश्चात्त्य साहित्य शास्त्राचा जनक ‘ॲरिस्टॉटल’ याने आपल्या ‘पोएटीक्स’ या ग्रंथात वाङ्मयातून आनंद मिळतो. त्याचा संबंध ज्ञानप्राप्तीसाठी आहे. साहित्यातून जे ज्ञान मिळते, त्याचा दर्जा इतिहासापेक्षा श्रेष्ठ असतो. साहित्य हे ज्ञान आहे व ज्ञान देणे हे त्याचे प्रयोजन आहे असे सांगितले आहे. हे वाक्य जसेच्या तसे स्वीकारणे जरी कठीण असेल तरी इतिहास, भूगोल, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादी अर्थाने विषयज्ञानशाखा आहेत. त्या अर्थानेच वाङ्मयाला ज्ञानशाखा म्हणता येणार नाही. या ज्ञानशाखांमध्ये ज्या पद्धतीचा अवलंब करुन विषय हाताळला जातो. त्या पद्धती साहित्यात दिसत नाहीत. अशा कोणत्याही विषयाचे ज्ञान देणे हा साहित्याचा हेतू, उद्देश नसतो. कोणीही वाचक एका विशिष्ट विषयाचे ज्ञान मिळविण्यासाठी साहित्याकडे वळत नाही. करमणूक, आनंदप्राप्ती हा देखील साहित्याचा हेतू असतो. ज्या लेखनातून वाचकाला आनंदाचा, मनोरंजनाचा अनुभव येत नाही. त्याच्या चित्तवृत्तींना तल्लीन करण्याचे ज्याच्यात सामर्थ्य नाही, असे लेखन कितीही ज्ञानदायी असले तरी त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याला कोणीही साहित्य म्हणू शकणार नाही. साहित्याद्वारेच माणसाला ज्ञान प्राप्त होते असे म्हणण्यात अर्थ नाही. शास्त्रीय वाङ्मयातील ज्ञान हे महत्त्वाचे आहे. ते कोणी सांगितले, कसे सांगितले ते महत्त्वाचे नसते. म्हणूनच हे ज्ञान जितक्या वस्तुनिष्ठ, तर्कसंगत पद्धतीने सांगता येईल तेवढे आवश्यक ठरते. वस्तुनिष्टता हा शास्त्रीय वाङ्मयाचा महत्त्वाचा विशेष आहे. ही वस्तुनिष्ठता तर्कसंगत रीतीने बुद्धीला पटेल अशा तऱ्हेने क्रमवार मांडणे याला शास्त्रीय वाङ्मयात महत्त्वाचे स्थान आहे. त्रिकोणाच्या तीन कोनांची बेरीज काटकोन असते. हे सिद्ध करण्यासाठी ज्या प्रमाणे क्रमवार विचार केला जातो. त्या विचारातील क्रमव्यवस्था तर्कशुद्ध असावी लागते. या सिद्धांतापर्यंत आणणाऱ्या पायऱ्या वैचारिक असतात. त्या बुद्धीला पटणाऱ्या असाव्या लागतात. त्यापैकी एखादी पायरी जरी तर्कसंगत नसली तरी तो सिद्धांत खोटा किंवा

अपुरा पडतो. पण अशी तर्कधिष्टीतता साहित्यात अपेक्षित नसते. कारण त्याचा हेतू वेगळा असतो.

साहित्य ही एक कला आहे व कोणत्याही कलेचा हेतू जसा सौंदर्यात्मक आविष्कार हा असतो. तो साहित्याचा हेतू असतो. शास्त्रीय साहित्यात लेखक ज्ञानाचा शोध घेण्यात गुंतला जातो. हा ज्ञानाचा शोध ज्या भाषेद्वारे तो घेतो ती भाषा तिथे केवळ साधन म्हणून आलेली असते. संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी लेखनामधून ज्ञानाचा झरा वाहत राहतो. कारण ते साहित्य जाणीवपूर्वक, उपदेशात्मक असल्यामुळे तिथे ज्ञान देण्याचे कार्य समोर येते. मोरोपंतांचे आर्याभारत उपदेश करण्याचेच कार्य करते. त्यातून वाचकांना ज्ञानार्जन होण्यास मदत होते. एखाद्या कवीने सुंदर कविता लिहिली. ती कविता ज्ञान देण्यासाठी त्याने निश्चितच लिहिलेली नसते.

साहित्यातून जाणवणारी संवेदनात्मकता इतर कलांमधील संवेदनात्मकतेपेक्षा आणखी वेगळी असते. प्रत्येक कलेमधून ज्ञानाचा विषय समोर येईल असे नाही. सुंदर चित्रांमध्ये दिसणारा आनंद वेगळा असतो. आपल्या पंचेंद्रियांच्या साहाय्याने वास्तव जगात लेखकाला जो अनुभव येत असतो, जीवन व्यवहाराचे जे आघात त्याच्या मनावर प्रतिबिंबित होत असतात त्याने प्राप्त झालेले आकलन शब्दांमधून तो व्यक्त करत असतो. म्हणूनच लेखक असो, शास्त्रज्ञ असो किंवा सर्वसामान्य मनुष्य असो वास्तव जगाचे ज्ञान करुन देण्याचा पंचेंद्रियांपेक्षा वेगळा मार्ग त्याच्याजवळ नसतो. त्याच्या आधारेच आपल्याला जगाची ओळख होत असते. लेखकाला होणारी ही ओळख प्रामुख्याने भावनिक पातळीवरची असते. ज्ञानाच्या पातळीवरची नसते. तिचा संबंध ज्ञानाच्या सौंदर्य संवेदना जागृत करण्यासाठी असतो. वसंत ऋतूमध्ये झाडांना पोपटी रंगाची पालवी फुटते. येथील रंगाची जाणीव, ज्ञान व माहिती देण्यासाठी आहे. पण हे हिरवेहिरवे गार गालीचे या रंगाची जाणीव अशा प्रकारचे ज्ञान देण्यासाठी नसून त्या रंगसंवेदनेच्या आधारे मनातील भाव जागृत करणारे असते. त्यामुळे साहित्याचे प्रयोजन ज्ञान देण्यासाठी असते. असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

## ३.१.६ नीती

नीती हे एक जीवनवादी प्रयोजन म्हणून त्याच्याकडे पाहता येईल. येथे एका महत्त्वाच्या आणि गुंतागुंतीच्या समस्येचा विचार करणे योग्य होईल. साहित्याचा मानवी जीवनाशी कोणता संबंध येतो. यावर नीतीचा संबंध काय? हे मानणे उचित ठरेल. “नीती ही मूलतः सामाजिक घटना आहे.” समाजाच्या सुव्यवस्थित धारणेसाठी विधिनिषेधात्मक असे जे नियम अगर बंधने समाजाकडून निर्माण केले जातात. त्यांना सामान्यपणे नितीमूल्ये असे म्हणावयास हरकत नाही. रामचंद्र गाडगीळ यांनी मांडलेल्या या मताचा परामर्श घेतल्यास नीतीचा विचार समाजाच्या सुव्यवस्थित धारणेसाठीचे नियम बंधने असा विचार करणे साहित्यिक दृष्टीने ते योग्य देखील ठरेल. परंतु नीतीला एक वैश्विक रूप प्राप्त झाल्याने देश कालपरत्वे ती बदलते. प्रत्येक देशात नीतीचे स्वरूप वेगळे आहे. नीतीचा केवळ सामाजिक जीवनाशी संबंध नसून नीती हा विश्वाच्या मुळाशी असलेल्या चैतन्य शक्तीचा आविष्कार आहे. असेही आग्रहाने प्रतिपादन करणारे आत्मवादी विचारवंत आहेत. धर्मजीवनाशिवाय नीती जिवंत राहू शकत नाही, असे यांचे निश्चित मत आहे.

munotes.in

साहित्याच्या अगर कलेच्या दृष्टीने विचार करताना आपणास केवळ सामाजिक नितीमूल्यांचाच विचार करावा लागेल. वर नमूद केल्याप्रमाणे आचार प्रधान, कर्मकांडात्मक नीतीनियम देशकालमानाने बदलतात. पण या नियमांच्या मुळांशी शाश्वत अशी मूल्ये असतात. सत्य, प्रेम, अहिंसा, त्याग ही नितीमूल्ये आहेत. साहित्यिक साहित्यकृती लिहितो. त्याचवेळी त्या साहित्यकृतीत व्यक्त झालेल्या भावभावनांच्याद्वारे साहित्यिकाची साहित्यकृती नैतिकतेचे डोस नकळत पाजत असते. कलावंताने सामाजिक जबाबदारी ओळखून आपल्या कलेचा आविष्कार करायला हवा. साहित्य वाचन करत असताना वाचक त्यात रममाण होत असतो. कवींच्या, लेखकाच्या भूमिकेशी तो समरस झालेला असतो. या भूमिकेवरुन व्यावहारिक जीवनात परत येताना त्याचे व्यक्तित्व संपन्न झालेले आढळते. त्याच्या भावना उदात्त बनतात. त्याला अवर्णनीय असा आनंद झालेला असतो. या घटनेला उद्देशून व्यवहाराच्या पातळीवर आपण मात्र म्हणतो की, साहित्य वाचनाचे ज्ञान मिळते. आनंद प्राप्त होतो. नीतीच्या बाबतीत अजून एक विचार पुढे येतो. सुरेश धायगुडेंच्या मते "नीतीत्वाचे धडे देणे हे साहित्याचे काम नाही. साहित्याच्या अनुभूतीतून वाचकाला आपोआपच काही नीतीत जाणवले व साहित्यकृतीचा एक कलाकृती म्हणून तो त्या जाणीवेतून विचार करू लागला, तर ते उद्‌बोधन सार्थ झाले असे म्हणता येईल. वाचकाच्या मनाचा प्रवास याबाबतीत कसा होतो हे पाहणे महत्त्वाचे आहे. साहित्यातून नीतीतत्त्वाकडे व नीतीतत्त्वाकडून पुन्हा साहित्याकृतीकडे असा हा दोन बिंदूमधील दुहेरी प्रवास आहे." उपरोक्त मत विचारात घेतल्यास लिहिणारा साहित्यिक आणि वाचणारा वाचक दोहोंच्या दृष्टिकोनातून नैतिकतेचा विषय पुढे येतो. मानवी जीवन सुसंस्कारित व नीतीमूल्यांचा विचार करुन जगताना सुव्यवस्थित जगण्याची शाश्वती देणारे साहित्य नैतिकतेच्या जवळपास जाणारे साहित्य असते, असे म्हणता येईल. असा नैतिकतेचा सर्वांगीण दृष्टीने विचार करताना धार्मिक, वर्गीय आणि वैश्विक पातळीवर तिचा विचार करावा लागतो. परंतु आपणांस साहित्यातील नैतिकतेचा विचार करावयाचा असल्यास नैतिकता दोन्ही पातळीवर असते असे म्हणावे लागेल. नीती हे प्रयोजन लेखकनिष्ठ आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

## ३.१.७ बांधिलकी

साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेत साहित्यिक साहित्यकृती तयार करतो. ही साहित्यकृती निर्माण झाल्यानंतर वाचकाने ती वाचली अगर न वाचली तरी लेखकाचा उद्देश सामाजिक बांधिलकीचा असतो. आपण ज्या समाजात राहतो, बसतो, उठतो, वावरतो, आपण त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो, त्या समाजाचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. त्या समाजामुळे आपण घडलो त्या समाजाविषयी लेखकाच्या मनामध्ये एक प्रकारचा आदर व सहानुभूती असते.

साहित्य लेखनामध्ये साहित्यकार आपल्याला भावलेल्या अनुभवविश्वाचा विषय साहित्यात रेखाटण्याचा प्रयत्न करतो. आपल्या समाजातील परंपरेनुसार चालत आलेल्या विघातक चालीरीती असोत वा समाज विघातक असंख्य विषय असोत त्यांचा बिमोड करण्यासाठी व समाज योग्य त्या दिशेला येण्यासाठी आणि समाज परिवर्तन होण्यासाठी जे लेखन केले जाते ते एका जबाबदारीने व आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो म्हणून बांधिलकी मानून बरेच साहित्यिक साहित्य लेखन करीत असतात. भा. रा. तांबे एका कवितेत म्हणतात,

जनपळभर म्हणतील
हाय हाय
मी आता राहील कार्य काय

कवीला कवितेच्या माध्यमातून आपण या समाजाचे काहीतरी देणे लागतो हे दर्शवायचे आहे. माणूस मृत झाल्यानंतर त्याच्या मागे त्याचे कार्य राहणे आवश्यक आहे. तो त्या समाजाशी बांधील राहणे पसंत करतो. साहित्यामध्ये १९४५ नंतर उदयाला आलेले अनेक साहित्यप्रवाह ज्यात गांधीवाद, मार्क्सवाद, नवराष्ट्रीय, जन, स्त्रीवाद, ग्रामीण, दलित, आदिवासी आदी आहेत त्यांचा उद्देश समाजातील वास्तवावर आधारित साहित्य लेखन होणे आवश्यक आहे हा आहे.

जे साहित्य मनोरंजनासाठी लिहिलेले असते त्याचा सामाजिक मूल्यांशी काडीमात्र संबंध नसतो. त्यामुळे साहित्य लेखन करताना १९६० नंतर खऱ्या अर्थाने बांधिलकीच्या उद्देशाने साहित्यिक लेखन करु लागला, असे म्हणता येईल. कवी नामदेव ढसाळ 'स्वातंत्र्य' या आपल्या कवितेत म्हणतात,

'पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाव्य भगोष्ठ
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे
रामराज्याच्या कितव्या घरात आपण -हा-तोत
उद्गम विकास उंची संस्कार संस्कृती
कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा'[२]

स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे पूर्ण झाली तरी अजून पारतंत्र्यात असल्याने कवीने थेट प्रश्न विचारला आहे. हे आत्मभान आले आहे. परंतु हे प्रश्न वारंवार निर्माण होतात. हे खरे असले तरी ते प्रश्न आपण विचारणे आवश्यक आहे. कारण जिथे आपण जन्मलो, तिथल्या समाजाशी आपण बांधील असणे आवश्यक आहे. असेच प्रश्न ढसाळांनी निगरगट्ट अशा प्रस्थापित समाजव्यवस्थेला विचारले आहेत. एका अर्थाने ही त्यांची सामाजिक बांधिलकीच आहे. दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्याने या बांधिलकीतूनच माणसाच्या साहित्यिकाला खरी ओळख मिळवून दिली. त्यांना लेखनासाठी विविध पातळ्यांवरचे पुरस्कार मिळालेच परंतु वास्तवाचा परामर्श घेणारे साहित्य म्हणून हे साहित्य प्रसिद्धी पावले हे देखील खरे आहे. हा जीवनविषयक दृष्टिकोन मानवी जीवनात समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता यांचा पुरस्कार करणाऱ्या आणि त्या आड येणाऱ्या सर्व व्यवस्थेला नकार देणारा आहे. हा दृष्टिकोन व्यक्तीव्यक्तींतील सौहार्द जपणारा आणि व्यवस्था उद्धवस्त करणारा आहे. म्हणूनच दलित साहित्यात सुडाचे चित्रण फारसे प्रभावीपणे येत नाही. त्याऐवजी दु:ख भोगाचे आणि वेदनेचे चित्रण तीव्र उत्कट रूपात येते. माणसातल्या बुद्धीप्रामाण्यावर दलित साहित्य विश्वास ठेवते. बांधिलकी या पदाचा दलित साहित्याच्या संदर्भात दोन पद्धतीने विचार करता येतो. जो दारुण अनुभव लेखकाने घेतला त्याच्या प्रकरणात अभिरुची संकेत, नैतिक संकल्पना यांचा अडसर येतो. हा अडसर झुगारुन प्रामाणिकपणे अनुभव व्यक्त करण्याचे धाडस दाखविणे असा बांधिलकी या पदाचा अर्थ आहे. या बांधिलकीचा संबंध आविष्कार स्वातंत्र्याशीही लावता येईल.

कवी कुसुमाग्रजांनी बांधिलकी ऐवजी सामिलकी असा शब्द वापरला आहे. बांधिलकी स्वीकारणारे ते लेखक आणि न स्वीकारणारे ते साहित्यिक अशी वर्गवारी व्यंकटेश माडगुळकर

करतात. परंतु बांधिलकीच्या तत्त्वाचे मूळ उगमस्थान मार्क्सवादात आहे. सामाजिक वर्तनाशी बांधिलकी पत्करणे ही एक ऐतिहासिक गरज आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्या देशात झपाट्याने औद्योगिकीकरण झाले. त्याने शहरे आणि खेडी यातील अंतर जवळजवळ संपुष्टात आले. उलट जे औद्योगिकीकरण चालू आहे. त्यामुळे आर्थिक विषमतेचा तोल वाढतो आहे आणि खेड्यांच्या जीवावर चंगळवादी संस्कृती फोफावते आहे. या चंगळवादी संस्कृतीला परिवर्तनाशी बांधिलकी परवडणार नाही. शोषण हा ग्रामीण जीवनाला ग्रासणारा शाप आहे. त्याविरुद्ध लढा ग्रामीण साहित्यातून आविष्कृत झाला पाहिजे.

महात्मा फुले यांनी विद्या हा परिवर्तनाचा आधार आहे, हे जाणले होते. विज्ञाननिष्ठेने ग्रामीण जीवनाचे रूप बदलणार आहे. शेती आणि शेतकऱ्यांचें व शेतमजुरांचे श्रम लुटून औद्योगिकीकरण करणारी समाजव्यवस्था बदलली पाहिजे. अशी भूमिका ग्रामीण साहित्याने घेतली. परिवर्तनाची नांदी साहित्यिकाने उराशी बाळगून लेखन केल्यास ग्रामीण लेखकांना बांधिलकी स्वीकारुन करु दिले तरच क्रांती होईल. हे देखील तेवढेच खरे आहे. इथे सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे बांधिलकी हे प्रयोजन पूर्णतः लेखकनिष्ठ प्रयोजन आहे. असे म्हणता येईल.

**आपली प्रगती तपासा :**

१) ललित साहित्याचे प्रयोजन स्पष्ट करा.

## ३.१.८ समारोप

साहित्याच्या प्रयोजनाचा धांडोळा घेत असता लौकिक मिळविण्यासाठी लेखक साहित्यनिर्मिती करतानाचा साहित्यात येणारी सत्यता पडताळणी करण्यासाठी सत्य, ज्ञान, नीती, बांधिलकी या प्रयोजनांचा विचार वरीलप्रमाणे करता येतो. सत्य, ज्ञान हे वाचकनिष्ठ प्रयोजन आहे. तर नीती हे लेखकनिष्ठ प्रयोजन आहे. बांधिलकी हे देखील लेखकनिष्ठ प्रयोजन आहे.

## ३.१.९ संदर्भ

१) गाडगीळ, रामचंद्र सदाशिव : 'काव्यशास्त्रदीप' तिसरे मुद्रण जानेवारी १९७९, पृ. ३५
२) धायगुडे, सुरेश : 'साहित्य विचार', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती - २६ ऑक्टोबर, २००१, पृ. ३३.

munotes.in

## ३.१० स्वाध्याय

१) प्रयोजन म्हणजे काय ते सविस्तर लिहा.

२) साहित्याच्या प्रयोजन विचारातील ज्ञान आणि नीती या संकल्पना उदाहरणासह विशद करा.

३) प्रयोजन विचारात 'बांधिलकी' चे स्थान महत्त्वपूर्ण कसे असे ते सांगा.

४) साहित्याच्या प्रयोजन विचारातील लौकिकतावादी भूमिकेचे विश्लेषण तुमच्या शब्दांत करा.

५) साहित्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या 'सत्याचे' स्वरूप नेमके कसे असते ते सोदाहरण लिहा.

❖❖❖❖

munotes.in

# घटक ३.२

## साहित्याचे प्रयोजन

**घटक रचना :**

३.२.१ प्रस्तावना

३.२.२ उद्दिष्ट्ये

३.२.३ साहित्याचे प्रयोजन म्हणजे काय?

३.२.४ लौकिकतावाद / जीवनवाद

३.२.५ स्वायत्ततावादी भूमिका

३.२.६ मराठीतील स्वायत्ततावादी प्रयोजनविचार

३.२.७ सौंदर्यनिर्मितीतील कलेसाठी कला ही भूमिका

३.२.८ समारोप

३.२.९ संदर्भग्रंथ

३.२.१० स्वाध्याय

### ३.२.१ प्रस्तावना :

मागील घटकात आपण साहित्याचे प्रयोजन म्हणजे काय याचा विस्तृत आढावा घेतला आहे. हा आढावा घेत असतांना लेखक का लिहितो हेही विशद करण्याचा प्रयत्न केला. सत्य, ज्ञान, नीती, बांधिलकी या प्रयोजनांचा साहित्यनिर्मितीच्या अंगाने विचार करीत असतांना त्यांचे महत्त्वही अधोरेखित केले आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण प्रयोजनविचारांच्या अनुषंगाने आणखी काही महत्त्वाच्या संकल्पनांचा धांडोळा घेणार आहोत. मराठी भाषेतीलच नव्हे तर एकूण सगळ्या भाषांमधील साहित्यव्यवहाराच्या दृष्टीने या संकल्पना कशा महत्त्वाच्या आहेत याचा सविस्तर विचार आपल्याला येथे करायचा आहे.

'प्रयोजन' या संज्ञेला पर्यायी म्हणून 'हेतू', 'उद्दिष्ट', 'साध्य' अशा संज्ञा वापरल्या जातात. "काव्य निर्मितीच्या वेळी जो हेतू साहित्यिकाने किंवा कवीने मनात धरलेला असतो त्यालाच सर्वसाधारणपणे 'प्रयोजन' असे म्हणतात." अर्थात, 'प्रयोजन' व 'कार्य' वा 'परिणाम' या संज्ञांचा अनेकदा एकत्र उपयोग केला जात असला तरी त्या दोहोंमध्ये एक भेद आहे. तो म्हणजे प्रयोजन हे कार्याच्या तार्किकदृष्ट्या आधी असते आणि कार्य हे प्रयोजनाच्या नंतर असते. मानवाच्या सर्वच प्रवृत्ती (कृती) काही ना काही तरी प्रयोजन डोळ्यांसमोर ठेवून केल्या जातात. साहित्य व्यवहारही याला अपवाद नाही. कारण साहित्य व्यवहाराच्या प्रारंभी आणि अंतिमतः माणूसच असतो. अशा या प्रयोजनाचा विचार आपल्याला लेखकाच्या आणि वाचकाच्या अंगाने करता येतो. या विषयी डॉ. यशवंत मनोहर म्हणतात त्याप्रमाणे, "साहित्यिक साहित्यनिर्मिती का

करतो आणि वाचक वा आस्वादक या साहित्याचा आस्वाद का घेतो? म्हणजे लेखकगत प्रयोजन आणि वाचकगत प्रयोजन याही स्वरूपात प्रयोजनविचार करावा लागतो."

प्रयोजनाबद्दल अनेक प्रश्न निर्माण होत असतात. एखाद्या वस्तूचे एकच एक प्रयोजन असते की तिची एकापेक्षा अधिक प्रयोजने असतात? वस्तूचे एक प्रमुख प्रयोजन व अन्य दुय्यम प्रयोजने असे असते का? वस्तूचे प्रयोजन संदर्भाप्रमाणे, काळाप्रमाणे बदलते की बदलत नाही? इत्यादी साहित्याच्या प्रयोजनासंदर्भातही असे काही प्रश्न उपस्थित होत असतात. साहित्याचे प्रयोजन एकच एक असावे असे आपल्याला वाटत असले तरी साहित्य ज्या माणसांनी निर्माण केलेले असते त्यांच्या प्रत्यक्ष जीवन जगत असतांना वेगवेगळ्या भूमिका आणि जीवन दृष्टिकोन असतात. या भूमिकाच त्यांच्या लेखनाच्या प्रयोजन ठरत असतात. त्यामुळे साहित्याची वेगवेगळी प्रयोजने सांगितली जातात.

## ३.२.२ उद्देश

१) साहित्यातील प्रयोजन विचारातील जीवनवादी भूमिका समजावून घेणे.
२) प्रयोजन विचारातील स्वायत्ततावादी संकल्पना अभ्यासणे.
३) सौंदर्यानिर्मितीतील कलेसाठी कला ही भूमिका समजावून घेणे.

## ३.२.३ साहित्याचे प्रयोजन म्हणजे काय?

कलानिर्मिती, कला व कलानुभव यांच्या स्वरूपाचा शोध घेताना जे वेगवेगळे विचार वा वाद निर्माण होतात. या सर्वामध्ये एक समान अंतःसुत्र दिसते. हे अंतःसूत्र कलेचे स्वरूप, प्रयोजन वा कार्य यांच्याशी प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे निगडित असते. कलेचे स्वातंत्र्य, कलेची बांधिलकी वा कलेची फलश्रुती असा कोणताही प्रश्न असला तरीही या सर्व प्रकारच्या कलेचा, कलाकृतीचा हेतु कोणता असतो. हा प्रश्न अनुस्यूत असतो. उदाहरणार्थ, कला पूर्णपणे स्वतंत्र असते, अशी भूमिका घेतली तर कलेचे प्रयोजन सौंदर्यनिर्मिती करणे, सौंदर्यसंवर्धन करणे हेच आहे, असे म्हणावे लागते.

कलेचा/साहित्याचा हेतू वा प्रयोजन असे म्हणताना आपल्याला नेमके काय अभिप्रेत असते? कलावंताचे निर्मितीप्रयोजन, रसिकांचे कलानुभवाचे प्रयोजन व कलाकृतीचे प्रयोजन यांतील नेमके कोणते प्रयोजन आपल्याला अभिप्रेत असते? कलेचे प्रयोजन म्हणताना आपल्याला कलाकृतीचे प्रयोजन अभिप्रेत आहे. तिच्या बाहेर जाऊन आपल्याला कलेच्या, साहित्याच्या प्रयोजन-कार्याचा विचार करण्याची आवश्यकता नाही.

कलेच्या किंवा साहित्याच्या प्रयोजनाबाबत दोन व्यापक दृष्टिकोण, सैद्धान्तिक भूमिका पाहावयास मिळतात. या भूमिका लौकिकतावाद वा जीवनवाद आणि स्वायत्ततावाद वा कलावाद वा अलौकिकतावाद म्हणून ओळखल्या जातात. आपल्या एकूण जीवनामध्ये, अनुभवांमध्ये सौंदर्याचे / कलेचे, पर्यायाने सौंदर्यानुभवाचे / कलानुभवाचे प्रयोजन काय, स्थान काय, म्हणजेच हा अनुभव आपण का घेतो हा प्रश्न लौकिकतावाद व स्वायत्ततावाद या दोन व्यूहांच्या केंद्रस्थानी आहे. वेगळ्या प्रकारे सांगायचे तर समग्र मानवी जीवनात कलेचे प्रयोजन काय या केंद्रवर्ती

प्रश्नावर ज्या दोन परस्परविरोधी भूमिका घेतल्या जातात. त्यातूनच हे दोन संकल्पनाव्यूह निर्माण झाले आहेत. या दोन्ही संकल्पनाव्यूहांचे स्वरूप काय आहे, ते आपण क्रमशः समजावून घेऊया.

पाश्चात्त्य परंपरेत मानवी जीवनाची तीन प्रमुख अंगे मानली जातात. ज्ञान, नीती व सौंदर्य ही ती तीन अंगे होत. [नीती व व्यवहार या दोन्हींचा निर्देश व्यवहारात्मकतेत (practical) केला जातो. याखेरीज आत्मिक स्वरूपाचे नसलेले केवळ इंद्रियांच्या पातळीवरील अनुभवही मानवी जीवनात असतात. याला संवेदनासुख असे म्हणता येईल.] मानवी जीवनाच्या या तिन्ही अंगांचा, क्षेत्रांचा एकमेकांशी संबंध आहे का, असल्यास तो कोणत्या प्रकारचा संबंध आहे, असा प्रश्न निर्माण होतो. यांपैकी कोणतेही क्षेत्र स्वायत्त आहे असे म्हणायचे असले तर दुसऱ्या दोन क्षेत्रांशी त्याचा संबंध नाही. त्या क्षेत्रांतील संकल्पना या विशिष्ट क्षेत्रात अप्रस्तुत आहेत, अशी भूमिका घ्यावी लागते. म्हणजेच सौंदर्याचे क्षेत्र स्वायत्त आहे, अशी भूमिका घ्यायची असेल तर अर्थात ज्ञानाच्या नीतीच्या क्षेत्रांतील संकल्पना मूल्यं या क्षेत्रात अप्रस्तुत आहेत, अशी भूमिका घ्यावी लागते. हेच ज्ञान आणि नीती या क्षेत्रांची स्वायत्तता प्रस्थापित करताना करावे लागते.

## ३.२.४ लौकिकतावाद / जीवनवाद :

आपल्यासमोरील प्रश्न साहित्याचे प्रयोजन काय आहे? काय असावे? हा आहे. लौकिकतावादी भूमिका घेणारे असे मानतात की ज्ञान, नीती या जीवनाच्या सौंदर्याखेरीज अन्य क्षेत्रांतील मूल्यसंकल्पना कलेच्या, सौंदर्याच्या क्षेत्रात प्रस्तुत आहेत. केवळ सौंदर्य निर्मिती करणे हा कलेचा हेतू नसून जीवनसंवर्धन करणे हेही तिचे एक प्रमुख प्रयोजन आहे. त्यामुळेच कला स्वायत्तता असते ती मर्यादित असते. कलाकृतीची जडणघडण, तिची बांधणी कला क्षेत्रातील नियमांबरोबरीनेच ज्ञानात्मक, नैतिक म्हणजे आशयात्मक नियमांनी, तत्त्वांनीही होत असते. साहित्यासारख्या आशययुक्त कलेच्या संदर्भात हे विशेष दिसून येते. कलेचा अनुभवही अलौकिक स्वरूपाचाच असतो असे नाही. विशेषतः आशययुक्त कलांबाबत हा अनुभव येतो की कलानुभव आणि जीवनानुभव यांत गुणात्मक भेद नसून तो संख्यात्मक स्वरूपाचा भेद आहे. म्हणजेच कलानुभव हा अधिक तीव्र, अधिक उत्कट, अधिक संघटित स्वरूपाचा अनुभव असतो. साहित्य हे केवळ सौंदर्यनिर्मिती करत नाही, ते केवळ विशिष्ट प्रकारचा आनंद देत नाही तर ते जीवनसंवर्धनही करते, असे म्हणताना लौकिकतावाद्यांना नेमके काय अभिप्रेत असते? पारंपारिक प्रयोजन विचारात साहित्य 'बोध' देते असे मानले आहे. 'बोध' या पारंपरिक संज्ञेत ज्ञान व नीती या दोहोंचा समावेश करता येतो. 'बोध' या संज्ञेमुळे आपण बोधवादी (didactic) भूमिका घेतो आहोत, असे अनेक समीक्षकांना वाटते. त्यामुळे आपण साहित्य हे एक नवी दृष्टी देते, असे म्हणू या. ही दृष्टी ज्ञानात्मक असेल किंवा नैतिक असेल.

ज्ञान देणे हे साहित्याचे एक प्रयोजन आहे. ही भूमिका अनेक साहित्यमीमांसकांनी घेतली आहे. साहित्यकृतीमुळे ज्ञान मिळते असे म्हणतांना तिच्यामुळे माहिती लाभते. वाचक बहुश्रुत होतो. त्याल व्यवहारज्ञान लाभते. आरशातील प्रतिबिंबाप्रमाणे त्याला समाजाचे ज्ञान लाभते. जीवनाचा पुन:प्रत्यय येतो. असा मर्यादित अर्थ अनेकांना अभिप्रेत असतो. परंतु अनेक समीक्षकांनी सूक्ष्म स्वरूपातही या भूमिकेची मांडणी केली आहे. साहित्याने ज्ञान द्यावे. म्हणजेच सत्याचे, वास्तवाचे, जीवनाचे दर्शन घडवावे असे या भूमिकेत सांगितले जाते. साहित्य ज्ञान देते

याचा सर्वसाधारण कोणता अर्थ आपल्याला अभिप्रेत असतो? साहित्य हे आपल्याला मानवी मनाचे, स्वभावाचे, अनेकविध मानवी संबंधांचे, मानवी समाजाचे, संस्कृतीचे असे अनेक व विविध स्तरांवरील जीवनाचे दर्शन घडवते. विशिष्ट स्थलकालातील माणसांचे जीवन, त्यांच्या जगण्याची लय, त्यांच्या इच्छा-आकांक्षा, वृत्ति-प्रवृत्ति, धडपड यांचा प्रत्यय देते. साहित्यामुळे आपल्याला मानवी जीवनाच्या आंतरिक व बाह्य वास्तवाची, समग्र जीवनाची प्रचिती येते. जीवनातील विशिष्टता व सार्वत्रिकता या दोन्हींचा प्रत्यय मिळतो. साहित्य एकूणच मानवी जीवनावर प्रकाश टाकते. त्यामुळे आपल्याला जीवनातील महत्त्वपूर्ण, मूलभूत प्रश्नांची जाण येते. नवी मर्मदृष्टी लाभते. आपल्या अनुभवाच्या कक्षा विस्तारतात. अनुभव समृद्ध होतो. आपल्याला एक वेगळी जीवनदृष्टी लाभते. साहित्याचा असा प्रत्यय येणे म्हणजेच त्यातून विशिष्ट प्रकारचे ज्ञान लाभणे होय. असे ज्ञान देणे हे त्याचे प्रयोजन-कार्य आहे. आणि हे ज्ञान किती व्यापक व सूक्ष्म स्वरूपाचे असते, यावर साहित्याचे मूल्यही अवलंबून आहे.

साहित्यतून जे विविध स्वरूपाचे ज्ञान मिळते. ते सरळपणे माहितीच्या स्वरूपात मिळत असते. साहित्यकृतीत व्यक्त होणाऱ्या जीवनानुभवांत जीवनप्रसंगात, जीवनरीतीत ते असते. म्हणजे हे मूर्त स्वरूपातील ज्ञान असते. विविध साहित्यप्रकारांतून ते वेगळ्या स्वरूपांतून व्यक्त होत असते. काही साहित्यकृतीतून ते वास्तववादी पद्धतीने, तर काहींमधून ते प्रतीकात्मक पद्धतीने व्यक्त होत असते. अर्थात, सर्वच प्रकारांतील साहित्यकृतीकडून ज्ञानाची सरसकट अपेक्षा बाळगता येत नाही.

साहित्य ज्या प्रकाराचे ज्ञान देते आणि त्यावर साहित्याचे मूल्य अवलंबून असते, अशी भूमिका घेणे म्हणजे साहित्य व सत्य यांच्यात विशिष्ट प्रकारचा संबंध असतो, हे मान्य करणे होय.

साहित्याने नीतीबोध करावा. ते आनंदाद्वारे, मनारंजनाद्वारे नीतिबोध करते. ते त्याचे प्रयोजन-कार्य आहे. ही भूमिका काळापासून चालत आलेली दिसते. ही बोधवादी किंवा प्रत्यक्ष नैतिकवादी भूमिका आहे. दुसरी भूमिका असे मानते की साहित्य सौंदर्यनिर्मिती करताना वाचकांवर ज्या प्रकारचा संस्कार करते. तो अप्रत्यक्षपणे नैतिकतेला पोषक असतो. याला अप्रत्यक्ष नीतिवादी भूमिका म्हणता येईल. साहित्याचा नैतिक संस्कार हा वेगवेगळ्या प्रकारे होत असतो आणि तो दूरगामी, सर्वांगीण स्वरूपाचा असतो. लेखकाचा नैतिक दृष्टिकोण हा साहित्यकृतीच्या विविध घटकांतून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे व्यक्त होत असतो. साहित्यकृतीचे रूपही या नैतिक दृष्टिकोणांने नियत होते. समाजातील पारंपरिक नीतिमूल्यांची, नैतिक दृष्टिकोणांची मोडतोड, फेरमांडणी चांगला लेखक करत असतो. यामधून वाचकाला तो एक नवी नैतिक दृष्टी देत असतो. आपल्या नैतिक कल्पनांचा फेरविचार करायला लावत असतो. अशा प्रकारची क्षमता ज्या लेखनामध्ये असते, ते लेखन मूल्यदृष्ट्या अधिक सकस आहे, असे आपण म्हणत असतो. सारांश, लेखकाची नैतिकता, त्याची मूल्यदृष्टी हा साहित्यकृतीचे मूल्य निश्चित करणारा एक महत्त्वाचा निकष आहे.

अर्वाचीन मराठी साहित्यविचारात जो प्रयोजनविचार मांडला गेला त्यात विशिष्ट राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीमुळे लौकिकतावादी व्यूह प्रबळ असणे स्वाभाविक होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात 'बोध' व 'मनोरंजन' ही साहित्यप्रयोजने ठळकपणे दिसून येतात. या प्रारंभीच्या टप्प्यावर 'बोध' याचा अर्थ सामान्यतः सरळ नीतीपदेश, उद्बोधन, माहिती असा आहे. 'बोध' म्हणजे काहींच्या दृष्टीने सनातन नीतितत्त्वांचा, आध्यात्मिक स्वरूपाचा

बोध आहे तर काहीच्या दृष्टीने तो नव्या मूल्यांचा बोध आहे. म्हणजेच सनातनी, सुधारक, राष्ट्रवादी या सर्वांना अभिप्रेत असलेला 'बोध' या संकल्पनेचा अर्थ वेगवेगळा आहे. त्यामुळेच साहित्याने लोकशिक्षण करावे, लोकमतास वळण लावावे. लोकजागृती करावी, स्वदेशनिती वाढवावी अशा अपेक्षा या काळात व्यक्त केल्या गेल्या आहेत. 'मनोरंजन' वा 'आनंद' या संज्ञांचा अर्थही रंजकतेला, रोचकतेला, सुखवादाला पूरक असा मर्यादित आहे. मराठीत संस्कृत व पाश्चात्त्य साहित्यशास्त्रांचा अभ्यास हा जसजसा अधिकाधिक होत गेला. तसतसा प्रयोजनविचार सूक्ष्म व विकसित झालेला दिसून येतो.

या भूमिकेचीच काहीशी विकसित रूपे आपल्याला काही समीक्षकांमध्ये पाहावयास मिळतात. ह. ना. आपटे हे त्यांतील एक समीक्षक होत. त्यांनी 'विदग्ध वाङ्मया'चे शिक्षण व आनंद असे द्विविध हेतू सांगितले आहेत. त्यांच्या मते साहित्य हे वाचकाला सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवून सन्मार्गाला नेते. त्याच्या विविध मनोवृत्तीचा विकास करून त्याला शुद्ध आनंद देते. साहित्याच्या या प्रत्यक्ष हेतूबरोबरीनेच त्यांनी त्याचा एक अप्रत्यक्ष हेतूही सांगितला आहे. त्यांच्या मते साहित्य हे सत्यदर्शन घडवते. मात्र हे सत्याचे दर्शन ते सत्याभासा वृत घडवत असते. सत्यदर्शन म्हणत असताना त्यांना संसाराचे चित्र, संसारातील मर्मे यांचे दर्शन अभिप्रेत आहे.

वि. का. राजवाडे, डॉ. केतकर यांसारख्या समीक्षकांनी साहित्यप्रयोजनात काही विशिष्ट गोष्टीवर भर दिला आहे. राजवाड्यांनी साहित्य हे निर्हेतुक नसते, अशी भूमिका घेतली आहे. त्यांच्या मते लेखकाने कादंबऱ्यांद्वारे समाजाच्या आशा-आकांक्षा-भावना व्यक्त कराव्यात. समाजाचे गुणदोष ववित, मत्समार करावा. समाजात उत्कृष्ट विचारांचा व पुरुषार्थाच्या कल्पनांचा प्रसार करण्यास कादंबरीसारखे दुसरे सोपे साधन नाही. डॉ. केतकरांनीही राष्ट्रोन्नती, समाजोद्धार, उदात्त गुणांची जोपासना करणे ही साहित्याची प्रयोजने मानली आहेत.

गांधीवादी व मार्क्सवादी समीक्षकांनी आपण स्वीकारलेल्या विचारप्रणालीनुसार साहित्याची प्रयोजने सांगितली आहेत. द. वा. कालेलकर, आचार्य जावडेकर, साने गुरूजी प्रभूती गांधीवाद्यांनी साहित्याने उदात्तता, सर्वमंगल कल्याणाची भावना यांचा पुरस्कार करावा. जीवन समृद्ध, व्यापक व गंभीर करण्याचा प्रयत्न करावा. जीवनशुद्धी, आत्मोन्नती करावी, पुरुषार्थ तसेच उदारता, मांगल्य, शुभवृत्तौ, साचार इत्यादी गुण निर्माण करावेत, सत्य, अहिंसा, त्याग, सेवा इत्यादीशी संबंधित ध्येयवाद निर्माण करावा, अशा अपेक्षा बाळगल्या आहेत. लालजी पेंडसे, भा. वि. वरेरकर, अनंत काणेकर प्रभूती मार्क्सवाद्यांनी साहित्याची सामाजिक उपयुक्तता महत्त्वाची मानली आहे. त्यांच्या मते साहित्याने प्रगतीपर, पुरोगामी, क्रांतिप्रवण असावे. श्रमजीवीच्या विकासाला हातभार लावावा. त्यांच्या न्याय-हक्कासाठी लढा द्यावा. श्रमिकांच्या जीवनाची, त्यांच्या संघर्षाची चित्रे रेखाटावीत. मराठी साहित्यविचारात प्रयोजनासंबंधी मांडलेल्या या भूमिका कमी-अधिक फरकाने प्रत्यक्ष नीतीवादी व स्थूल जनात्मकतावादी भूमिकेशी नाते सांगणाऱ्या आहेत. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात काही समीक्षकांनी अप्रत्यक्ष नैतिकतावादी व सूक्ष्म ज्ञानात्मकतावादी भूमिकांचीही मांडणी केलेली आहे. वा. म. जोशी व वि. स. खांडेकर हे अशा समीक्षकांपैकी होत. त्यांनी 'कलेसाठी कला' हे प्रयोजन सामान्यतः मान्य केलं असले तरी प्रत्यक्षात साहित्याच्या नैतिक व ज्ञानात्मक प्रयोजनांवरही भर दिला आहे. 'कारणानां अनेकता' हे त्यांच्या एकूण भूमिकेचे मध्यवर्ती सूत्र आहे. त्यांच्या मते सत्य, शीव व सौंदर्य हे अन्योन्यसापेक्ष, अन्योन्याश्रयी व अन्योन्यसंस्कारक आहेत. आत्मोन्नती, समाजोन्नती हे साहित्याचे कार्य आहे. साहित्यामुळे अनुभव समृद्ध होता. जीवनविषयी मर्मदृष्टी लाभते. कलानंद हा सात्त्विक असावा असा आग्रहही त्यांनी धरला आहे. त्यांच्या मते कला हे

उच्चतम जीवनाचे एक अंग आहे. वि. स. खांडेकर यांनीही अशाच प्रकारची भूमिका घेतली आहे. त्यांच्या मते सौंदर्य हे सत्यमय असते आणि त्यामुळे त्याचा व्यापक नीतीशी विरोध असत नाही. साहित्यवाचनामुळे वाचक नकळतपणेच सत्य, न्याय व सौंदर्य यांच्या बाजूचा होतो.

कुसुमावती देशपांडे यांनीही अनेक निकषांचा स्वीकार केला आहे. त्यांच्या मते सत्य, शिव व सौंदर्य ही जीवनाची त्रिगुणात्मक अंगे आहेत. ती जीवनसापेक्ष आहेत. साहित्यानुभव हा मानवी अनुभूतीचे क्षितिज विस्तारतो, मनुष्यत्वाच्या गाभ्याला आवाहन करतो. साहित्य हे रसिकाच्या अंतःकरणावर संस्कार करून त्याच्या अनुभवाची पातळी उंचावते. साहित्याच्या प्रयोजन-कार्याविषयीची देशपांडे यांची ही कल्पना अप्रत्यक्ष नीतिवादी भूमिकेला पूरक अशीच आहे.

रा. भा. पाटणकर हे अलीकडच्या लौकिकतावादी समीक्षकांपैकी एक महत्त्वपूर्ण समीक्षक होत. 'कला' ही संकल्पना द्विध्रुवात्मक असते हा सिद्धान्त मांडून साहित्य ही कला लौकिकतेच्या ध्रुवाकडे अधिक झुकलेली असते. असे प्रतिपादन त्यांनी केले आहे. त्यांनी मराठीत प्रथमच अनेक निकषतेचा विचार तात्त्विक अधिष्ठानासह काटेकोरपणे मांडला. त्यांच्या मते साहित्यासारख्या कलेमध्ये कलाकृतीची घडण केवळ सौंदर्यात्मकच नव्हे तर ज्ञानात्मक व नैतिक तत्त्वानुसारही होत असल्यामुळे आस्वादकात स्वाभाविकपणे ज्ञानात्मक व व्यवहारात्मक / नैतिक भूमिका जागृत होतात. साहित्य प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे नैतिकतेर / परिपोष कशा प्रकारे करते. तसेच ते कोणत्या प्रकारे ज्ञान देते, हे त्यांनी दाखवले आहे. अर्थात, त्यांची भूमिका ही साधनवादी नसून ती साहित्याला साध्य मानणारी आहे. त्यांच्या मते साहित्य हे समृद्ध जीवनाचे साधन नव्हे, तर ते स्वतःच मूल्ययुक्त साध्य आहे.

लौकिकतावाद्यांच्या मते कलेचे, साहित्याचे क्षेत्र पूर्णपणे स्वायत्त नाही. ज्ञान, नीती या क्षेत्रांतील मूल्यसंकल्पना साहित्याच्या क्षेत्रात प्रस्तुत ठरतात, आणि साहित्याचे मूल्य या सौंदर्येतर मूल्यसंकल्पनांनीही निश्चित होत असते.

## ३.२.५ स्वायत्ततावादी भूमिका :

स्वायत्ततावाद्यांच्या मते ज्ञान, नीती, संवेदनासुख या जीवनाच्या इतर अंगांसाठी सौंदर्य, कला साधन म्हणून वापरले जाऊ शकेल, तसे ते जातेही; परंतु सौंदर्याच्या संदर्भात ते महत्त्वाचे नाही. कोणतेही सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, व्यावहारिक उद्दिष्ट साध्य करणे हे कलेचे प्रयोजनकार्य नसते. कला ही व्यवहारोपयोगी गोष्ट नव्हे किंवा ती मनोरंजनाचेही साधन नव्हे. या इतर उद्दिष्टांकरिता, म्हणजे सामाजिक, राजकीय किंवा मनोरंजन यांकरिता, कला राबविली गेली तरी तिचे कला म्हणून असलेले मूल्य ह्यावर अवलंबून नाही. सौंदर्य, कला ही स्वयंभू, स्वायत्त, साध्यात्मक मूल्ये आहेत. ती पराश्रयी मूल्ये नाहीत. सौंदर्यनिर्मिती करणे, रसिकाला अलौकिक असा आनंद देणे, हेच कलेचे एकमेव प्रयोजन आहे. कला ही ज्ञानात्मक, नैतिक प्रयोजनांपासून मुक्त असल्यामुळेच ती स्वतंत्र ठरते. मराठीमध्ये ही भूमिका कलेसाठी कला म्हणून ओळखली जाते.

munotes.in

भारतीय परंपरेच्या संदर्भात बोलायचे तर संस्कृत परंपरेत अलौकिकतावाद / स्वायत्ततावाद ठाशीवपणे अस्तित्वात आहे. परंतु त्याचबरोबरीने लौकिकतावादी संकल्पनाव्यूहही अस्तित्त्वात असलेला दिसतो. मध्ययुगीन मराठी साहित्यपरंपरेत लौकिकतावादाच्या तुलनेने स्वायत्ततावादाचे अस्तित्व क्षीण स्वरूपात आहे. पाश्चात्य संदर्भात ॲरिस्टॉटलपासून ते अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत हे दोन्हीं संकल्पनाव्यूह अस्तित्त्वात असलेले दाखवता येतात. मात्र या सर्व साहित्यपरंपरांमध्ये या दोन्हीं संकल्पनाव्यूहांमध्ये टोकाचा विरोध, ताण असल्याचे अठराव्या-एकोणिसाव्या शतकापर्यंत दिसत नाही. या परंपरांमध्ये या व्यूहांमधील नाते मुख्यतः गौण-प्रधानभावाचे असलेले पाहावयास मिळते.

## ३.२.६ मराठीतील स्वायत्ततावादी प्रयोजनविचार :

मराठी साहित्यविचारात स्वायत्ततावादी वा कलावादी विचारांची बीजे विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या लेखनात दिसत असली तरीही त्याची स्पष्ट मांडणी करण्याचे श्रेय श्री. कृ. कोल्हटकरांना द्यावयास हवे. (चिपळूणकरांनी सुंदर वेश्येचा दाखला देऊन म्हटले आहे की, तिच्या रूपाचाच विचार करावयाचा असेल, तर तिच्या चारित्र्याचा विचार करून उपयोग नाही.) कोल्हटकरांच्या भूमिकेत आनंद  हे प्रयोजन-कार्य केंद्रस्थानी आहे. त्यांच्या मते ललित साहित्य हे रसिकाला आनंद देण्याच्या हेतूने निर्माण होते आणि हा आनंद जीवनातील अन्य आनंदाहून भिन्न असतो. साहित्याने बोध होतो. ते उपयुक्त असते ही भूमिका कोल्हटकरांनी ठामपणे नाकारली आहे. कोल्हटकरांनंतरच्या काही समीक्षकांनी आनंद हे साहित्याचे मुख्य प्रयोजन-कार्य मानले असले तरी त्यांना अभिप्रेत असलेला आनंद हा स्वायत्ततावादी परंपरेतील नाही. उदाहरणार्थ न. चि. केळकर यांनी आनंद हे कलेचे मुख्य प्रयोजन मानले असले तरीही अधिकाधिक फल या न्यायाने अप्रत्यक्ष नीतिबोध हेही प्रयोजन मान्य केले आहे. तर ना. सी. फडके यांनी आनंदनिर्मिती हाच कलेचा मुख्य हेतू आहे. ती उपयोगनिरपेक्ष असते असे म्हटले असले तरी त्यांची आनंदाची कल्पना ही रंजनवादी आहे.

मराठीमध्ये स्वायत्ततावादी भूमिकेची अत्यंत काटेकोर, तार्किक शिस्तीने मांडणी पहिल्यांदा बा.  सी. मर्ढेकर यांनी केली. त्यांनी कलेची सांस्कृतिक फलश्रुती काडीइतकीही नाही हे आवर्जून सांगितले. मर्ढेकरांचा स्वायत्ततावादाची उभारणी, रचना, रूप (form) केंद्रस्थानी ठेवून झाली आहे. त्यांच्या मते कला, कलानुभव साध्यरूप असतो. उपयुक्त रचनेचा हेतू तिच्याबाहेर असतो. तार्किक रचनेचा हेतु तिच्यातच अंतर्भूत असला तरी ती तर्कनियमांनी सिद्ध झालेली असते. या दोन्ही रचनांचे सौंदर्यात्म रचना मूलतः वेगळी ठरते. कारण सौंदर्यात्म रचनेचा हेतू हा तिच्यातच असतो व ती संवाद विरोध, समतोल वा लयनियमांनी सिद्ध झालेली असते. सौंदर्यात्म रचनेचा हेतू हा अन्य कोणत्याही गोष्टीचे साधन होणे हा नसतो. आपला अनुभव सौंदर्यदृष्ट्या समृद्ध होणे याखेरीज अन्य हेतू तिला नसतो.

पु. शि. रेगे यांनीही स्वायत्ततावादी भूमिका घेतली आहे. त्यांच्या मते, कलेने केवळ कलेसाठी असावे. सामाजिक हित, बोध, उपयुक्त ज्ञान या गोष्टी देणे हे कलेचे प्रयोजन नाही. मात्र कला ही उपयुक्ततेच्या पलीकडे जाऊन सत्यदर्शन घडवते. अशीही भूमिका त्यांनी घेतली आहे. अशीच द्विधा वृत्ती वा. ल. कुलकर्णी व गंगाधर गाडगीळ यांच्या भूमिकांमध्ये पाहावयास मिळते. कुलकर्णींच्या मते लेखकाला झालेला एक अर्थपूर्ण भावानुभव साक्षात करणे व त्यांद्वारा

आनंद देणे हे कलेचे प्रयोजन होय. परंतु आनंदाबरोबरीनेच त्यांनी जीवनदर्शन घडवणे, जीवनानुभूतीचा प्रत्यय देण हेही साहित्यप्रयोजन मानले आहे. गाडगीळांच्या मते साहित्याचे प्रयोजन भावना वा विचार नव्हे. तर अनुभव व्यक्त करणे, म्हणजेच अनुभवाची संगती, आकृती निर्माण करणे हे आहे. नैतिक उपदेश करणे, समाजसुधारणा करणे. समाजाबद्दल सिद्धान्त मांडणे हे साहित्याचे प्रयोजन नव्हे. परंतु याचबरोबरीने ते असेही म्हणतात की, साहित्यातून कलावंत विशिष्ट भावसत्य सांगत असतो. त्या भावसत्याच्या प्रतीतीपासून व सौंदर्यापासून होणारा आनंद वाचकाला देणे सौंदर्यप्रतीतीने वाचकाचे अनुभूतिविश्व समृद्ध करणे. त्याची जाणीव प्रगल्भ करणे हे साहित्याचे प्रयोजन आहे. प्रभाकर पाध्ये यांनी मनोविज्ञानाच्या आधारे आपली स्वायत्ततावादी भूमिका मांडली आहे.

त्यांच्या मते केवलास्वाद वा स्वररंजनात्मकता हेच कलेचे प्रयोजन आहे. या स्वररंजनात्मकतेला ते मेंदूच्या रचनेत आधार शोधतात. अनुभवात स्वररंजनात्मक वृत्तीने रमून गेल्यामुळे सौंदर्यानुभव निर्माण होतो. येथे कोणतीही व्यावहारिक कृती अभिप्रेत नाही. ज्ञानात्मक, नैतिक गोष्टींपासून त्यांनी कलेला पूर्णपणे वेगळे केले आहे. कला, कलानुभव हाच साध्यरूप आहे. ही त्यांची भूमिका आहे. मराठीत याखेरीज अनेक समीक्षकांनी स्वायत्ततावादी भूमिका घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.२.७ सौंदर्यनिर्मितीतील कलेसाठी कला ही भूमिका :

चित्र, शिल्प, संगीत इ. ललितकलांप्रमाणे साहित्य ही देखील एक ललितकला मानली गेली आहे. रसिकांना सौंदर्यप्रतीतीचा आनंद देणे हे सर्व ललितकलांचे एकमेव प्रयोजन मानले गेले असले तरी साहित्यकलेचा मात्र अनेक अभ्यासकांनी याबाबतीत अपवाद केला आहे. इतर ललितकलांच्या तुलनेत साहित्यकलेची असणारी आशयप्रधानता जीवनदर्शनात्मकता लक्षात घेता केवळ आनंद देणे एवढेच तिचे एकमेव प्रयोजन मानणे अनेकांना मान्य असल्याचे दिसत नाही. साहित्यकलेचा जीवनाशी असणारा अनुबंध महत्त्वाचा मानणारी ही भूमिका जीवनवादी भूमिका म्हणून ओळखली जाते. कलेचे विश्व हे लौकिक विश्वाहून वेगळे असते. व्यावहारिक उद्दिष्टपूर्तीसाठी नव्हे तर अलौकिक स्वरूपाचा आनंद देण्यासाठीच तिची निर्मिती होत असते असे मानणारी भूमिका ही कलावादी भूमिका म्हणून ओळखली जाते.

प्रा. ना.सी. फडके यांनी 'कलेसाठी कला' या तत्त्वाचा प्रामुख्याने आपल्या साहित्यात अवलंब करुन लेखन केले आहे. साहित्य हा लेखकाच्या अनुभवांचा आविष्कार असतो. लेखनातील अनुभव लिहीत असताना लेखकाला केवळ आनंदच अनुभवायला मिळत असतो. हे लेखन करीत असताना लेखक समाजाला बोध होत आहे की नाही, रसिकाला आनंद, आवड-निवड, ज्ञान, होत आहे की नाही याचा कोणताही विचार लेखकाच्या मनात येत नाही. निरागस आनंद देणारी ती निर्मिती असते. कोणत्याही हेतूचा विचार होत नसतो. मानवाच्या निर्मितीशील, सर्जनशील प्रवृत्तीचा तो सहज आविष्कार असतो. कला सर्वांर्थाने ज्ञानदर्शी असली पाहिजे. ज्ञानात्मक कलाच कलेची नि जीवनाची वृद्धी करीत असते. "कला ही कलेसाठीच असते, कलेतून वाचकांना सौंदर्यदर्शन घडविणे व आल्हाद देणे हेच साहित्यकृतीचे प्रमुख कार्य आहे." असे ना.सी. फडकेंचे कलेबद्दलचे विचार आहेत.

munotes.in

कलावाद्यांच्या मतानुसार, कलेचे विश्व हे स्वतंत्र, स्वायत्त, व अनन्यसाधारण असल्यामुळे तिच्याकडून कलाबाह्य अपेक्षा केल्या जाऊ नये असे त्यांना वाटते. कलेने केवळ कलेचे नियम पाळावेत. कलाकृतीपासून मिळणारा आनंद जितका वैयक्तिक तितकाच तो सार्वत्रिक असतो. कलाकृती म्हणजे नवीन सृष्टी निर्माण करणारी एक पुर्ननिर्मिती असते. कला ही ज्ञानात्मक, नैतिक प्रयोजनांपासून मुक्त असल्यामुळेच ती स्वतंत्र ठरते. म्हणून सौंदर्यनिर्मिती ही भूमिका कलेसाठी कला म्हणून ओळखली जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रा. ना.सी. फडके यांचे 'कलेसाठी कला' विषयक विचार स्पष्ट करा.

## ३.२.८ समारोप :

साहित्यप्रयोजनाबाबत लौकिकतावाद व स्वायत्ततावाद हे दोन परस्परविरोधी, व्यापक असे संकल्पनाव्यूह दाखवता येतात. लौकिकतावाद्यांच्या मते सौंदर्यप्रत्ययाबरोबरीनेच जीवनाचे संवर्धन करणे. म्हणजेच ज्ञानात्मक व/ वा नैतिक दृष्टी देणे हे साहित्याचे एक मुख्य प्रयोजन आहे. याउलट स्वायत्ततावाद्यांच्या मते जीवनसंवर्धन करणे हे साहित्याचे प्रयोजन नसून केवळ सौंदर्यनिर्मिती करणे, सौंदर्यानंद देणे हेच साहित्याचे प्रयोजन आहे. साहित्य हे ज्ञानात्मक, नैतिक प्रयोजनांसाठी नसून ते यांपासून मुक्त, स्वतंत्र असते. प्राचीन व मध्ययुगीन संस्कृत तसेच पाश्चात्त्य साहित्यपरंपरेत लौकिकतावाद व स्वायत्ततावाद हे दोन्ही संकल्पनाव्यूह अस्तित्वात असले तरी त्यांमध्ये ताणाचे, विरोधाचे नाते नाही. प्राचीन संस्कृत परंपरेत लौकिकतावादाच्या तुलनेत स्वायत्ततावाद अधिक ठाशीव स्वरूपात आहे. तर प्राचीन पाश्चात्त्य परंपरेत तो तुलनेने क्षीण स्वरूपात आहे. साहित्यप्रयोजनाबाबत 'बोध' व 'आनंद' हे सूत्र दोन्ही परंपरांमध्ये दिसते.

आधुनिक काळात लौकिकतावादी व स्वायत्ततावादी यांच्यात ताणाचे, संघर्षाचे नाते आहे. या काळात लौकिकतावादी व्यूहाची वेगवेगळ्या संकल्पनांच्या आधारे मांडणी करण्यात आली आहे. विविध ज्ञानात्मक व नैतिक संकल्पना प्रयोजनाच्या संदर्भात मांडण्यात आल्या आहेत. बांधिलकी ही त्यांतील एक महत्त्वाची संकल्पना आहे. ही विविध लौकिकतावादी प्रयोजने पाहिली की ती एक नसून अनेक आहेत, आणि ती शाश्वत नसून समाज-संस्कृतिसापेक्ष आहेत, असे म्हणावे लागते. आधुनिक काळात स्वायत्ततावादाची अत्यंत काटेकोर, तर्कशुद्ध मांडणी केली गेली आहे. अशी मांडणी प्रथम कांटने केली. स्वायत्ततावादात, आनंदवादी, आविष्कारवादी व रूपवादी असे भेद दाखवता आले तरी या वादाचे साहित्यप्रयोजन मूलतः शाश्वत व एकच असते, असे मानण्याकडे कल आहे.

## ३.२.९ संदर्भग्रंथ :

१) डॉ. यशवंत मनोहर, 'नवे साहित्यशास्त्र', युगसाक्षी प्रकाशन, नागपूर

२) डॉ. वसंत पाटणकर, 'साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या', पद्मगंधा प्रकाशन, पुणे

३) डॉ. धनाजी गुरव, 'साहित्यशास्त्र आणि साहित्यसमीक्षा', मराठी अभ्यास पत्रिका क्र. ५, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

## ३.२.१० स्वाध्याय :

१. प्रयोजन म्हणजे काय ते सविस्तर लिहा.

२. साहित्याच्या प्रयोजन विचारातील लौकिकतावादी भूमिका सविस्तर विशद करा.

३. प्रयोजन विचारातील स्वायत्ततावादी संकल्पनेचा परामर्श घ्या.

४. 'कलेसाठी कला' या तत्त्वाचा परिचय मराठी साहित्याच्या संदर्भात करून द्या.

५) प्रयोजन म्हणजे काय? ते सांगून लौकिकतावाद आणि जीवनवाद या संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

## एम.ए. - १, सत्र - १
## मराठी अभ्यासपत्रिका क्र. - १
## साहित्यशास्त्र
## परीक्षा स्वरूप

**अ) अंतर्गत चाचणी परीक्षा - ४० गुण**

**आ) सत्रांत परीक्षा - ६० गुण**

**नमुना प्रश्नपत्रिका** **(एकूण गुण : ६०)**

**सूचना :** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
३) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र. १ अ) साहित्यनिर्मितीप्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

आ) साहित्याची आस्वाद प्रक्रिया स्पष्ट करा.

प्र. २ अ) साहित्याच्या अनुषंगाने कल्पनाशक्ती संदर्भातील प्लेटोचे विचार सविस्तर लिहा. **(१५)**

**किंवा**

आ) साहित्याचे सर्वसाधारण स्वरूप स्पष्ट करा.

प्र. ३ अ) साहित्याची प्रयोजन कोणती ती सांगून साहित्यातील ज्ञान, निती ही प्रयोजने सविस्तर लिहा. **(१५)**

**किंवा**

आ) साहित्य ही 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' या दृष्टिकोणातून सविस्तर विवेचन करा.

प्र. ४ टिपा लिहा. (कोणत्याही दोन) **(१५)**

अ) साहित्यकृतीचे भाषिक अंग

**किंवा**

भारतीय परंपरेतील प्रतिभाशक्ती

ब) आस्वादकाचे गुणधर्म

**किंवा**

साहित्यिक ज्ञानक्षमता - जोनाधन कलर

क) बांधिलकी प्रयोजन

**किंवा**

स्वायत्ततावादी भूमिका

❖❖❖❖

munotes.in